**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.विशेष महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ४८</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक - ७.९.२०१५</u> <u>वेळ - दुपारी १२.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विशेष महापालिका सभा सोमवार दि.७.९.२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

५. मा.भालेकर अरुणा दिलीप

६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

८. मा.थोरात वनिता एकनाथ

९. मा.जाधव साधना रामदास

१०. मा.जाधव राहुल गुलाब

११. मा.आल्हाट मंदा उत्तम

१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१४. मा.जगदीश शेट्टी

१५. मा.बाबर शारदा प्रकाश

१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१८. मा.उल्हास शेट्टी

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.राजू मिसाळ

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३३. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३४. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३६. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३८. मा.अपर्णा निलेश डोके

३९. मा.अनंत सुभाष को-हाळे

४०. मा.जयश्री वसंत गावडे

४१. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४२. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४३. मा.शेख अस्लम शैकत

४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४५. मा.मडिगेरी वर्षा विलास

४६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

४८. मा.सुपे आशा रविंद्र

४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५०. मा.मोहिनीताई विलास लांडे

५१. मा.अजित दामोदर गव्हाणे

५२. मा.गोफणे अनुराधा देविदास

५३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५५. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५६. मा.लोंढे शुभांगी संतोष

५७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

५८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

५९. मा.सावळे सिमा रविंद्र

६०. मा.पालांडे सुजाता सुनिल

६१. मा.बहल योगेश मंगलसेन

६२. मा.कदम सदगुरु महादेव

६३. मा.गिता सुशील मंचरकर

६४. मा.कैलास महादेव कदम

६५. मा.टाक अरुण मदन

६६. मा.वाघेरे सुनिता राजेश

६७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६९. मा.काळे विमल रमेश

७०. मा.पाडाळे निता विलास

७१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७३. मा.विमलताई सुरेश जगताप

७४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

७५. मा.बारणे निलेश हिरामण

७६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७७. मा.बारणे माया संतोष

७८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

७९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८१. मा.कलाटे स्वाती मयुर

८२. मा.चौंधे आरती सुरेश

८३. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

८४. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८५. मा.जवळकर वैशाली राहुल

८६. मा.जगताप राजेंद्र गणपत

८७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

८९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९०. मा.प्रशांत शितोळे

९१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९२. मा.गायकवाड संध्या सुरदास

९३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९४. मा.शेंडगे आशा सुखदेव

९५. मा.मोटे किरण बाळासाहेब

९६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९७. मा.संजय केशवराव काटे

९८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

९९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१००. मा.पाटील सुजित वसंत

१०१. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

यािशवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कड्डसकर, मा.गायकवाड, मा.माने, मा.दंडवते, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदा सल्लागार, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.पठाण, मा.कुलकर्णी,

मा.बरशेट्टी, मा.गड्डूवार, मा.शेख, मा.गायकवाड - कार्यकारी अभियंता, मा.बोदडे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, अविनाश (दादा) टेकावडे-विद्यमान नगरसेवक, डॉ.एम.एम.कलबुर्गी-जेष्ठ कन्नड साहित्यिक आणि पुरोगामी विचारवंत, आदेश श्रीवास्तव-जेष्ठ संगीतकार यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत येवून सभा सोमवार दिनांक ७/९/२०१५ दुपारी १२.१५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर -** उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे आज दिनांक ७/९/२०१५ रोजी दुपारी १२.१५ वाजेपर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.विशेष महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ४८**

**सभावृत्तांत**

**(दि.७/९/२०१५ (दु.१२.००) ची तहकूब सभा)**

दिनांक - ७.९.२०१५ वेळ - दुपारी १२.१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.७/९/२०१५ (दुपारी १२.००) ची तहकूब मा.विशेष महापालिका सभा सोमवार दि.७/९/२०१५ रोजी दुपारी १२.१५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.जाधव साधना रामदास

११. मा.जाधव राहुल गुलाब

१२. मा.आल्हाट मंदा उत्तम

१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१४. मा.काळजे नितीन प्रताप

१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१६. मा.जगदीश शेट्टी

१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३८. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४०. मा.अपर्णा निलेश डोके

४१. मा.अनंत सुभाष को-हाळे

४२. मा.जयश्री वसंत गावडे

४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४५. मा.शेख अस्लम शैकत

४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४८. मा.मडिगेरी वर्षा विलास

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५७. मा.महेशदादा किसन लांडगे

५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६२. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६३. मा.सावळे सिमा रविंद्र

६४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशीनाथ

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.बहल योगेश मंगलसेन

६७. मा.कदम सदगुरु महादेव

६८. मा.गिता सुशील मंचरकर

६९. मा.कैलास महादेव कदम

७०. मा.टाक अरुण मदन

७१. मा.वाघेरे सुनिता राजेश

७२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७३. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७४. मा.काळे विमल रमेश

७५. मा.पाडाळे निता विलास

७६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७८. मा.विमलताई सुरेश जगताप

७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८०. मा.बारणे निलेश हिरामण

८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८२. मा.बारणे माया संतोष

८३. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८६. मा.कलाटे स्वाती मयुर

८७. मा.चौंधे आरती सुरेश

८८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

८९. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९०. मा.जवळकर वैशाली राहुल

९१. मा.जगताप राजेंद्र गणपत

९२. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९५. मा.प्रशांत शितोळे

९६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९७. मा.गायकवाड संध्या सुरदास

९८. मा.शेंडगे आशा सुखदेव

९९. मा.मोटे किरण बाळासाहेब

१००. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०१. मा.संजय केशवराव काटे

१०२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०४. मा.पाटील सुजित वसंत

१०५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.गायकवाड, मा.माने, मा.दंडवते, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदा सल्लागार, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गद्दूवार, मा.शेख, मा.गायकवाड - कार्यकारी अभियंता, मा.बोदडे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक- ७/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.रमा ओव्हाळ, मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे, मा.विनायक गायकवाड, मा.हिरानंद आसवानी, मा.कैलासभाऊ थोपटे, मा.संपत पवार, मा.बाळासाहेब तरस, मा.शांताराम भालेकर, मा.धनंजय आल्हाट, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२३३० दि.१.०९.२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा केंद्र शासनाच्या “स्मार्ट सिटी” योजनेकरिता पुणे महानगरपालिकेसमवेत समावेश करणेत आला आहे. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा एकत्रित समावेश करुन राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस केली असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका निकष पूर्ण करीत असूनही “स्मार्ट सिटी” योजनेत समावेश झालेला नाही. तरी केंद्र शासनाच्या “स्मार्ट सिटी” योजनेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्वतंत्रपणे समावेश करण्याकरिता राज्य शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अतूल शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर स्मार्टसिटी संदर्भात आपण सर्वजण येथे जमलेलो आहोत. केंद्रशासनाने जी स्किम काढली त्या स्किममध्ये प्रत्येक राज्यातून स्मार्ट सिटी अंतर्गत आपल्याला निधी मिळणार होता.

महाराष्ट्राला १० शहराचा कोटा मिळालेला होता आणि त्याच्यामध्ये आपल्या शहराला ९२.५० % मार्क पडले व पुणे महापालिकेला ९५ % मार्क पडले हे आपण आपल्या सोर्स प्रमाणे काढलेले आहेत. औरंगाबाद महापालिकेला ९० % मार्क पडले, नागपुर महापालिकेला ९२ % मार्क पडले, कल्याण-डोंबिवली महापालिकेला ८२ % मार्क पडले. सुरवातीच्या काळात पुणे व पिंपरी चिंचवड अशी दोन्ही नाव आली. सर्व सभागृह सर्व अधिकारी, प्रत्येक नागरीक खुष होते की आपल्याला स्मार्ट सिटीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. ही स्पर्धा होती त्या स्पर्धेमध्ये त्यांनी जो क्रायटेरीया धरला त्यात आपण पास झालो परंतु अचानक आपले नाव काढण्यात आले. महापौर मॅडम त्यावेळेला तुम्ही नव्हतात तुमच्या येथे दु:खद निधन झालेल होते. ज्यावेळेला संभ्रम निर्माण झाला की पुणे का पिंपरी चिंचवड का विभागून बक्षीस दिलेले आहेत त्यावेळेला मी, प्रभाकरजी वाघेरे, मंगलाताई कदम, मा.अजीतदादा पवार आम्ही सर्वजण मा.मुख्यमंत्री यांना भेटलो त्यावेळेला त्यांनी असे सांगीतले की, तुम्ही काळजी करण्याचे काहीच कारण नाही तुम्ही पाचच्या आतमध्ये आहात व महाराष्ट्राला दहाचा कोटा मिळालेला होता. आम्हांला वाटल आपल्याला न्याय मिळेल त्यामध्ये आम्ही राहिलो पण अचानक हा स्फोट झाला आणि आपल्याला बाहेर काढले हे कुठेतरी चुकीचे वाटते. संपुर्ण देशाची अम्ही लिस्ट मागवली की कुठल्या कुठल्या शहराला यामध्ये न्याय देण्याच काम केलं. त्यामध्ये असे लक्षात आले की पुणे महापालिकेची लोकसंख्या ३५ लाख आणि पिंपरी चिंचवड महापालिकेची लोकसंख्या २२ लाख वास्तविक पाहता काही महापालिकेला असा कोटा मिळालेला आहे की सिक्कीम १२१९०, वेस्टबेंगॉल ३६५०० असे आठ शहर आहेत की त्यांची लोकसंख्या एक लाखाच्या आतमधली आहे. त्यामध्ये ही शहर आहेत. पणजी, दिवदमण, कोलकत्ता, अरुणाचल प्रदेश या शहराची लोकसंख्या एक लाखाच्या आतमधली आहे. मी दादांशी बोललो, ते म्हणाले त्यांच्या लोकसंख्ये प्रमाणे त्यांना फंडस् कमी मिळेल. माझ्या प्रभागामध्ये मी ज्यावेळेला निवडून आलो त्यावेळेला १६ हजार लोकसंख्या होती आणि आज लोकसंख्या जरी वाढली तरी ती २० हजार असेल. माझ्या प्रभागामध्ये १०० कोटी डायरेक्ट देणार, आज बोपखेलची काय परिस्थिती आहे बोपखेलची लोकसंख्या पाहिलीतर बोपखेलला १०० कोटी देणार? हे काहीतरी चुकीचे वाटत नाही का? १९८६ साली आपली महापालिका स्थापन झाली त्यावेळेला आपली लोकसंख्या पाच लाखाच्या आसपास होती आणि आज तीस वर्षामध्ये आपल्या महापालिकेची लोकसंख्या जवळ जवळ २२ लाखाच्या आसपास आहे. आपल्याला काय गरज होती या गोष्टीची. आज आपण पवना धरणातून पाणी घेतो. पुढे जावुन आपल्याला भामा-आसखेडचा पाणीपुरवठा व्हायला पाहिजे. त्यासाठी शासनाच म्हणणं असं आहे की तुम्ही धरण बांधायला जो खर्च झालेला आहे तो २१७ कोटी. जर आपल्याला निधी मिळालातर तो आपण लगेच त्यांना देवून मोकळ होवू. पुणे शहरासाठी अपल्या हद्दीतून पाईपलाईन चाललेली आहे व आपण मुग गिळून गप्प बसतो हे चुकीचे वाटत नाही का? कच-याचा प्रश्न आहे. रोज ४०० टन कचरा साठतो फक्त २००

टनावर प्रक्रीया करतो. जर हे कॅलक्यूलेशन केलंतर १० लाख टन कचरा येत्या पाच वर्षात तयार होणार आहे. मग तो काही कचरा साठू दयायचा का? आज स्मार्ट सिटी म्हणतो ती कशासाठी. मी स्वत: डिक्लेअर केलेले आहे की ही सिटी मी वायफाय करणार. त्यात आपल्या शेजारी आयटी पार्क आहे. आज आपली मुलं शिकलेली आहेत. आज कुठल्याही घरात गेलतर तो घरातला माणुस म्हणतो की माझा मुलगा इंजिनीअर आहे. आज आमचीही मुलं इंजिनीअर झालीत आम्हांलाही वाटत की त्यांनीही वायफाय वापरावं पण या वायफायचा खर्च किती आहे. २० कोटीचा खर्च आहे तो आपण करु शकत नाही. आज आपली एलबीटी गेलेली आहे. मी काही कुठल्या पक्षीय याच्यात बोलत नाही. ख-या अर्थाने आपल्याला स्मार्ट सिटीची गरज होती. ही एक स्पर्धा होती त्या स्पर्धेमध्ये आपण पास झालो होतो त्यामुळे यामध्ये शंभर टक्के घ्यायला पाहिजे होते. मी सभागृहाच्या वतीने मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की आम्हांला कृपाकरुन स्मार्ट सिटीमध्ये पिंपरी चिंचवडला घ्यावे जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.नारायण बहिरवाडे -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. केंद्रशासनामार्फत शहरी लोकांचे जीवनमान उंचावेल म्हणून स्मार्ट सिटी अभियान ही योजना केंद्राने जाहीर केलेली आहे. या योजनेचा कालावधी पाच वर्षाचा राहणार आहे. संपुर्ण देशामधुन १०० शहरे ही स्मार्ट सिटी म्हणून निवडली जाणार आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या वाटयाला दहा शहरे आलेली आहेत. या दहा शहरामधुन कोणाची निवड करायची याच्यासाठी केंद्रसरकारने काही निकष ठेवलेले होते ते १३ प्रकारचे निकष ठेवण्यात आलेले होते आणि त्याला १०० मार्क दिलेले होते. निश्चितपणे ज्याला जास्त मार्क मिळेल त्याचा समावेश या स्मार्ट सिटीमध्ये केला जाणार होता. या संपुर्ण योजनेसाठी केंद्रसरकार ४८ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. शहराला प्रतीवर्ष १०० कोटी रुपये हे केंद्रसरकारचे, ५० कोटी रुपये राज्यसरकारचे आणि आपला ५० कोटी रुपयाचा स्वहिस्सा असे दरवर्षी २०० कोटी रु. स्मार्ट सिटीसाठी मिळणार होते. १३ प्रकारचे निकष लावण्यात आलेले होते. यासाठी त्यांनी शहरामध्ये स्पर्धा ठेवलेली होती आणि या स्पर्धेसाठी एक अतीशय चांगल्या पध्दतीचे सादरीकरण आपल्या महापालिकेच्या वतीने करण्यात आलेले होते. मी खरंतर मा.आयुक्त, राजीव जाधव यांचे मनापासून अभिनंदन करेल. त्यांनी अतीशय चांगल्या पध्दतीच सादरीकरण शासनाव्दारी, याठिकाणी केलेले आहे. पोमण साहेब व इतर काही अधिकारी असतील या सर्वांनी अतीशय चांगल्या पध्दतीने स्मार्ट सिटीमध्ये आपला समावेश व्हावा म्हणून प्रयत्न केलेले आहेत. या १३ निकषांपैकी जवळ जवळ ११ निकषांमध्ये आपल्याला पैकीच्या पैकी मार्क मिळालेले आहेत. फक्त दहावा निकष पाणीपुरवठा अस्थापना आणि देखभाल खर्चाची टक्केवारी होता त्यात २०१४-१५ मध्ये दहा पैकी आपल्याला फक्त साडेसात मार्क मिळालेले आहेत. याचे कारण असे आहे की सन २०१४-१५ मध्ये ५२ कोटी ७ लाख रुपये आपल्याला पाणीपट्टीव्दारे यायला पाहिजे होते ती रक्कम आपण जमा करु शकलो नाहीत. आपली ३० ते ३२ कोटी रक्कम जमलेली

आहे आणि जवळ जवळ ६० टक्क्या पर्यंत आपण पोहचलेलो आहोत. जमा आणि खर्च याचा कुठेतरी मेळ जमलेला नाही त्यामुळे याठिकाणी आपले आडीच मार्क कमी झालेले आहेत आणि या निकषांमध्ये आपल्याला दहा पैकी साडेसात मार्क मिळालेले आहेत. जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजुर प्रकल्पांपैकी पुर्ण झालेल्या प्रकल्पाची टक्केवारीत दहा मार्क होते त्या दहा पैकी आपल्याला फक्त पाचच मार्क मिळालेले आहेत. म्हणजे हे बघता आपल्याला साडेसात मार्क कमी मिळालेले आहेत. असे एकूण ९२.५ एवढे मार्क आपल्याला मिळालेले आहेत. याचाच अर्थ असा आहे की, आपण ही परिक्षा उत्तीर्ण झालेलो आहोत परंतु आपल्याला सरकारने सर्टिफिकेट दिलेले नाही. आपल्याला नापास केलेल आहे. अतीशय उत्तम पध्दतीचे सादरीकरण केलेले असताना देखील बाबासाहेब, पुण्याबरोबर पिंपरी चिंचवडचे नाव पाठविण्याची वास्तविक पाहता काही आवश्यकता नव्हती. हे आपल स्वतंत्र शहर आहे, अतीशय चांगल्या पध्दतीनं विकास झालेल शहर आहे आणि या परिक्षेमध्ये अतीशय चांगल्या पध्दतीचे मार्क मिळालेले असताना देखील पुण्यासह पिंपरी चिंचवडचे नाव देणे यातच मुळात राजकारण झालेले आहे निकषानुसार स्पर्धा होवून चांगले मार्क मिळालेले आहेत. राज्यशासनाने ११ शहराचे नाव पाठविलेले आहे. पुणे व पिंपरी चिंचवडचा एकत्रीतपणे प्रस्ताव पाठविलेला आहे. जी नाव पाठवली त्याच्यामध्ये बृहन्मुंबई नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबीवली, नाशिक, नागपुर, आमरावती, औरंगाबाद, सोलापूर आणि पुणे अशी ही नावे केंद्रसरकारकडे पाठविली. ज्यावेळी केंद्रसरकारने पाहिले की महाराष्ट्रातून ११ नाव आलेली आहेत त्यावेळी त्यांनी सांगीतले की पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड शहर हे वेगवेगळे शहर आहेत, दोन्ही शहरात स्वतंत्र महापालिका आहे त्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण होवू शकते त्यामुळे त्यांनी ते नाव परत पाठवली आणि राज्यशासनाला सांगीतले की तुम्ही फक्त एकच नाव पाठवा, एकच नाव पाठवायच म्हणल्यानंतर नाव पाठवायचे कोणाचे हा प्रश्न ख-या अर्थाने निर्माण झालेला आहे. आज राज्यामध्ये भाजपचे सरकार आहे. शिवसेनेच्या खासदारानी, शिवसेनेनी प्रयत्न केलेले आहेत. सुलभाताईनी देखील पत्र दिलेले आहे की स्मार्ट सिटीमध्ये आपला समावेश झाला नाही म्हणून स्पेशल जी.बी. घ्यावी म्हणून. सरकारमध्ये जरी असलेतरी पिंपरी चिंचवड्या स्मार्टसिटीमध्ये समावेश करु नका असं म्हणलेल मी तरी कुठं वाचलेल नाही, बाबासाहेब. त्यामुळे दोन पैकी एक नाव पाठवा हे ज्यावेळी सांगण्यात आले त्यावेळेला पुण्याचे पालकमंत्री, केंद्रीय मंत्री मा.प्रकाश जावडेकर, भाजपचे जवळ जवळ आठ ते दहा आमदार यांनी सगळयानी दबाव आणुन पुण्याचे नाव पुढे केले आणि पिंपरी चिंचवडला वगळलेलं आहे ही शहराच्या दृष्टीकोनातून बघीतलतर अतीशय दु:खद घटना आहे. हा आपल्या शहरावरती झालेला अन्याय आहे. आपले नाव का वगळण्यात आलं याबाबत संपुर्ण शहरामधुन, राज्यामधुन यासाठी अनेक लोकांनी फोन करुन विचारले एवढे मोठे शहर असताना की ज्या शहराला संपुर्ण देशामध्ये ६५ शहरामधुन बेस्ट सिटीच ऍवॉर्ड मिळालेला आहे म्हणजे बघा आपल शहर किती स्वच्छ आहे.

आपल शहर किती चांगल आहे, आपल्या शहराच इन्फ्रास्ट्रक्चर किती चांगले आहे, मग आपली पाणीपुरवठयाची योजना असो, ड्रेनेजचे काम जवळ जवळ ८० टक्के पुर्ण झालेले आहे, काही भागात २४ तास पाणी देतो. १६२ ली. पाणी प्रती माणसी देतो. केंद्रशासनाचा क्रायटेरीया १३५ ली.चा आहे. बाकी इन्फ्रास्ट्रक्चर रस्ते असतील, उड्डाणपुल असतील, स्वच्छता असेल, आरोग्य असेल या सगळया बाबतीमध्ये इतर शहरापेक्षा आपण पुढे आहोत असे असताना आपल्या शहराचे नाव वगळणे हा आपल्यावरती सरकारने केलेला अन्याय आहे. या अन्यायाला कुठेतरी वाचा फोडावी म्हणून या सभेचे आयोजन केलेले आहे. ई-गव्हर्नींगसाठी आपल्याला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. १२ प्रकारच्या सेवा आपण ई-गव्हर्नींगव्दारे देत आहोत. त्यामध्ये मिळकतकर असेल, पाणीपट्टी असेल, जन्म-मृत्यू नोंद असेल, बांधकाम परवाना असेल, राईट टू सर्व्हिस ॲक्ट, सारथी सारखी योजना आहे. सारथी सारखीतर योजना देशामध्ये कुठेही नाही अशा पध्दतीची चांगली योजना याठिकाणी आहे. नागरीकांच्या तक्रारीची तातडीने दखल घेवून त्यावरती कारवाई करणे याच्यासाठी दिल्लीतील कृषीमंत्रालयात देखील आपल अनुकरण केलेल आहे. एवढी चांगल्या पध्दतीची सेवा देशपातळीवर कुठल्याही महापालिकेमध्ये नाही ती सेवा आपण देत आहोत. पुणे महापालिकेने सुध्दा याठिकाणच अनुकरण केलेले आहे. जेएनएनयुआरएम बाबतीमध्ये पण सुरवातीला आपल झालेल होत पुण्याच्या सोबत आपलं नाव त्याठिकाणी दिलेले होते. त्यावेळेला आदरणीय पवार साहेब यांच्या मदतीन आपला समावेश केला आणि जेएनएनयुआरएमचे आपल्याला दोन हजार कोटी रुपये मिळाले आणि या दोन हजार कोटी रुपयामुळे या शहराचा चेहरामोहरा बदलेला आहे. अतीशय चांगल्या पध्दतीची विकास काम झालेली आहेत. याठिकाणी मला खेदानं असं म्हणावस वाटत की मा.अजीत पवार यांच्या नेतृत्वाखाली या शहरामध्ये गेली १५ वर्षे जो काही विकास झालेला आहे हा विकास भाजपच्या पचनी पडलेला नसावा म्हणून त्यांनी आपल्या या शहराचे ख-या अर्थाने नाव वगळलेले आहे असा मला स्पष्ट आरोप करावसा वाटतो. कोणत्याही शहराची निकषानुसार निवड करायची हा राज्यसरकारचा अधिकार होता कारण आपणतर कुठेच कमी पडलेलो नाहीत. दिवसरात्र आयुक्त साहेबांनी अभ्यास केला. चांगल्या पध्दतीच सादरीकरण केलं. नगरसेवकांना समाविष्ट करुन घेतलं. शहराच्या नागरीकांना आपण समाविष्ट करुन घेतल. आम्हांला देखील सगळयाना वाटले की काहीही झालेतरी स्मार्ट सिटीमध्ये आपला समावेश हा ठरलेलाच आहे याच्यामध्ये कोणीही नाकारु शकत नाही कोणी बाहेर काढू शकत नाही परंतु याच्यामध्ये पक्षीय राजकारण आल्यामुळे आपल्या शहराला वगळलेले आहे.

**मा.महापौर -** ही विशेष सभा आहे, स्मार्ट सिटी बाबतचे मुद्दे मांडावेत.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब, सर्वाधीक वेगाने वाढणारे हे शहर आहे. आता शितोळे साहेबांनी सांगीतल २२ लाख लोकसंख्या या शहराची आहे. ७० टक्के स्त्रोत आहे, आपल्या शहराचा. परवा बातमी आली की इंटरनेट वापरणारे संपुर्ण देशामध्ये पिंपरी चिंचवड

शहर हे चौथ्या क्रमांकाचे शहर आहे. म्हणजे एवढ आपल शहर पुढे गेले आहे, एवढ आपल शहर ऑलरेडी स्मार्ट आहे. परंतु आता एलबीटी बंद झालेली आहे ७०० कोटी रुपये आपल्याला दरवर्षी फटका बसणार आहे. लोकसंख्या वाढलेली आहे मग या लोकांना नागरी सुविधा देण्यासाठी पैसे कुठून आणणार. ही शासनाची जबाबदारी नाही का? आपले उत्पन्नाचे स्त्रोत जरी मजबुत असलेतरी तरी शेवटी पैसा हा पैशाचच काम करु शकतं. सुरवातीला ज्यावेळी शहर वगळायचं कसं किंवा महाराष्ट्रातील शहराला कसं प्राधान्य दयायचं, त्यावेळी एक विषय पुढ आला की विभागीय समतोल साधण्यासाठी काही शहराची निवड करावी असा त्यांनी मुद्दा मांडला. साधारणत: पिंपरी चिंचवडला नाकारायचतर कस नाकारायच म्हणून त्यांनी हा मुद्दा पुढे आणला. महाराष्ट्रात ६ विभाग आहेत. त्यांनी सुरवातीला नाशिक मधुन नाशिकची निवड केली, आमरावती मधुन आमरावतीची निवड केली, औरंगाबाद मधुन औरंगाबादची निवड केली, नागपूर मधुन नागपूरची निवड केली आणि पुण्यामधुन पुणे आणि सोलापूर हे दोन शहर घेतली आणि कोकण विभागातून बृहन मुंबई ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबीवली. एकटया कोकण विभागातून त्यांनी चार शहरे घेतली, हा काय समतोल साधला. तुम्हांला जर समतोल साधायचा असेलतर पुणे राहु दया, सोलापुर राहु दया तुम्ही कल्याण-डोंबीवलीसाठी करा. हे त्यांनी केलेल नाही. त्यांचा डोळा फक्त पिंपरी चिंचवडवर होता, कारण पिंपरी चिंचवड याच्यामध्ये बसले नाही पाहिजे म्हणुन त्यांनी युक्तीवाद केला. विभागीय समतोलाच्या नावाखाली बाकीचे शहर त्यांनी काढुन घेतली. पुणे विभागात फक्त पुणे आणि सोलापूर ठेवले आणि आपल्याला त्यांनी वगळलं. सोलापूरसाठी फार मोठे लॉबींग झालेले आहे. माहिती घेतली असता असं समजल की सोलापुरचे खासदार शरद बनसोडे हे आहेत. महाराष्ट्राचे मुख्य सचिव मा.स्वाधीन क्षेत्रीय यांच मुळगाव देखील सोलापूर आहे. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मा.म्हैसकर यांच गाव देखील सोलापूर आहे आणि विशेष म्हणजे प्रविणसिंह परदेशी हे देखील सोलापूरचेच आहेत ते सोलापूरचे कलेक्टर देखील होते. ही सगळी शासनाची बडी मंडळी याठिकाणी बसलेली असताना यांनी सोलापूरसाठी लॉबींग केल आणि सोलापुर शहराचा प्रवेश स्मार्टसिटीमध्ये करुन घेतला. मला याठिकाणी कुठल्या शहराला नाव ठेवायची नाहीत. पण साहेब, तुम्ही सोलापुरमधुन कधी गेला होतात का, सोलापुर शहर कसं आहे ते एकदा बघुन घ्या किंवा शासनालाही दाखवा. सुलभाताई तुम्ही जर कधी गेला असाल सोलापुरला तर रस्ते धड नाहीत, आरोग्याचा इतका मोठा प्रश्न सोलापूरला आहे, सोलापुरमध्ये पाणी देखील नाही.

**मा.महापौर -** आपल्या शहराचे मुद्दे मांडावेत. काय काय करता येईल ते मुद्दे मांडावेत.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब, आपल्यावर अन्याय झालेला आहे. सोलापूर सारख्या शहराचा समावेश होतो मग आपण सभागृहामध्ये बोलायच नाही का? अन्याय कोणामुळे झालाय, पुणे डिव्हीजनमध्ये पुणे आणि सोलापूर घेतल्यामुळे अन्याय आपल्यावर झालेला आहे सोलापूर पेक्षा आपण कितीतरी सरस आहोत हेच मला सभागृहाला दाखवायच आहे शासनाला

दाखवायच आहे. इथं शासनाने चुक केलेली आहे मग ती शासनाच्या निदर्शनास आणुन दयायला नको? मग सोलापुरची तुलना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करायला नको? असं हे असताना सोलापुरचं होतय आणि आपल होत नाही हा आपल्यावर अन्याय नाही का?

**मा.महापौर-** आपल्या शहराचे अजून चांगले मुद्दे मांडा.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब, शहराचे सगळेच मुद्दे मांडले ९२.५ टक्के मार्क मिळाले याच्यामध्येच आपण पास झालो. असं असताना देखील आपला समावेश झाला नाही, पुण्याचा समावेश झाला, त्यांचा का झाला ते आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे का, आपल्यापेक्षा सरस आहे का, मग हे मुद्दे सभागृहास कळायला नको का? मग हे आम्ही बोलायच नाही का? तुम्ही असं काय बोलता महापौर साहेब, विषय सोडूनतर मी बोलत नाही नां, विषय धरुनच मी बोलतोनां. ही सगळी मंडळी शासनामध्ये बसलेली असताना यांनी लॉबींग केल आणि सोलापुर शहराचा समावेश करुन घेतला आणि आपल शहर त्यांनी वगळल आहे आणि आपल्यावरती अन्याय केला आहे. आमरावरतीच्या बाबतीत जर आपण बघीतल, अमरावती शहर घेतलेले आहे पण मध्यंतरी पेपरला बातमी आली होती की अमरावती महापालिकेच्या कर्मचा-यांचा पगार देखील वेळेवर होत नाही. नागपुर महापालिकेने दोन महिन्याचा पगार केलेला नाही. याच्यामध्ये दरवर्षाला १०० कोटी केंद्रसरकारचे, ५० कोटी राज्यसरकारचे आणि ५० कोटी रुपये स्वहिस्सा आहे. मला नाही वाटत अमरावती शहर स्वहिस्सा भरु शकेल. हे शहर ५० कोटी रुपयाचा हिस्सा भरु शकत नसेलतर ते काय ही योजना राबवणार. हे शासनाने बघायला नको का? हे या सभागृहामध्ये आपण बोलायला नको का? जी महानगरपालिका महिन्याचा कर्मचा-यांचा पगार देवू शकत नाही ती स्मार्टसिटीमध्ये येते मग इतके ५० कोटी रुपये स्वहिस्सा कुठून भरणार ते. सोलापूरचा समावेश होतो, अमरावतीचा समावेश होतो मग आपला का होत नाही. मग हा आपल्या शहराचा अपमान नाही का? हा आपल्या शहराचा घोर अपमान आहे. आपला कुठल्याही परिस्थितीमध्ये समावेश करायला पाहिजे. ४८ हजार कोटीची योजना आहेनां ती ५० हजार कोटीची करा पण पिंपरी चिंचवडला डावलू नका कारण ती पास झालेली आहे. एखादा विदयार्थी दिवसरात्र अभ्यास करुन पास झाल्याच्यानंतर त्याला प्रवेश नाही तु नापास झाला तुला सर्टिफिकेट देता येत नाही अशा पध्दतीन हाकलून दयायचं असं आमच आपिल आहे. मग या विषयी आपल्याला बोलायला नको का? आणि पालकमंत्री म्हणतात तुम्हांला विशेष पॅकेज देवू. ते पॅकेज आपल्याला नकोयेत. स्मार्टसिटीमध्ये समावेश होणे हा आपला हक्क आहे, आपला तो हक्क आहे, आम्हांला पॅकेजची वगैरे काही आवश्यकता नाही आमचा स्मार्टसिटीमध्ये समावेश करा असं पालकमंत्र्यांना देखील आपण सांगीतले पाहिजे. पुणे आणि पिंपरी चिंचवड मेट्रोचा प्रकल्प आपण एकत्र राबवतो पीएमपीएमएलची वाहतूक व्यवस्था आपण एकत्रपणे राबवतो याच्यासाठी आपण ४० टक्के रक्कम देतो. उदया जर आपण पीएमपीएमएल आणि मेट्रो मधुन बाहेर पडलोतर पुणे शहर ही एकटी योजना करु शकते का?

नाही करु शकत. हे जॉईन्टलीच होणार आहे. मेट्रोचा प्रकल्प असेल किंवा पीएमपीएमएलचा प्रकल्प असेल हा प्रकल्प एकटयानी करायला पाहिजे, तर तो होणार नाही. त्यासाठी अपण सर्व ताकद पणाला लावून आमचे आदरणीय नेते मा.आजीतदादा परवा दिवशी म्हणाले स्वत: मा.पवारसाहेब मा.पंतप्रधानांना भेटणार आहेत, मा.व्यंकय्या नायडूनां भेटणार आहेत. त्यांना सगळी वस्तुस्थिती समजून सांगणार आहेत आणि आम्ही निश्चितपणे प्रयत्न करुन या शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश करावा अशा पध्दतीच आम्ही मांडणार आहेत परंतु या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महापौर तुमच पण आम्ही अभिनंदन करतो की, आपण या आजच्या सभेचे आयोजन केल आणि या शहराचा समावेश स्मार्टसिटीमध्ये व्हायला पाहिजे, कारण आपण काही कोणाला भीक मागत नाही तो आपला अधिकार आहे तो आपला हक्क आहे आणि तो आपण मिळवणारच एवढच याप्रसंगी सांगतो.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहातील माझे सर्व ज्येष्ठ नगरसेवक, अधिकारी आणि पत्रकार मित्र. प्रत्येक शहराच एक आयडेन्टीफिकेशन असतं, शहराची एक ओळख असते. सुरवातीला प्रस्ताव सादर करताना सांगीतलेल होत की पुणे, पिंपरी चिंचवडच्या आम्ही एकत्रीतपणानं प्रस्ताव सादर करु. ठिक आहे काही हरकत नाही. पण ज्यावेळेला केंद्रसरकारच्या स्मार्टसिटीची यादी जाहीर झाली आणि आमच शहर वगळल गेलं त्यावेळेला मात्र दु:ख झालं. दु:ख यासाठी झालं की आयुक्त साहेबांनी अतीशय चांगल सादरीकरण केल. केंद्रसरकारच्या सर्व निकषावर आपण एक पाऊल पुढच ठेवलं. ९२.५ टक्के आपल्याला मार्क मिळाले. पण शेवटी कोणाला स्मार्टसिटीत घ्यायच कोणाला घ्यायच नाही हा सर्वस्वी अधिकार त्यांचा असल्यामुळे आपल्याला यातून बाहेर पडावे लागले यातून एक गोष्ट निश्चित लक्षात येते आपले हे पिंपरी चिंचवड शहर जरा डोळयासमोर आणावे, खुप जुनी माणसं, अधिकारी या सभागृहात आहेत. नांदेड-वाघाळा नगरपालिकेची महापालिका व्हायला २२ वर्षे लागले. संभाजीनगरची नगरपालिकेची महापालिका व्हायला २५ वर्षे लागले. सांगली-मिरज-कुपवड नगरपालिकेची महापालिका व्हायला २० वर्षे लागले. गुजरात राज्याच्या सुरत नगरपालिकेची महापालिका व्हायला ५३ वर्षे लागले. आपला ७८ ते ८६ हा स्पॅन खुप शॉर्ट स्पॅन आहे याच स्पॅनमध्ये या पाच-सात वर्षाच्या काळामध्ये नगरपालिकेची महापालिका झालेल हे आशियाई खंडातील फार मोठे उदाहरण आहे. मुंबई शहर हे वाढते शहर आहे असे म्हणतात लोंढे येतात असं आहे आपण म्हणतो पण त्या मुंबई महानगरापेक्षा सुध्दा आपल्या शहराचा ग्रोथ आणि येणा-या लोकांची संख्या ही जास्त आहे हे संशोधनान, अभ्यासान सिध्द झालेली गोष्ट आहे. वाढत्या लोकांची वाढती लोकसंख्या, वाढत्या गरजा लक्षात घेवून या शहरान फार मोठ इन्फ्रास्ट्रक्चर या देशाच्या समोर उभ केलेल आहे हे आपल्याला नाकारुन चालणार नाही. परवा मी डेन्मार्क शहराची ओळख म्हणून एक नेटवर कार्यक्रम पाहत होतो डेन्मार्कचे माजी खासदार ते आता माजी खासदार आहेत पण त्यांचा मुलगा आता खासदार

आहे त्याचे वडील खासदार होते कोपरहेगनचे. कोपरहेगन हे अतीशय सुंदर शहर. त्याचा उल्लेख परवा तेल अविव शहराचे चीफ नॉलेज ऑफिसर जोहार शेरॉन यांनी सांगीतलेले आहे राजकीय मतभेद काहीही असोत पण जेव्हा आमच शहर आहे म्हणतो त्यावेळेला आम्ही आमचे राजकीय मतभेद बाजूला ठेवतो आणि हे शहर माझ आहे याचा विचार झाला पाहिजे जगाच्या स्पर्धेत हे शहर आल पाहिजे ही आमची भावना सुरवाती पासूनची आहे. जोहार शेरॉन यांनी सांगीतले ज्यावेळेला इस्त्राईल उभा राहत होता त्यावेळेला इस्त्राईलची राजधानी तेल अविव उभी राहत असताना त्यावेळेला आम्ही तिथल्या जनतेला, लोकलला एकच त्यांनी प्रश्न विचारला की तुम्हांला म्युनिसिपालिटी आणि हे शहर या विषयी काय वाटतं. तर त्यांनी सांगीतल म्युनिसिपालिटी लोकांमध्ये मतभीन्नता आढळली काही तर्कवितर्क आढळले पण ज्यावेळेला या शहरा विषयी विचारलं त्यावेळेला तिथल्या प्रत्येक नागरीकांनी सांगीतले, तो कुठल्याही पक्षाचा असेल, कुठलीही मतभीन्नता न ठेवता हे शहर माझे आहे आणि आपल्याला सर्वांना मिळून ते उभे करायचे आहे ही भावना ज्यावेळेला बळावते, ही भावना ज्यावेळेला अंकुर येते त्यावेळेला हे शहर विकासाच्या दिशेन जात असतं. जगातील अनेक शहराचा आपण विचार केलातर आपल्याला ते लक्षात येईल. निकषाच्या बाबतीत आपण खरंच कुठेही कमी पडलेलो नाहीत अस मला वाटतं. यात होतं कसं की कशामुळे डावलले गेल, तर शेवटी मग राजकारण येतं. हि काही राजकीय व्यासपीठ नाहीत की राजकीय भाष्य इथं चालणार नाहीत पण नाही म्हणलेतरी शेवटी राजकारणामुळेच आम्ही या स्पर्धेतून बाहेर पडलेलो आहोत असे म्हणावे लागेल. पुणे आणि पिंपरी चिंचवड जर डोळयासमोर घेतलेतर ख-या अर्थान केंद्रशासनास जर विकास साधावायचा होतातर आणि भारताच्या नकाशावर एक अग्रगण्य शहर म्हणून आपल्याला पुढे न्यायच होत तर ते खर शहर होत पिंपरी चिंचवड. याच कारण असं आहे की आपण जर या शहराची भौगोलीक परिस्थिती पाहिली, झालेले डेव्हलप इन्फ्रास्ट्रक्चर पाहिल आणि उदयाच्या कार्यान्वित योजनांचा पाढा जर वाचायला गेलोतर हे शहर डेव्हलप करण्याजोगे शहर आहे. एक मॉडेल शहर म्हणून या पिंपरी चिंचवडकडे बघीतलच जायला पाहिजे होतं. आज मेट्रोचा, पीएमपीएमएलचा किंवा काही जॉईन्ट व्हेन्चरचा प्रोजेक्ट पिंपरी चिंचवड महानगरपालिकेन पुण्याच्या सोबत राबवले. ४० टक्याची आपली गुंतवणुक आहे त्यांच्याबरोबर असं करत असताना पुढे आपण पीएमपीएमएलला पैसे दयायचे का? पुढे आपण मेट्रोला पैसे दयायचे का? किंवा काही जॉईन्ट व्हेन्चरच्या योजना असतीलतर त्यांच्यासाठी आपण पैसे दयायचे का? आज केंद्रसरकार, राज्यसरकार आणि स्वत:चा स्वहिस्सा असे मिळून पाच वर्षासाठी ही योजना होती आणि हे शहर उभे करण्यासाठी आज आमचे ज्येष्ठ नगरसेवक बहिरवाडे सरांनी सांगीतले की चौथ्या क्रमांकाचे हे शहर आहे ते इन्टरनेट आणि वायफाय वापरते. आज पासष्ठ इन्टरनॅशनल फॅक्टरी येथे आहेत आणि साडेपाच हजार स्मॉलस्केल इन्डस्ट्रीज येथे आहेत. आज आयटीमुळे पिंपरी चिंचवडकडे जग बघतयं आपला देश म्हणुन

चालणार नाहीतर जग बघतय आपल्याकडे. रोज नवा शोध लागतो, रोज एक नवी गाडी रस्त्यावर येते आणि या शहराच्या आजुबाजूला जे कारखाने आहेत आज ख-या अर्थाने जगाच्या तुलनेमध्ये या शहराकडे बघण्याचा दृष्टिकोन जगाने बदललेला आहे आणि आम्हांला तुम्ही वगळताय. हा आमचा अपमान नाही तर या शहरातील प्रत्येक व्यक्तीचा अपमान आणि अवमान झालेला आहे असं मला वाटतं. आम्ही विनंती करणार आहोत राज्यसरकारला, केंद्रसरकारला, या शहराला पायाभूत सुविधा देता येतील तेवढया पालिकेच्या वतीने देण्यात आलेल्या आहेत. पालिका प्रशासन काम करतं आहे. तुमच्या सादरीकरणावर आम्ही कुठं कमी पडलो. आम्हांला डावलण्यासाठी प्रमुख कारण काय आहेत? ई-गव्हर्निंग पासून ते जेएनएनयुआरएम पर्यंत, ठीक आहे काही गोष्टी घडल्या असतील, मी असं म्हणणार नाही १०० टक्के आम्ही बरोबर केले आहे, भ्रष्टाचार कुठे नाही. अमरावती महापालिकाकडे पैसा नाही हा प्रश्न आहे, अकोला महापालिकेची नगरपालिका करावी लागली हा विदर्भातील काही शहरांचा प्रश्न आहे. राज्यसरकारला हे कळत नाही? आज आमच्या शहरामधले उत्पन्नाचे सोर्स लक्षात घेतलेतर, येथे डेव्हलप झालेल इन्फ्रास्ट्रक्चर लक्षात घेतलतर, येथे रोज नवीन कारखाने येतात, हजारो तरुणांच्या हाताला काम तिथ देतात, चांगले रस्ते तयार होतात, या सगळया गोष्टीचा जर विचार केलातर आम्ही ऑलरेडी स्मार्ट आहोत पण एक पाऊल पुढे राहून आम्हांला केंद्रसरकारन या योजनेमध्ये समावेश करायलाच हवा होता येथून पुढच्या काळामध्ये, सर्व पक्षाचे नगरसेवक येथे आहेत, हा पक्षाचा वाद नाही. या सभागृहामध्ये आपण ज्यावेळेला येतो त्यावेळेला या सभागृहाचे आपण आहोत या शहराचे आपण आहोत, टिकाटिप्पणी करुन भागणार नाही. काल एका पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी सांगीतले की तुमचे निकष कमी पडले म्हणून तुम्हांला डावलण्यात आलं आहे अशी वर्तमानपत्रामधली बातमी आहे. ९२.५ टक्के हे निकष कमी आहेत का आणि म्हणून आपण सर्वानी एकत्रीतपणे या शहरामध्ये जीवंतपणा कसा येईल हे आपण ख-या अर्थाने बघीतल गेल पाहिजे. या शहरामध्ये स्मार्टसिटीत कसा याचा उपयोग होईल हे पाहिले पाहिजे. आज जगाच्या तुलनेत पाहिल गेलंतर सिटीप्राईड कोपरहेगन आहे, लंडन आहे या शहराच्या तुलनेत पिंपरी चिंचवडचे नाव कसे येईल याचा आपण विचार करावा. मा.महापौर साहेब, आपण या विशेष सभेच आयोजन केल त्याबद्दल आपले आभार मानतो एवढे बोलून थांबतो. जयहिन्द, जयमहाराष्ट्र.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. आता मला असा प्रश्न पडला की, "आता कसं वाटतय", हे विचारलेतर प्रत्येकाच्या मनामध्ये आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. गेली तीन वर्षे आम्ही सांगतो असे करा तसे करा कोणीही ऐकूण घेत नव्हते. आम्ही विरोधामध्ये होतोतर सत्ताधारीनी याचा विचार केला नव्हता ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आयुक्त साहेब आपण गेलात आपल्याला मतदान चांगल पडलं. मला यावेळेला सरांची आठवण येते, आपल्याला माहित असेल सरांचा इतिहास बघीतला

सरांने ज्यावेळेला महानगरपालिकेचे संपुर्ण डेव्हलपमेंट करण्यासाठी प्रत्येकवेळेला संपुर्ण पक्षाच्या लोकांना एकत्रीत बसून ते चर्चा करायचे. त्यांच्या मनात असे काही वाटत नव्हत, त्यावेळेला मला सुध्दा ते बोलवायचे. विरोधीपक्षनेत्यांना बोलवायचे. त्यावेळेला असं घडत होत कारण त्यावेळेला सर्वपक्षीय एकत्रीत असायचे पक्षाचा कुठेही स्वार्थ न करता जनतेच्या स्वार्थासाठी सगळयांनी एकत्रीत येवून काम करायचं. गेली तीन वर्ष आम्ही सांगतो असं करारे तसं करारे. कोणीही ऐकत नव्हते, दुधाच गाडग उघड आहे सगळे डोळे झाकून दुध पित होते. त्यांना वाटल आपण डोळे झाकले म्हणजे बाकीच्यांनी डोळे झाकलेले आहेत. पण सरकारला ते कळत होतं. याठिकाणी दोन आमदार आहेत, दोन खासदार आहेत आणि ते सत्ताधारी पक्षाचे आहेत याचा कुठतरी आपण विचार करायला पाहिजे होता. ७७ हजार कोटी आपले उत्पन्न त्यातील ५० हजार कोटी खर्च केला. आपल्याकडे माहिती असेल आजवाणी, बीव्हीजी आणि मातेरे हे तीन मोठे कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांनाच स्मार्ट सिटीचे काम मिळणार आहे. याची सुपारी त्यांना दया हे तीघेजण हि स्मार्टसिटी करुन आणतील.

(गोंधळ)

**मा.महापौर -** काय उपाययोजना करायच्या यावर चर्चा करावी. ही महापालिका सभा टिका टिप्पणीसाठी आयोजीत केलेली नाही. विषयावर बोलावे.

(गोंधळ)

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, दोन आमदार, दोन खासदार याठिकाणी आहेत त्यांना विचारता आलं नाही का.

**मा.महापौर -** आपण स्मार्टसिटीमध्ये कसे येऊ, आपल्याला मा.मंत्र्यांना भेटायचे आहे तेथे काय मुद्दे मांडायचे याचा विचार करावा याची चर्चा करावी.

(गोंधळ)

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, आता आमचे मुख्यमंत्री आहेत. आमचे विचार तुम्हांला का पटत नाहीत. सगळे नगरसेवक चला, आम्ही यायला तयार आहोत.

**मा.महापौर -** विषयावर बोलावे.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, सर्व काम होईल परंतु आम्हांला सर्वांना बरोबर घेवून चला तर या सिटीला काहीतरी मिळेल. आम्ही यायला तयार आहेत.

**मा.महापौर-** सर्वांनी खाली बसावे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्मार्टसिटीमधुन वगळल्यावर विकासावर परिणाम होणार आहे. का वगळले आहे याचे अनेकजण अनेक कारण देतात. कोणी म्हणत जेएनएनयुआरएममध्ये भ्रष्टाचार झाला, भ्रष्टाचारास फक्त राष्ट्रवादी रिस्पॉन्सीबल आहे का. स्थायी समितीमध्ये राष्ट्रवादी, बीजेपी, कॉंग्रेस, शिवसेनेचे सर्वच नगरसेवक आहेत. त्याठिकाणी कोणीही आवाज करत नाहीत असे असेलतर जीबीमध्ये दाखवावे

या या लोकांनी विरोध केला म्हणून. त्याठिकाणी टेंडरला विरोध करत नाहीत. हे तुम्हां-आम्हांला माहिती आहे. फक्त एकच पक्ष रिस्पॉन्सीबल आहे असे मी म्हणणार नाही. आपण सगळेजण रिस्पॉन्सीबल आहोत. भ्रष्टाचार झालेला असेलतर सर्व नगरसेवक रिस्पॉन्सीबल आहेत. भ्रष्टाचार झालेला असेलतर राज्यशासनास आमच्यावर कारवाई करु दयात. कुठे नाही टक्केवारी हे सांगावे. प्रमाण वेगवेगळ असेल पण भ्रष्टाचाराशिवाय या देशात काहीच चालत नाही. तुम्ही म्हणाल विषयावर बोला, मी विषयावरच बोलतो. स्मार्टसिटीमधुन का वगळले. मी एका गोष्टीत बाबासाहेब धुमाळांच समर्थन करेल. ते म्हणाले आता सरकार बदलले आहे, आपण राज्यशासनाच्या प्रतिनीधीला येथे इन्व्हाईट केले का. त्यांचा मानपान केला का. आपले नेते आदरणीय शरद पवार यांनी मा.नरेंद्र मोदी यांना बारामतीमध्ये बोलावून त्यांचा मानपान केला. आपण त्यांना नाही बोलावले. १९९७ ची एक गोष्ट सांगतो या शहराला पाण्याची टंचाई होती त्यावेळी मी महापौर होतो त्यावेळेला मी मा.मनोहर जोशी साहेबांना भेटून विनंती केली ते म्हणाले तुम्ही पालकमंत्र्यांना घेवून जा त्यांना यजमान केल की पाच दिवसात पाणी भेटणार. मी मा.शशिकांत सुतार पालकमंत्री होते त्यांना म्हणालो आमच्याकडे या. ते म्हणाले कशाला यायच दोन वर्षात तुमचे महापौर, स्थायी समिती चेअरमन कोणी आले का शासनाकडे, नाही आले. त्यांना मी याठिकाणी आणले या शहराचा त्यांनी विकास बघीतला व सात दिवसाच्या आतमध्ये त्यांनी पत्र दिले की ११२ एमएलडी पाणी दयावे म्हणून. लोकप्रतिनीधी लोक निवडून देतात ते कुठल्याही पक्षाचे असु दयात ते सर्वांचे लोकप्रतिनिधी आहेत, सर्वांचे मंत्री आहेत. त्यावेळेला त्यांना आपण रिस्पेक्ट दयायला पाहिजे. त्यांना आपल्या शहरात बोलवा या शहराचा विकास दाखवा त्यांनी येथे बघीतल्यानंतर ते स्वत: ॲग्री करतील की या शहराचा विकास झालेला आहे गुणवत्ता यादीमध्ये आपण नंबर एक आहोत. अनेक चांगले प्राजेक्ट आपल्याला राबवायचे आहेत. या शहरातून अनेक इन्डस्ट्री बाहेर चालल्या आहेत याबद्दल आपण कधी विचार केला का. एक्सपान्शन बाहेर गेलच पण त्यांच प्रॉडक्शन सुध्दा बाहेर जायला लागलेल आहे. याचा परिणाम या शहरावर होणार आहे. एम्प्लॉई आपोआप कमी होऊ लागलेलं आहे. सॉफ्टवेअर कंपन्या वाढत आहेत त्या हिंजवडी, चाकणमध्ये आहेत, पिंपरी चिंचवडमध्ये नाही आणि म्हणून स्मार्टसिटीत समावेश झालातर या शहराचा विकास करण्यामध्ये आपल्याला मदत होईल. दोन वर्षात पाणीटंचाई वाढणार आहे, एक-दोन दिवसाआड पाणी दयावे लागणार आहे. बाकी काही प्रोजेक्ट आहेत, आंद्रा धरणातून पाणी आणायचे आहे. या भागात इन्डस्ट्री आणण्यासाठी एकेवीसाव्या शतकामध्ये त्यांना सुविधा उपलब्ध करुन दयायच्या आहेत आणि या सर्वांसाठी स्मार्टसिटीमध्ये समावेश करायला पाहिजे. आपण कुठेही कमी नाहीत, या शहराचा चांगला विकास झालेला आहे. गेल्या दहा वर्षात आपल्या शहराचा पुण्यापेक्षाही चांगला विकास झालेला आहे. मला विनंती करायची आहे की मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री यांना आपल्या

शहरात बोलवावे आणि आपण काय काय विकास केला ते दाखवावे. मला खात्री आहे त्यांनी हे शहर बघीतलेतर आपल्या शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश होईल.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विशेष सभेचे आयोजन केल्याबद्दल आपले अभिनंदन. पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वच नागरीकांचे लक्ष या सभेकडे आहे. मी पत्रकारांना विनंती करतो की याठिकाणी जे जे स्मार्टसिटी बद्दल बोलणार आहे ते डिक्लेअर करावे. ज्याचा ज्याचा विरोध आहे ते व कोण काय काय बोलतो हे नागरीकांना सुध्दा कळावं की आपले प्रतिनीधी यासंदर्भात काय मांडतात. कमिटीमध्ये सर्वपक्षीय त्याठिकाणी असतात. मी सुध्दा स्थायी समितीमध्ये होतो. कधी पाहिल नाही त्या कमिटीमध्ये एखादा कुठलाही सदस्य विरोध करतो. जो काही विरोध असतो तो ॲण्टीचेंबरमध्ये विरोध असतो, आयुक्त साहेबांसमोर कधी विरोध झालेला मी पाहिला नाही, विषय तहकूब होतो परत तो मंजूर होतो. भ्रष्टाचार मुद्दा एक दोघाचा नाहीतर सर्वांचा आहे. सुरवातीला स्मार्टसिटीमध्ये सहभाग झाला १०० मध्ये आपला नंबर लागला. मला खरोखरच सांगायला अभीमान वाटेल की पिंपरी चिंचवड शहर ऑलरेडी स्मार्ट आहे. आपल्या बद्दल लोकांमध्ये काय भावना आहे हे इतर ठिकाणी पुणे, मुंबईला आपले नातेवाईक, मित्र परिवार राहत असतात ते लोक सांगत असतात की कसे हे शहर डेव्हलप झालेल आहे. एवढ स्मार्ट असताना नारायण बहिरवाडे यांनी उदाहरण दिलेले आहे कल्याण-डोंबीवली, सोलापूर या शहराची काय परिस्थिती आहे. मग निकष हा आहे का, हा एक मुद्दा आहे. परिक्षा घेतली मग ती फक्त नावापुरती घेतली का. का तुमच ऑलरेडी ठरलं होत या या शहराला दयायच म्हणून परिक्षा घेतली त्यात ९२.५ असे मार्क आपल्याला मिळत असतीलतर आपला नंबर कसा लागणार नाही. एखादया विदयार्थ्यास ९५ मार्क मिळाले आणि त्याला अमुक अमुक कॉलेजला ॲडमीशन मिळाले नाहीतर किती खच्चीकरण होतं हे सर्व त्या पालकाना जवळच्या लोकांना माहिती असतं त्याच पध्दतीने आपले झालेले आहे. ऑफिसमध्ये गेल्यानंतर सर्व मित्रपरिवार, ज्येष्ठ नागरीक विचारतात आज तुमची महापालिका सभा आहे काय होणार आहे याकडे त्यांचे लक्ष आहे. का त्यांचे लक्ष आहे. पैशासाठी नाहीतर हा ईगोहट्ट झालेला आहे. एवढया चांगल्या पध्दतीने गेल्या पंधरा वर्षे डेव्हलपमेंट होत असताना आपल्याला याच्या मधुन बाहेर काढत असतीलतर आणि तुम्ही आम्ही भांडत असूतर, ज्यावेळेला आपला नंबर लागला त्यावेळेला पिंपरी चिंचवड शहरामध्ये फ्लेक्स लागायचे, अमुक अमुक व्यक्तीच अभिनंदन. नंतर काय झाल. मग राष्ट्रवादीनही फ्लेक्स लावले का नाही वाटाव, आम्हांला सुध्दा अभिमान आहे. आमचा स्मार्टसिटीमध्ये देशात नंबर लागला, महाराष्ट्रामध्ये लागला आम्हांलाही अभिमान वाटला आम्हीही फ्लेक्स लावला, लगेच दुस-या दिवशी फ्लेक्स लावला की राष्ट्रवादीने श्रेय घेवू नये. याच्यामध्ये श्रेय कुठं आलं, तुमच आणि आमचं कुठं श्रेय आहे. या शहरातील २२ लाख लोकसंख्येचे श्रेय, अधिका-याचे श्रेय आहे. त्यांनी रात्रंदिवस कष्ट करुन, आयुक्त साहेबांनी सादरीकरण करुन कशा पध्दतीने आपले

शहर स्मार्ट होईल, कुठं कुठं आपण कमी पडतो, आपण काय काय करायला पाहिजे यामाध्यमातून आपण याठिकाणापर्यंत पोहचलो. मग आज याठिकाणी आपले काही सदस्य काहीही बोलतील व ते सगळयांनी ऐकूण घेणे हे योग्य नाही. आता सर्वांना बोलू दयावे. ही महासभा आहे या महापालिका सभेमध्ये बोलायचा अधिकार आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये खदखद आहे की, का कमी पडलो, कोण कोणावरुन काय बोलतो, कोण कोणावर कुरघोडी करतो. या सगळया गोष्टी वर्तमानपत्रामधुन नागरीकांना कळणार आहेत. आमच्याकडून कदाचित चुक झालेली असेल पण याचा अर्थ असा नाही की आज आपण सभागृहामध्ये सर्व एकपक्षीय आहोत बाहेर आपण निवडणुका असू दयात भांडतो पण याठिकाणी मला नाही वाटत की शिवसेना असु दयात, बीजेपी असु दयात, काँग्रेस असु दयात कोणालाही वाटेल. सगळयांनीन जावून विनंती करु. या स्मार्टसिटीचा फॅड आता आलेला आहे. दोन चार महिन्यामध्ये. हे नसतंतर आपल्या शहरानी काय केलं असतं. एलबीटी हा विषय बंद झालेला आहे. आपलं इन्कम सोर्स कमी केलेलं आहे. भविष्यामध्ये पण या गोष्टीचा आपल्याला विचार करावा लागणार आहे. आज आपल्याला ५०० कोटी, १००० कोटी जे काय मिळतील ते मिळतील या ५०० कोटी १००० कोटी रुपयामध्ये काय होते हे आपल्याला सगळयांना माहिती आहे की एवढया पैशामध्ये काय होणार आहे, किती मोठे डेव्हलपमेंट आहे. जास्त पैसे आलेतर आपण त्याच्यामध्ये थोडीफार सुधारणा करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत. केंद्रसरकारकडून आपल्याला मिळणारे पैसे आल्यानंतर त्यात त्यांचे ठरावीक नॉर्म्स असणार, हे पैसे अमुक अमुक ठिकाणीच खर्च करा हे पैसे असेच जाणार आहेत फक्त सरप्लस पैसे आपल्या शहराला यावेत. या दृष्टिकोनातून प्रयत्न आहेत. आपण स्मार्ट नाहीत अशातला भाग नाही किंवा आपल्याला इन्कम सोर्स नाही अशातला भाग नाहीतर आपण सक्षम आहोत. कल्याण-डोंबीवली, सोलापूर पेक्षा शंभर पटीने कितीतरी आपण पुढे आहोत. या गोष्टीचा आपण विचार करायला पाहिजे. मला आवर्जून सांगायच आहे की, आपण भविष्यामध्ये काय करायला पाहिजे, आयटी क्षेत्र आपल्या शेजारी आहे आयटी क्षेत्रामध्ये आपल्याकडे आभाळातून डॉलर्सच्या माध्यमातून पैसे पडतात आपण त्याठिकाणी मशनरी खर्च करत नाहीत फक्त डोक्याचे काम विदयार्थी करतात. त्याचा फायदा पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर भागामध्ये झालेला आहे. त्यामुळे आपलं ऍटोमेटीकली इन्कम वाढतं आहे. हिंजवडीमध्ये लाखो लोक जॉबला आहेत. त्यांचे फंडस् येतात ते आपल्या शहरामध्ये राहण्याच्या माध्यमातून, व्यावसायाच्या माध्यमातून, शिक्षणाच्या माध्यमातून ते फंडस आपल्या शहराला येतात. आपल्याला कुठे कुठे इन्कमसोर्स वाढविता येईल, आपल्याकडे भूमि आणि जिंदगीसारखे विभाग आहेत. बाकीचे भरपुर विभाग आहेत त्यात आपल्याला लोक वाढविणे गरजेच आहे. एलबीटी बंद झाली म्हणून आपल शहर बंद होणार आहे का. आपल्याला इन्कमसोर्स करायला पाहिजे. केंद्रसरकारने जाहीर केलेले पॅकेज दयायचे ठरलेल असलेतरी सहा महिन्यांनंतर काय होणार हे काय माहित आहे.

कदाचित भुमि अधिग्रहण सारखी स्मार्टसिटीचीही परिस्थिती होवू शकते. म्हणून याचा एवढा गाजावाजा करण्यासारखी परिस्थिती नाही. दहा शहरात आपल्या शहराची निवड व्हायला पाहिजे त्यादृष्टिने सर्वच पक्षीय लोक प्रयत्न करणार आहेत. मी अजीत गव्हाणे यांच्याशी बोलत होतो आता ९८ शहर डिक्लेर केलेले आहेत, फक्त दोन जम्मू आणि काश्मीर राहिलेले आहेत, त्याच्यामध्ये पिंपरी चिंचवडला घ्यायचा इगो कदाचित पुढे येईल. आदरणीय पवार साहेबांनी डिक्लेर केलेले आहे की आपण त्यांना विनंती करु. पण कदाचित एक टक्का समजा की आपल झाल नाहीतर आपले शहर थांबणार का, नाही थांबणार. माझी विनंती आहे की २० लाख नागरीकांचे लक्ष या सभागृहामध्ये लागलेले आहे हे पत्रकारांच्या माध्यमातून शहरामध्ये पोहचणार आहे. आपले शहर स्मार्टसिटीमध्ये सहभागी होणार अशी गणपतीचरणी अपेक्षा करतो. हे झाले नाहीतर आपण काय करायला पाहिजे, आपण कुठल्या पध्दतीन स्मार्टसिटी अजून इम्प्रूव्ह करता येईल, टुरीझम लोकांना याठिकाणी कसं ॲट्रॅक्ट करता येईल. हे बघीतल पाहिजे. कारण आपल शहर ऑलरेडी डेव्हलप झालेल आहे. आपण टुरीझमसाठी ॲट्रॅक्ट केलं पाहिजे. मी आताच ऑस्ट्रोलीयामध्ये जावून आलो असे छोटयाछोटया देशामध्ये टुरीझमला महत्व दिलेले आहे, त्यामार्फत फंडस् त्याठिकाणी येतात असे काहीतरी आपण करायला पाहिजे. ५०० कोटी जमा करणे खुप मोठे नाही. एकतर इन्डस्ट्रीअल पिंपरी चिंचवड मधुन बाहेर चाललेली आहे त्यांना आपण रोखले पाहिजे. बिल्डींग परमीशनला कसे ॲट्रॅक्ट करता येईल बिल्डींग परमीशनचे या वर्षाचे बजेट ५० टक्केनी कमी पडलेले आहे यासाठी काय करायला पाहिजे. भ्रष्टाचार खालून वर पर्यंत आहे परंतु सगळयानाच आमच्यावर लादणार का. अधिका-याचा कोणाचाच काही याच्यामध्ये रोल नाही असं तुम्हांला वाटत का. तुम्ही कॉमन पीपलला जावून विचारा. बोटावर मोजण्याइतका भ्रष्टाचार असेलतर मग १०० लोकांना भ्रष्टाचारी म्हणणे योग्य आहे का. मग तुम्ही कुठंतरी कमी पडलात, महापालिकेत का बरं भ्रष्टाचार होतो. ई-टेंडरींग असताना भ्रष्टाचार कसा होतो. टाऊन प्लॅनींगमध्ये कुठली एनओसी पाहिजे असेलतर का भ्रष्टाचार होतो, काय कारण आहे तेथील अधिकारी सक्षम नाहीत असे नाही. कितीतरी देश आहेत ते नॉन करप्ट देश म्हणून बोललं जात. कितीतरी देश आहेत नॉन क्रिमीनल म्हणून बोलल जात, १ टक्काही क्रिमीनल नाहीत. अशा पध्दतीचे देश आहेत. आपल्याला हे एक दिवसात होणार नाही याला वेळ लागेल. भविष्यामध्ये होणार म्हणजे तुम्ही जाणुनबुजून केलं का, आता होणार नाही असे पेपरमध्ये आलेली बातमी आहे. म्हणजे तुम्ही जाणुनबुजून करताय आणि लोकांना दाखविता की हे आम्ही केलं. तुम्ही करा, पण हे करा, या शहरासाठी करा, झोपडपट्टीतील नागरीकांसाठी करा, कॉमन पीपल साठी करा, ज्येष्ठ नागरीकांसाठी करा. फक्त बोलवून दाखवू नका किंवा आरोप करु नका, एवढीच माझी विनंती आहे. सर्वानी मनमोकळेपणाने बोला आणि सर्वानी चांगल्या पध्दतीने बोला, चांगले मार्गदर्शन करा आणि कशापध्दतीने आपला स्मार्टसिटीमध्ये प्रवेश होईल असे करावे. १०० सिटी आपल्याकडे लक्ष

ठेवून आहेत त्यातल्या त्यात महाराष्ट्राच्या १० सिटी आपल्याकडे लक्ष ठेवून आहेत की आता ईथं काय होत म्हणून. पिंपरी चिंचवड आणि पुणे एकत्रीत केले म्हणजे त्यांना ५० टक्के आणि आपल्याला ५० टक्के देणार आहेत का. सर्वांनी चर्चा करावी. नागरीकांना कळू दयावे हे कोणामुळे झालेले आहे, धन्यवाद.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. स्मार्टसिटीमध्ये प्रवेशाबाबत जास्तीत जास्त प्रयत्न आपल्या आयुक्तांनी केलेला आहे आणि आपण किती बरोबर आहोत आणि आपण काय काय काम केलेले आहेत याचे प्रेझेन्टेशन त्यांनी खुपच छान केलेले आहे त्यामुळेच आपल्याला त्याच्यामध्ये ९२.५ असे मार्क पडलेले आहेत. एवढे चांगले मार्क मिळूनही खंत वाटते. एवढं चांगल करुन आपण का डावलले गेलो. आपण जे केलेले आहे पुणे आणि पिंपरी चिंचवड हे एकत्रीत प्रेझेन्टेशन केलेले आहे त्याठिकाणी काही चुकीचे झालेले आहे का. तुम्ही नक्कीच अभ्यास केलेला असणार. पुणे आणि पिंपरी चिंचवड एकत्रीत प्रेझेन्टेशन करायच आहे कारण असं आहे की आपण पीएमपीएमएल, मेट्रो हे एकत्रीत करतो आहोत. पुणे आणि पिंपरी चिंचवड मर्ज व्हायला लागलेले आहे त्यादृष्टीने शासनास, केंद्रशासनाला खर्च करणे सोईस्कर झाले असते. अजूनही सर्व पक्षाचे लोक एकत्रीत येवून हा विचार मांडायला पाहिजे. पिंपरी चिंचवड शहरासाठी सगळयांनी एकत्रीत येवून हा मुद्दा मांडला पाहिजे की पिंपरी चिंचवड आणि पुणे एकत्रीत जर केलंतर त्याचे डेव्हलपमेंट खुप फास्ट होईल, त्याचप्रमाणे खर्चामध्ये सुध्दा बचत होईल. ऑलरेडी पिंपरी चिंचवडने फिनीक्स पक्षासारखी खुप भरारी घेतलेली आहे. कशा कशामध्ये पिंपरी चिंचवड पुढे नाही एकतर ई-लर्नीग आहे, सारथीची आपली हेल्पलाईन आहे त्याचप्रमाणे पाण्याचे नियोजन आपण व्यवस्थीत करतो आहोत पण तरी सुध्दा आपण आकाशात उंच भरारी घेतलेली आहे. अजून त्यामध्ये शासनाची मदत झालीतर आपल्याला काहीकाही प्रकल्प राबविता येतील. पाण्याचे नियोजन व्यवस्थीत करता येईल. पुण्याचा प्रश्न आहे कचरा निर्मुलन कसं करायचं. पुढील पंचवीस वर्षात हा प्रश्न आपल्या पुढे येणार आहे. आपल्याला घनकचरा निर्मुलन, पाणी, ड्रेनेज हे सगळ खुप करता येईल. त्याचप्रमाणे दळणवळनाचे साधनं पिंपरी चिंचवड मधुन पुण्यात आणि पुण्यातून पिंपरी चिंचवडला लोक येतात. पुण्यातून ईकड आलं की असं वाटत की खरंच पिंपरी चिंचवडमध्ये ऑक्सीजन मिळाल्यासारख होतं इतकी सुंदर आपली सिटी डेव्हलप झालेली आहे. आपल्याला बेस्टसिटी ॲवार्ड मिळालेला आहे. मग डावलल का? डावललंतर आपण अजून सुध्दा प्रयत्न करायचा की चांगल कसं आपल्याला मिळेल. पण त्याचबरोबर एक टक्का नाही म्हणलतर आपल्याला सोर्सेस काय आहेत. आता उल्हास शेट्टी यांनी सांगीतलेल आहे की, पेपरमध्ये आलेले आहे आपण फ्लेक्स लावतो त्यातून कस इन्कम सोर्सेस होईल. प्राधिकरणाचे पिंपरी चिंचवडचे काही प्लॉटस रिकामे पडलेले आहेत ते कसे देवून त्यातुन इन्कम सोर्स कसे निर्माण करु शकू. आपल्याला यांच्याकडून जास्त पैसे मिळालेतर जास्त

डेव्हलपमेंट करु. आपण महापालिका सभा घेतलेली आहे. पिंपरी चिंचवडचा नागरीक हा सुज्ञ आहे त्यांना समजते एवढया सगळया फॅसिलीटी असताना आपल्याला डावलले का. त्यांना आपण सांगण्याची गरज नाही. आपण खुप चांगल्या पध्दतीन केलेल आहे, मग हे का? असा नागरीकांना सुध्दा प्रश्न पडतो. सत्ताधारी पक्ष आपण आहोत तरी हे कसे आपल्याला मिळवता येईल यासाठी सगळयांनी एकत्र येवून मा.पालकमंत्र्यांना भेटून, मा. व्यंकय्या नायडू यांना भेटून, आपले आदरणीय पवार साहेब, मा.अजीत दादा आहेत त्यांना घेवून आपण सगळेजण तिथ जाऊ आणि प्रयत्न करुन जास्तीत जास्त निधी कसा येईल यासाठी प्रयत्न करु, धन्यवाद.

**मा.धनंजय आल्हाट -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह विशेष सभेसाठी सर्व नगरसेवक उपस्थित राहिले आहेत, खरतर हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या महत्वाच्या विषयासाठी हे नगरसेवक सर्वजण अवर्जुन उपस्थित आहेत मला असं वाटतय की शहरातील खरे स्मार्ट नगरसेवक आहेत म्हणून हे अवर्जुन याठिकाणी उपस्थित राहीले कारण या विषयाच महत्व प्रत्येकाला आहे. ज्यावेळेस पहिली बातमी पिंपरी चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी मध्ये येणार म्हणल्यानंतर प्रत्येकाला आनंद झाला. आता काहीतरी शहरामध्ये वेगळे निर्माण होणार अशी नागरीकांना उत्सूकता निर्माण झाली आणि अशा पध्दतीचे वातावरण निर्माण झाले की आता काहीतरी वेगळे होणार आहे अशाप्रकारची प्रत्येकाला एक मनिषा निर्माण झाली. परंतु प्रत्यक्षात स्मार्टसिटीच्या बाबतीत जी संकल्पना आहे काल परवाच ऍटोक्लस्टरला यशदा सारख्या संस्थेनी त्याच्या विषयी प्रेझेन्टेशन केले. स्मार्टसिटीमध्ये नेमक्या कोणत्या प्रकारच्या योजना राबविणार आहोत. परंतु स्मार्टसिटीमध्ये आपले शहर आले नाही म्हणून आपल्याला दुःख झाले, आपण नाराज झालो. पहिल्यांदा सन्मा. आयुक्त साहेबांच मी सर्वांच्या वतीने अभिनंदन करेल. आयुक्त साहेबांची सुरवातीपासून तळमळ होती की कशा पध्दतीने त्याठिकाणी प्रेझेन्टेशन करायच. त्यांच्या मनामध्ये एकप्रकारची योजना होती आणि अखेर त्यांनी चांगल्या पध्दतीचे प्रेझेन्टेशन त्याठिकाणी केले आणि असं वाटलं होत की शहराला एकप्रकारचा वाढीव निधी मिळेल. कारण आता एलबीटीमुळे आर्थिक संकटात जाणार आहोत हे वेगळ सांगण्याची गरज नाही. आपले उत्पन्नाचे सोर्स बंद झालेले आहेत. आर्थिक मंदी त्याठिकाणी निर्माण झालेली आहे. आपल्या येथील मोठमोठे प्रकल्प शहराच्या बाहेर जाऊ लागलेले आहेत त्यामुळे असा एक ५०० कोटीचा निधी शहरामध्ये येणार आहे यासाठी चांगल्या पध्दतीच्या उपाययोजना आपल्याला करता आल्या असत्या. परंतु हे करत असताना आपण ज्यावेळेस नाराज होतो. शहरातील लोकांना याठिकाणी अपेक्षा असती, आपणा सर्व नगरसेवकांना याठिकाणी अपेक्षा असती त्यावेळेला आपण सुध्दा प्रशासन सोडून जे राजकीय जबाबदारी पध्दतीने आपण सुध्दा त्याठिकाणी पावले उचलणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात, केंद्रशासनामध्ये युतीची सत्ता आहे. याठिकाणी सत्ता राष्ट्रवादीची आहे परंतु

विकासामध्ये त्याठिकाणी अशाप्रकारच राजकारण होता कामा नये. या महाराष्ट्रातून युतीचे सरकार आलं, आपले शहर हे स्मार्टच आहे. वेगवेगळया प्रकारच्या योजना आपण याठिकाणी राबविलेल्या आहेत. मुळात मी भ्रष्टाचाराचा मुद्दा याठिकाणी उपस्थित करणार नाही कारण आजचा विषय हा वेगळा आहे. शहरातील दोन खासदार आहेत, तीन आमदार आहेत जे लोकप्रतिनिधी आहेत ते कुठल्याही एका पक्षाचे नाहीत, त्यांना विश्वासात घ्यायला पाहिजे होते. महापालिकेच्या वतीने त्यांना निमंत्रण दयायला पाहिजे होते. पिंपरी चिंचवड शहरातून स्मार्टसिटीमध्ये प्रवेशाबाबतचे एक शिष्टमंडळ आपल्याकडून मा.मुख्यमंत्री यांना भेटायला जायला पाहिजे होते तसे आपल्याकडून झाले नाही. सन्मा.खासदार श्रीरंगजी बारणे असतील, सन्मा.खासदार आढळराव पाटील असतील यांनी वेळोवेळी संबंधीत मंत्र्यांना, मा.मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून या पध्दतीने शिफारस केलेल्या होत्या त्याच्या प्रती आज आमच्याकडे आहेत. आजही आपल्याला त्याठिकाणाहून निधी मिळत असलातरी संबंधीत खासदार, आमदारांना, या सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक आहेत त्यांना एकत्रीत करुन एक समिती नेमा आपण मा.मुख्यमंत्री यांना भेटू, मा.मुख्यमंत्री साहेबांना याठिकाणी आपले शहर पाहण्यासाठी निमंत्रीण दया. आपण मोठमोठे प्रोजेक्टचे उदघाटन करतो परंतु पक्षाच्या वलयामध्ये राहीलेलो आहोत परंतु तसं राहता कामा नये. सन्मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री हे कुठल्या एका पक्षाचे नाहीत ते संपुर्ण राज्याचे, देशाचे आहेत हा एक चांगला आणि उद्दात्त विचार ठेवून जर आपण त्याठिकाणी काम केलेतर हे शहर अधिक स्मार्ट झाल्याशिवाय राहणार नाही. अजून वेळ गेलेली नाही. अनेकप्रकारचे डीडी या शहरासाठी मिळू शकतात. त्यामुळे सन्मा.नेत्यांविषयी, माझे म्हणणे आहे की थोड आपण मन मोठे केलेतर या शहरवासियांच्या पदरात भरपूर काही पडेल. राजकारण बाजूला ठेवा, मा.मुख्यमंत्र्यांना सुध्दा उदघाटनासाठी बोलवा आणि हे शहर दाखवा आणि हे शहर कसं याठिकाणी उभा केलं आहे, आपला मोठेपणा हा जगाला दाखविण्यासाठी कधीही कमीपणा त्याठिकाणी मानु नये. मंत्र्यांना बोलवा, दोन खासदार, आमदारानां बोलवा त्यांची एक मिटींग बोलवा, सर्व ज्येष्ठ नगरसेवक त्यात यावेत आणि हा निधी कसा उपलब्ध हाईल हे यादृष्टिने प्रयत्न करा. ही झाली एक बाजू आता दुसरी बाजु ज्यावेळेस आपण जेएनएनयुआरएमचा निधी आणला, आपल्याला अमृत मधुन निधी मिळणार आहे. पण हा कुठल्या योजनेच्या माध्यमातून निधी मिळत असतो त्याच्यावर सन्मा.महापौर आपण सुध्दा अंकुश ठेवला पाहिजे. कारण एखादया गाडघ्यामध्ये जर आपण पाणी टाकलेतर आणि त्याला भोक पाडलेतर ते पाणी टिकणार नाही, ते भोक याठिकाणी पहिल्यांदा बंद करा. आपल्याकडे कितीही निधी आलातर तो व्यवस्थीत वितरीत करुन तो कारणी लागला पाहिजे. एलबीटी बंद झालेली आहे. पाऊसाने दडी मारलेली आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये दुष्काळाच सावट महाराष्ट्रावर येणार आहे. ज्या मोठमोठया योजना आता सांगीतल्या, जो काही अनाठायी खर्च महापालिकेत होतो, चुकीच्या पध्दतीने निवीदा टेंडर काढले जातात, कोटीकोटीच टेंडर

याठिकाणी काढले जातात सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा. महापौर ताई, आपण त्याठिकाणी अंकुश ठेवला पाहिजे. स्थायी समितीमध्ये मी सांगत असतो आता परिस्थिती वेगळी आहे, महापालिकेमध्ये निधी नाही त्यामुळे विनाकारण अशाप्रकारचे कोटीच्याकोटी टेंडर काढून महापालिकेला खड्डयामध्ये घालण्याच काम करु नका, वेळोवेळी त्याठिकाणी सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे येथून पुढ आपल्याला सतर्क राहण्याची वेळ येईल या शहराचा विकास झाला पाहिजे हे शहर आपल आहे. मध्यंतरी न्यू पुणेची संकल्पना शासनाकडून मांडण्यात आलेली होती. परंतु आपल्याला या पिंपरी चिंचवड शहराच्या मातीविषयी प्रेम आहे, आपल एक नातं आहे म्हणून सांगीतल की आमच नाव हे पिंपरी चिंचवड शहर हेच राहीला पाहिजे कदाचित राज्याची ही भावना असली पाहिजे. ज्यावेळेस पिंपरी चिंचवड आणि पुणे शहराला एकत्रीत केले आणि हा एकत्रीत प्रस्ताव मा.मुख्यमंत्र्यांनी केंद्रशासनाकडे सादर केला त्यावेळेला सन्मा. मंत्री मा.नायडू साहेब आहेत त्यांनी सांगीतले अशाप्रकारचे एकत्रीत प्रस्ताव आमच्याकडे आणू नका कारण कुठंतरी कायदयाच्या चौकटीमध्ये त्याला तांत्रिक बाबी त्याठिकाणी निर्माण होतात त्यामुळे मला वाटते याच मुद्दयावर आपले पिंपरी चिंचवड शहर वगळलेले आसल पाहिजे. आजही पिंपरी चिंचवड शहर हे पुण्याच्या पोटामध्ये आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड एकच आहे, आपल्याला जास्तीत जास्त निधी मिळावा म्हणून आपल्याला हा उदात्त प्रयत्न करावा लागणार आहे. मी एवढीच याठिकाणी विनंती करतो की सर्वांना वाटते आपण स्मार्टसिटीमध्ये आलो पाहिजेत. स्मार्टसिटीमध्ये त्याठिकाणी फारतर आपल्याला ५०० कोटी मिळणार आहेत. आपले प्रोजेक्ट दोन-तीन हजार कोटीचे असतात त्यामुळे ५०० कोटी फार नाहीत. परंतु स्मार्टसिटीमध्ये प्रवेश केल्यानंतर स्टार आपला वाढणार आहे कुठेतरी एक चांगल स्मार्ट लेबल आपल्याला मिळणार आहे म्हणून आपली ख-या अर्थाने तळमळ होती. स्मार्टसिटीमध्ये प्रवेश केला असतातर अनेकप्रकारचे उदयोग, अनेकप्रकारचे व्यावसाय याठिकाणी आले असते, चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण झाले असते. थोडक्यात सांगायच झालतर “अच्छे दिन” ख-या अर्थाने याठिकाणी आले असते परंतु आपले दुर्दैव म्हणाव लागेल की आपण त्याठिकाणी जाऊ शकलो नाहीत तरी सुध्दा आपलं पिंपरी चिंचवड शहर हे स्मार्टच आहे. सगळे नगरसेवक त्याठिकाणी रात्रंदिवस काम करतात. परंतु या निमीत्तान मला एकच सांगायच आहे मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भ्रष्टाचाराला लगाम घाला, अनाठायी खर्च रोखा नाहीतर आपण जे काही छातीभरुन सांगतो आमची अशिया खंडातील श्रीमंत महापालिका, आमची स्मार्टसिटी आहे पण एक दिवस आपल्याला अशी वेळ येईल की आपल्या जागी आपलं डोके दगडावरती अपटून घ्यावे लागेल अशी परिस्थिती याठिकाणी निर्माण होईल एवढेच सांगतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर मी आपण विशेष सभा घेतली त्याबद्दल आपल अभिनंदन करेल. आपल्याला स्मार्टसिटीतून वगळण्यात

आलं त्यानिमीत्तान लोकप्रतिनीधीची असणारी तळमळ, त्यांच्या भावना व नागरीकांची त्यांच्या विषयी असणारी मत आज याठिकाणी मांडण्याची सर्व नगरसेवकांना संधी उपलब्ध झाली. २२ लाख नागरीक याठिकाणी राहतात त्यांना सुध्दा वाईट वाटत असेल की आपल शहर स्मार्टसिटीमध्ये का आलेले नाही, हे शहर का वगळण्यात आले हा प्रश्न सर्वानाच पडला आणि सर्वपक्षीय ही तळमळ प्रत्येकजण आपल्या संभाषणातून मांडतात. आपल्या शहरात आज काय नाही सगळया गोष्टी आहेत. काही वर्षापुर्वी आपल्याला काही गोष्टी आणण्यासाठी पुण्यामध्ये जावे लागत होते. आज तशी वेळ नाही. शैक्षणिक क्षेत्र, औदयोगिक क्षेत्र असेल, वेगवेगळे सायन्सपार्क, औदयोगीक शहर म्हणून आपली ओळख आहे. पिंपरी चिंचवड अशिया खंडातील श्रीमंत महापालिका हि ओळख पहिल्यापासून आपण सगळेजण जाणता. मग आपण स्मार्टसिटीमध्ये का नाही, मग बेस्ट सिटीचा ऍवॉर्ड हा चुकीचा होता का हा प्रश्न आहे. नक्कीच यासाठी सर्वच नगरसेवक प्रयत्न करत आहेत. मा.महापौर, मा.आयुक्त तुमच्या माध्यमातून याबाबतीत निश्चित समावेश होईल ही सर्वाची तळमळ आणि खंत आहे. आपल्या प्रयत्नातून, यशातून नक्कीच यात समावेश होईल असा मला विश्वास वाटतो त्यासाठी जे प्रेझेन्टेशन असेल, नियमावली असेल, आणि का कमी पडलो हा शहरावर झालेला अन्याय कसा दुर करता येईल यासाठी प्रयत्न करावेत. निश्चितच या प्रयत्नातून यशस्वी होऊ असा विश्वास व्यक्त करते आणि थांबते.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधुभगिनी. आज आपण स्मार्टसिटी बद्दल विशेष सभा आयोजीत केली त्याबद्दल प्रथम तुमचं अभिनंदन. मला वाटत नाही की जे लोकांच्यामध्ये काम करतात रुट लेव्हलला काम करतात त्यांच्या मनामध्ये कुठले राजकारण वगैरे शीजत असेल आणि कोणालातरी आपण दुश्न दयावीत असेतर मुळीच नाही. प्रत्येक नगरसेवकाला असं वाटतय मी एवढ काम करतो माझा वॉर्ड जास्तीत जास्त कसा आधुनिक होईल, कसा विकास होईल, कसा सुंदर स्वच्छ राहील याद्दृष्टिने प्रत्येक नगरसेवक प्रयत्न करत असतात आणि कधी असं झालतर सर्वानाच वाईट वाटत आणि त्याच भावनेतून आपण ही घेतलेली मिटींग आहे. मा.महापौर, आपण या विशेष सभेमध्ये प्रशासनाचे प्रमुख म्हणून मा.आयुक्तांचे अभिनंदन केले पाहिजे. आपण त्यांच्या पाठीशी उभे राहीले पाहिजे. आपण आता ठामपणे उभं राहिल पाहिजे पक्ष किंवा राजकारण कुठलाही विषय न ठेवता आपण सर्वजण त्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे. कारण सादरीकरणामध्ये ते आणि त्यांचे सर्व अधिकारी कुठेही कमी पडलेले नाहीत. मी अगोदरच त्यांचे अभिनंदन केलेले आहे. आपला स्मार्टसिटीमध्ये समावेश व्हावा असे वाटले, याच कारण असे आहे की आपले उत्पन्न कमी झालेले आहे. आपल्याला चार पैसे मिळावेत त्यामुळे आपले प्रोजेक्ट जास्त वाढतील. जास्त सुधारणा करता येईल आपण स्मार्ट नाहीत का. प्रत्येकजण आपली जीवनशैली जास्तीत जास्त चांगली कशी होईल, उंचावेल कशी याद्दृष्टिने जगातील प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करते.

मग अशा वेळेस आपण या योजनेसाठीच स्मार्ट व्हायच का? नाही. आपले प्रयत्न चालु आहेत ते तसेच चालू ठेवायचे मग आपोआपच ते आपल्याकडे येतील. मी सकाळचेही याठिकाणी अभिनंदन करते की त्यांनी पुण्यासाठी का होईना स्मार्टसिटीसाठी नागरीकांसाठी त्यांनी तेथे बोलावले त्यांचे विचार ऐकले तेल अविव शहराचे नेतृत्व करतात ते जोहार शेरॉन यांनी त्यांचे अनुभव सांगीतले. आपल्याकडेही प्रयत्न चालू आहेत परंतु आपल्या शहराचा इतिहास वेगळा आहे. स्मार्टसिटीमध्ये त्यांनी समावेश केलेला नाही, आपण पास झालेलो आहोत. आपला तो हक्क त्यांनी डावललेला आहे आणि हे कळल शहरातील लोकांना की तिथं आपल कोणी नाही. ज्यावेळेला आपले नेते त्याठिकाणी होते खरोखरच या शहरातील लोकांची कळकळ त्यांना होती जे नेते त्याठिकाणी होते त्यावेळेस त्यांनी जेएनएनयुआरएम सारखा प्रकल्प याठिकाणी राबवला. त्यासाठी आपल्याला पाहिजे तेवढे पैसे याठिकाणी आणलेले आहेत. आता ते होत नाही याचे दु:ख करण्यापेक्षा जाता जाता आणखीन दोन शहर मा.अजीतदादा म्हणाले, स्मार्टसिटीमध्ये समाविष्ठ करुन घ्यायचे आहेत, आमचे काही लोक जातील सुध्दा दिल्लीला. मला वाटते येथील सर्व पक्षाच्या लोकांना घेवून जाव. सर्व पक्षाच्या नेत्यांना घेवून जावं. त्यांना उगीचच असं वाटतय की आम्ही त्याठिकाणी गेलो की काम होईल. होऊ दया, त्यांना वाटत असेल, होईल. या शहराचा पाया, या शहराची जडणघडण वेगळी आहे. १९६४ साली कै. आदरणीय यशवंतराव चव्हाण यांनी पिंपरी चिंचवडला औदयोगीक क्षेत्र म्हणून जाहीर केले आणि याठिकाणी टाटा सारख्या कंपन्या इथ लगेचच आल्या आणि मग महाराष्ट्रच काय संबंध भारतामधुन कामासाठी म्हणून याठिकाणी लोक येवू लागले. याठिकाणी भरमसाठ स्थलांतरीत लोकांची संख्या वाढली. ६४ ते ७० टक्क्यांनी हे शहर स्थलांतरीत लोकांच्यामुळे वाढले. याठिकाणच्या ग्रामपंचायती असलेल्या पाच गावांना आपल्यामध्ये सामावुन घेतले. आताच †›. गोरक्ष लोखंडे यांनी सांगीतले की कमी अवधीमध्ये लोकसंख्येच्या दृष्टिने आपले शहर वाढलेलं आहे. ग्रामपंचायतीची नगरपालिका आणि महापालिका झाली आणि समर्थपणे ही महापालिका या शहराला सांभाळते, या शहराचेच नव्हेतर चौकाचे आधुनिकीकरण सुरु झालेले आहे आयटी क्षेत्रामुळे सगळी कडे इतक्या मोठया प्रमाणात हे सुरु झालेले आहे त्यामध्ये आपणही मागे नाहीत. कष्ट करणा-या अधिका-यांना वाईट वाटले असेल की आपण एवढ सगळ चांगल केल आहे पण तरी सुध्दा त्याच्यामध्ये आपल्याला वाईट वाटण्याचे कारण नाही. त्यांचे प्रोसीजर आहे ते त्यांनी सांगीतले, तुम्हांला वेगळे पॅकेज जादाचे देऊ. आमचा काही बिहार आहे का आता काही निवडणुका आहेत का, बघु निवडणुकीच्या वेळेस. तसे काही आपल्याला नको. मी मा.आयुक्तांना सांगेल, दिल्लीला जाणा-यांना सांगेल, मा.दादांनाही सांगणार आहे आम्हांला भीक नको, पाहिजे होतं ते आमच्या हाक्काचे पाहिजे होत. त्यामध्ये आम्ही गुण मिळवलेले आहेत त्यामुळे आम्हांला तुमची भीक नको. त्यांचे जे पैसे मिळणार होते, आपण अगोदर खर्च करणार

होतो आणि मग त्यांचे पैसे मिळणार होते. उदयोगामुळे हे शहर उभे राहीलेले आहे, याठिकाणी मोठमोठे रस्ते आपण तयार केलेले आहेत, आपण कुठेही कमी पडलेलो नाहीत. मोठमोठे रस्ते, मोठे पुल, पाणी २४x७ कडे आपली चाललेली वाटचाल, त्यानंतर मोठे क्रिडांगण आहेत, सुंदर असे उदयान आहोत. याठिकाणी मोठमोठे प्रकल्प उभे राहीलेले आहेत. आयटी हब् जवळच आहे. म्हणजे हे सगळ असताना आपण आधुनिकीकरणाकडे जात नाहीत हे म्हणणे चुकीचे आहे. आपण त्याच दिशेकडे वाटचाल करत आहोत. उदयोगामुळे आपल्याला एवढे उत्पन्न मिळत होते की ज्यामुळे शहराचा मोठयाप्रमाणात विकास करु शकलेलो आहोत. मोठमोठे प्राजेक्ट राबवू शकलो आहोत. सन्मा.सदस्यांनी सांगीतले उदयोग शहराच्या बाहेर चाललेले आहेत याकडे विशेष लक्ष दयायला पाहिजे. काय पाहिजे त्यांना, त्यांना विजेचे दर जास्त आहेत का, दुसरीकडे ते का जातात. चिंचवडची टेल्को सारखी कंपनी जी येथे १९६४ साली स्थापन झाली ती का बाहेर चालली. तेथील प्रोजेक्ट का बंद करतात. तेथील फौंड्री दुस-याना चालविण्यासाठी दिलेली आहे. आम्ही जेव्हा त्यांचा उदयान विभाग पाहीला गेलो होतो तेव्हा त्यांनी सांगीतल की याठिकाणी ॲसेम्बली वगैरे असेच ठेवलेल आहे. त्याठिकाणचे प्रॉडक्शन का कमी करतात, का बाहेरुन मागवतात. अगदी लांब पण नाही जसे गुजरात मध्ये वगैरे जातात असेही नाही, शेजारच्याच गावामध्ये ते का जातात याचा थोडासा अभ्यास करायला पाहिजे. अशाप्रकारचे उदयोग याठिकाणी कसे वाढतील, तेथील लोकांना काम कसे मिळेल, कारण आज आपल्यापुढे उत्पन्न वाढवायचे एकच साधन असेल ते म्हणजे मालमत्ताकर साहेब, लोकांनी अभ्यास केलेला असेल किंवा नसेलही पण प्रत्येकानी आपल्याला आलेली घरपट्टीची रिसीट पहावी आपण मालमत्तेच्या किमंतीच्या एकूण ४९ टक्के एवढा टॅक्स भरतो ते एकच साधन आहे त्यापुढे आपण वाढवू शकू असे मला वाटत नाही. पाणीपट्टी असेल ती थोडीशी वाढवा परंतु मला वाटत नाही लोकांवर अधिक भार टाकावा. ज्याला आपण औदयोगिकनगरी म्हणतो त्या उदयोगाला आपण अभय दयावे. मला सांगण्यास अभीमान वाटतो १९९९ ला मी स्थायी समितीचे चेअरमन होते त्यावेळेला बहिरवाडे आणि इथले काही सभासद स्थायीला होते त्यावेळेला टेल्कोनी इंडीकाचा प्राजेक्ट हलविण्याचे ठरवले होते. आम्ही सर्व पक्षाचे सोळा लोक एकत्रीत आलो आणि त्यांना बोलावून सांगीतले हा प्रोजेक्ट याठिकाणाहून हलवू नका, तुम्हांला काय पाहिजे तर ते म्हणाले आम्हांला २ टक्के जकात जादा होते म्हणजे कच्चा माल आणतो त्यावरही जकात असते आणि तेथून आम्ही जो कच्चा माल पाठवितो आणि आम्ही तो पक्का करुन आणतो त्यावरही जी काही पाच ते सात टक्के जकात असते आणि ती जादा होते म्हणून आम्ही तो प्रोजेक्ट हलविणार त्यावेळेला आम्ही साहेबांच्या पुढाकाराने प्रयत्न केले आणि त्यांना जकातमाफ केली. तो प्रोजेक्ट याठिकाणीच राहिला कित्येक वर्षे इंडीकामध्ये लोकांनी काम केलं. साहेब, शहर शहर कशाला म्हणायच, इथले लोक जगले, याठिकाणच्या कंपन्या वाचल्यातर लोक जगतील आणि लोक येथे राहू लागलेतर शहराचे शहरपण येईल

नाहीतर नावात काही नाही, नगरपालिका काय, महापालिका काय किंवा ग्रामपंचायत काय. लोकांनी येथे राहणं त्यांच राहणीमान बदलणं ते ज्याठिकाणी राहतात त्याठिकाणी मोठे प्रोजेक्ट उभे राहणं हे एखादया ग्रामपंचायतीन केलतरी काही वेगळ नाही वाटणार किंवा त्याला काही कायदयाने बंधन नाही हे करु नये म्हणून. परंतु लोकांनी याठिकाणी रहावे, लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना इथं उत्पन्नाचे साधन मिळाव म्हणुन आपण मुळ उदयोग याठिकाणचे कसे जगतील यादृष्टिने लक्ष दयावे असे मला वाटते. हा उदयोकाचा आपला पाया ढासळू नये त्यादृष्टिने आपण प्रयत्न करावेत. आताच विचारले आम्हांला मान दया, आम्हांला मान दया, सांगायच होत की, कशाला ताकाला जाऊन भांड लपवायच, बाबासाहेब. सांगायच नां. मा.खासदार या सभागृहाचे सभासद आहेत आणि त्यांनी प्रयत्न केलेला नाही असे तुम्हांला म्हणायच आहे का. सगळयांनी प्रयत्न केलेले असतील. जिथे डिमांड आहे तिथे कमांड आहे आणि ते आम्ही मिळवलेले आहे म्हणून आम्ही जातो. परत एकदा सांगायच आहे की स्मार्टसिटी व्हावी यासाठी आपले जे प्रयत्न आहेत ते आपण करीत राहू, आपल्या येथील उदयोगांना आपण बरोबर घेवू. त्याठिकाणाहून केंद्रशासनाकडून जो निधी मिळणार होता तो निधी नाही मिळाला असे समजा. आता आपल्या हातात पॉईंट एक टक्काच प्रयत्न राहीलेला आहे. तेवढे आपल्या सर्व पक्षाचे नेते मिळून प्रयत्न करतील. परंतु हे उदयोग आपल्याला मदत करायला तयार आहेत. आपणही त्यांच्या मदतीला जाऊ यात. मोठमोठे गृहप्रकल्प याठिकाणी होतात हे बिल्डर सुध्दा उदयोगपतीच आहेत आपण त्यांची मदत घेवू. तरी अशाप्रकारचे याठिकाणी सर्वांनीच प्रयत्न केले. त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपल्या सर्वाचे अभिनंदन करते. आहे ते प्रयत्न चालू ठेवावेत पैशासाठी प्रयत्न नको एवढेच मला म्हणायच आहे, एवढ बोलून मी थांबते.

**मा.अजीत गव्हाणे -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, पत्रकार मित्र. याठिकाणी ही विशेष सभा महापौरांनी बोलावली आहे. स्मार्टसिटीमध्ये आपला समावेश व्हावा ही आपल्या सर्वाचीच अपेक्षा होती. आपल्या शहराच्या प्रत्येक नागरीकांची ती अपेक्षा होती किंबहूना आपला तो अधिकार होता. याठिकाणी आपण सगळयांनी एकत्रीतपणे आपला समावेश स्मार्ट सिटीत कसा होईल यासाठी प्रयत्न काय केल पाहिजेत यासाठी याठिकाणी बोलणं अपेक्षीत होतं. परंतु प्रत्येकानी आपआपली मत मांडत असताना वेगवेगळया विषयावर याठिकाणी चर्चा केली. या विषयामध्ये राजकारण आणू नये हा विषय खरं म्हणजे आपल्या शहराच्या अस्मितेचा विषय आहे आणि त्याच पध्दतीने या सरकारने स्मार्टसिटी ही जी काही योजना आखली, पुर्वी जेएनएनयुआरएम ही योजना होती त्याच पध्दतीने स्मार्ट सिटीची योजना वेगळया नावाखाली घेण्यात आली. याच्यामध्ये परिक्षा घेण्यात आली, परिक्षा घेतल्यानंतर आपल्याला ९२.५ टक्के मार्क मिळाले आणि राज्यामध्ये जवळपास चौथ्या, पाचव्या क्रमांकावर आपल शहर होतं परंतु आपल्याला घेतल गेलं नाही आणि त्याच्या मागच मुख्य कारण परवाच

माजी उपमुख्यमंत्री मा.अजीतदादा पवार साहेब आले होते त्यांना पत्रकारांनी हा प्रश्न विचारला की तुमच्या शहराला याच्यामध्ये घेतल नाही तरी याच्यामध्ये काही राजकारण आहे असं तुम्हांला वाटतय का. तर दादांनी स्पष्टपणे सांगीतल की याच्यामध्ये कुठलही राजकारण नाही. त्याच्यामध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर हे एकत्रीतपणे टाकल गेल्यामुळे त्याठिकाणी केंद्रामध्ये पिंपरी चिंचवडला बाजूला काढण्यात आलं त्यामुळे मा.अजीतदादांची आणि राष्ट्रवादीची अशी कधीच भूमिका नव्हती की हे भारतीय जनता पक्षाच सरकार आहे म्हणून आम्हांला याच्यामध्ये घेतल नाही अशाप्रकारचा कुठलाही आरोप त्यांनी केला नाही. परंतु गेल्या काही दिवसामध्ये पेपरमध्ये काही लोकांच स्टेटमेंट येतात, खरं म्हणजे त्या लोकांकडून अपेक्षीत नाही अशाप्रकारच स्टेटमेंट येते. वास्तविक राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षान याच्यामध्ये कुठल्याही प्रकारच राजकारण केलं नाही. मी पण विरोधी पक्षाचा नगरसेवक होतो परंतु एकमेव पिंपरी चिंचवड महपालिका अशी आहे की कुठल्याही प्रकारचे इथे राजकारण केलं जात नाही. सर्व पक्षाच्या लोकांना बरोबर घेवून काम केलं जातं इतर महापालिकेच बघीतलतर विरोधी पक्षाच्या नगरसेवकांच बजेट कापण्याच, त्यांच्या वॉर्डातल काम कसं होणार नाही अशाप्रकारच्या गोष्टी घडतात हे आपल्याला माहिती आहे. खाजगी मध्ये आपण बसता त्यावेळेसही मान्य करता की पिंपरी चिंचवडच ही एकमेव महापालिका आहे की ज्याठिकाणी अशाप्रकारचं काही होत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की आपल्या सभागृहामध्ये अशाप्रकारच काही घडत नाही आणि भविष्यातही तसं घडणार नाही. मुळात आपण सर्वांनी एकत्रीत येवून यामध्ये आपला समावेश कसा होईल यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. मगाशी उल्हास शेट्टी मला म्हणाले की खरंच शक्य आहे का स्मार्ट सिटीमध्ये आपल्याला घेणं. परंतु प्रयत्न करणं आपल काम आहे तो आपला अधिकार आहे. शहरातील नागरीकांनी आपल्याला मोठया विश्वासाने याठिकाणी नगरसेवक म्हणून निवडून दिलेल आहे आणि आपली जबाबदारी आहे की याठिकाणी त्यांच्या विश्वासाला तडा न जाऊ देता याठिकाणी आपण काम केलं पाहिजे. आताच धनंजय आल्हाट आणि इतरांनी उल्लेख केला त्याप्रमाणे याठिकाणी खासदार, आमदार आहेत त्यांनाही आपण बरोबर घेतलं पाहिजेत. पत्रकारांनी विचारल तेव्हा दादांनी परवा बोलताना हेही सांगीतल की, निश्चितपणे त्यांचीही जबाबदारी होती केंद्रशासनामध्ये, राज्यशासनामध्ये ते काम करतात, त्यांचीही जबाबदारी होती की आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा यामध्ये समावेश झाला पाहिजे. मागच्या काळामध्ये जेएनएनयुआरएममध्ये आपल्या शहराला घेतलं गेलं. त्यावेळेस सुध्दा पिंपरी चिंचवडच आदि नांव नव्हतं परंतु त्याठिकाणी आदरणीय शरद पवार साहेबांनी प्रयत्न करुन आपल्या शहराचा त्याच्यामध्ये अंतर्भाव करुन घेतला. आज जवळपास २४०० कोटी रुपये आपल्याला जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून मिळालेले आहेत. त्याच्यामुळे खुप मोठया प्रमाणात आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये काम झालेल आहे इतर शहरातील लोक आपल्या शहरात येतात तेव्हा ते काय बोलतात याच आपण भान ठेवलं पाहिजे. आपल्या

शहरामध्ये बाकीच्या शहरातील नागरीक येतात त्यावेळेस ते इतक भरभरुन कौतूक करत असतात की तुमचं शहर खुप चांगल डेव्हलप झालेल आहे आणि याठिकाणी आपणच काहीतरी वेडवाकड बोलत असतो वास्तविक हे खुप चुकीच आहे. याठिकाणी पत्रकार मित्रांच सुध्दा मी आभार मानेल की याठिकाणी स्मार्टसिटीच्या बाबतीमध्ये पत्रकारांनी सुध्दा खुप सकारात्मक भूमिका घेतली आणि सर्वच पेपरनी आपल्या शहराला स्मार्टसिटीमध्ये घेतलं पाहिजे अशाप्रकारची भुमीका पेपरमध्ये मांडली तशी भुमिका आपण सर्वांनी याठिकाणी मांडली पाहिजे. भविष्यामध्ये स्मार्टसिटीमध्ये समावेश करण्यासाठी आपण काय प्रयत्न केले पाहिजेत यासाठी ख-या अर्थाने आपण प्रयत्न केले पाहिजेत. काहीजण बोलले स्मार्टसिटीमध्ये नाही घेतलेतरी चालतं वगैरे परंतु आता आपली परिस्थिती बदलत चाललेली आहे. एलबीटी रद्द झालेली आहे. त्याच्यामुळे आपल उत्पन्न फार मोठया प्रमाणात कमी होणार आहे. आपण जे उत्पन्न गृहीत धरुन बजेट केलेल आहे ते उत्पन्नच आपल्याला झालं नाहीतर अनेक कामाला कात्री लावावी लागेल. आपल पुर्वी जकातीच उत्पन्न होत ते एलबीटीमध्ये कन्व्हर्ट झालं. आज तेही आपल कमी होणार आहे. शासनाकडून किती पैसे मिळतील याची गॅरंटी नाही. भविष्यात असे मोठे प्रकल्प, ज्या काही बेसीक गोष्टी आहेत या जर दयायच्या असतीलतर आपल्याला स्मार्टसिटीमध्ये समाविष्ट होणे गरजेच आहे. कैंद्राकडून, शासनाकडून आपल्याला निधी मिळण गरजेच आहे. लोखंडे साहेबांनी मगा उल्लेख केला पिंपरी चिंचवड शहर हे देशात नावलौकीकाला आलेलं आहे. याच्यामागची कारणं याठिकाणी मोठयाप्रमाणात कारखानदारी आहे. पिंपरी चिंचवडच नाहीतर आजुबाजूला तळेगांव, चाकण या परिसरामध्ये कारखानदारी वाढते आहे, त्या कारखान्यात काम करणारे लोक पिंपरी चिंचवड शहरात राहण्यासाठी प्राधान्य देतात मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढते आहे. कारण लोकांना वाटते याठिकाणी रहाव हे राहण्याजोग शहर आहे. पुण्यापेक्षाही पिंपरी चिंचवडला लोक प्राधान्याने विचार करतात की आपण येथे राहील पाहिजेत. आज आपण ड्रेनेज सिस्टीमच्या बाबतीत अतीशय सक्षम आहोत, ड्रेनेज सिस्टीम चांगली केली आहे, पाण्याच्या बाबतीत आज सक्षम आहोत परंतु पुढे भविष्यात वाढती लोकसंख्या लक्षात घेतलीतर आपल्याला पाणीपुरवठा करणे अवघड जाईल आणि म्हणून आपल्याला आंद्रा, भामा-आसखेड हा प्रकल्प करायचा असेलतर आपल्याला पिंपरी चिंचवडच्या स्वत:च्या निधीवरती करता येणार नाही असं वाटत त्यामुळे या सर्व बाबींचा विचार केला पाहिजे. त्यामुळे आपल्याला या सर्व गोष्टी लक्षात घेवून या स्मार्टसिटीमध्ये आपला समावेश झाला पाहिजे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने पुढाकार घेवून सर्वपक्षीय बैठक बोलवली त्यामध्ये सर्व पक्ष आले आणि त्यानंतर पालकमंञ्याची भेट आम्ही सर्वजण जावुन घेतली. पालकमंत्री सुध्दा त्याठिकाणी बोलले की आम्हांला सुध्दा वाटतय की पिंपरी चिंचवड शहरावर अन्याय झालेला आहे पिंपरी चिंचवड शहराला याच्यामध्ये घेतल पाहिजे आणि त्यादृष्टिने आमच्याकडून जी काही मदत लागेल ती आम्ही करणार आहोत. आम्ही मुख्यमंत्री यांच्याकडे तुमच्या बरोबर येवू

मा.व्यंकय्या नायडू यांच्याकडे येवू, मा.पंतप्रधानाकड येवू अशाप्रकारची सकारात्मक भुमिका त्यांनी घेतलेली आहे. परवा मा.दादांनीही सांगीतल आहे की पवार साहेबांनी सुध्दा मा.व्यंकय्या नायडू यांची वेळ घेतलेली आहे. त्याठिकाणी जावुन त्यांना भेटून आपल्याला आपल्या शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश कसा होईल यासाठी प्रयत्न करता येईल. आपल्या सगळयांना विनंती आहे की याच्यामध्ये कोणीही राजकारण करु नये. २०१७ ला इलेक्शन आहे त्यावेळेस राजकीय भाषण करु, राजकीय भाष्य करु परंतु आज ती वेळ नाही. आज आपल्या सर्वांची नैतीक जबाबदारी, कर्तव्य आहे की आपण या शहराचे विश्वस्त आहोत. आपण एकमताने काम केले पाहिजे व स्मार्टसिटीमध्ये समावेश झाला पाहिजे. पेपरला बातमी येते, भ्रष्टाचार झाला परंतु भ्रष्टाचार कधी सिध्द होत नाही तो सिध्द करावा. आरोप करणे सोपे आहे. स्व.रामकृष्ण मोरे यांचे एक वाक्य अनेक लोकांना माहिती आहे की काम करणारा माणुस हा चुकत असतो आणि न काम करणारा हा बिनचुक बरोबर असतो त्यामुळे काम न करणा-यांना फार सोप आहे की चुका दाखवायच्या आणि मोठया करायच्या आणि काहीतरी प्रसिध्दी मिळवायची, त्यामुळे प्रत्यक्ष काम करुन दाखवा आणि काम करताना चुका या होत असतात याचाही विचार करावा. जेएनएनयुआरएम अंतर्गत आपल्याला खुप मोठया प्रमाणात निधी मिळालेला आहे. कदाचित आपल्या महापालिकेसारख काम महाराष्ट्रामध्ये कुठल्याही महापालिकेत केलेले नसावे एवढया मोठया प्रमाणात आपल्या महापालिकेनी झोपडपट्टी पुनर्वसनमध्ये लोकांना घरे दिलेली आहेत. रस्ते चांगले झालेले आहेत. बंद पाईपलाईन आपण करु शकलो नाहीत. त्याच्यामध्ये राजकीय कारण असतील. काही मंडळीनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये वेगळे बोलायचे आणि मावळात वेगळे बोलायचे असे झाले आहे, अशाप्रकारची भुमिका घेवून त्याठिकाणी शेतक-यांना भडकावून आपली बंद पाईपलाईनची योजना झालेली नाही परंतु पिंपरी चिंचवड शहरात आपण राहतो ज्या नागरीकांसाठी आपण काम करतो, त्या लोकांचा विचार आपण केला पाहिजे आणि पुन्हा एकदा सर्व सभागृहाला विनंती आहे की प्रशासनाने चांगले मांडले, आयुक्तांनी चांगले प्रेझेन्टेशन दिले, चांगले प्रयत्न केले. उदयाच्या काळामध्ये आपल्या शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश करायचातर नुसतं आपण नगरसेवक म्हणुन नाहीतर खासदार, आमदार, सर्व नागरीक, डॉक्टर, वकील सर्व क्षेत्रातील लोकांचा यामध्ये समावेश करुन घेतला पाहिजे आणि सगळयाच्या माध्यमातून आपण केंद्रशासनामध्ये आणि राज्यशासनामध्ये प्रयत्न केले पाहिजेत. मागच्या काळामध्ये लोकसभा, विधानसभेच्या निवडणूकीमध्ये मोदी साहेबांवर विश्वास ठेवून या शहरातील नागरीकांनी सुध्दा खुप मोठया प्रमाणावर या सरकारवरती विश्वास दाखवलेला आहे. त्यांनी सांगीतलेल आहे की देशामध्ये अच्छे दिन आनेवाले हैं. तरी हे अच्छे दिन आपल्या शहरामध्ये सुध्दा यावेत अशाप्रकारची आमची शहरवासीयांची कळकळीची विनंती आहे. या ठिकाणी अधिक न बोलता माझे दोन शब्द संपवितो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. १९६० ते १९७० च्या दशकात पुण्यालगतची गावे म्हणून पिंपरी, चिंचवड, भोसरी, आकुर्डी, निगडी यांचा उल्लेख आढळतो. मोरया गोसावी यांच्या पावनस्पर्शाने पावन झालेल्या पवना तीरावरील ही भूमी क्रांतीवीर चाफेकर बंधूच्या शौर्याने अजरामर झालेले हे गांव. १९७० साली पाच ग्रामपंचायती एकत्रीत करुन नगरपालिकेमध्ये रुपांतर झाले व १९८२ साली नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले. गाव ते शहर, शहर ते महानगर, महानगर ते स्मार्टसिटीमध्ये आपण प्रवेशासाठी प्रयत्नशील आहोत. चिंचवडचे धार्मिक व ऐतिहासीक महत्व, भोसरीतील सांस्कृतिक वारसा, आकुर्डी-प्राधिकरणातील शैक्षणिक संस्थाचे जाळे, हिंजवडी, ताथवडे, तळवडे मधील आयटी पार्क. एमआयडीसी, प्राधिकरण या सर्वामुळे शहराचे नागरीकरण होवून आज आपले शहर २० लाख लोकसंख्यापर्यंत पोहचलेले आहे. शहरातील उदयाने, रस्ते, अंतर्गत रस्ते, स्वच्छता, शहरातील सर्व धर्मीय शांतता या सर्वामुळे आपले शहर देशातील अग्रगण्य शहरामध्ये नावलौकीकात आहे परंतु यामध्ये पवना, इंद्रायणी नदयांची झालेली दुरावस्था रोखण्यात आपण अपयशी ठरलेलो आहोत हे खेदाने म्हणावेसे वाटते. त्यामुळे शहरातील परिसर स्वच्छ व सुंदर होण्यासाठी ज्या पवना नदीचे आपण पाणी पितो ती पवना नदी, इंद्रायणी नदी, यांचा नदी सुधार प्रकल्प या स्मार्टसिटी योजनेच्या माध्यमातून मार्गी लागणार अशी अपेक्षा आमची होती. मी अनेक ठिकाणी फिरलेले आहे परंतु आपल्या शहराचे असणारे भौगोलीक, ऐतिहासीक महत्व हे फार वेगळे आहे त्यामुळे आपल्या शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश व्हावा यासाठी आपण सर्व शहरवासीयांसह सर्वपक्षीय नगरसेवकांनी एकत्रीत प्रयत्न करावेत असे याठिकाणी सांगावेसे वाटते, धन्यावाद.

**मा.अश्विनी मराठे (चिखले) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आज खरंच खंत वाटते की बेस्ट सिटी ॲवॉर्ड मिळालेल पिंपरी चिंचवड शहर आहे आणि आपल्याला या स्मार्टसिटी मधुन वगळलेले आहे. ऑलरेडी आपण एक पाऊल पुढे आहोत. स्वच्छता असेल, रस्ते असतील, अजुबाजूचा परिसर असेल याबाबत बाहेरचे लोक येवून आपले कौतूक करतात की पिंपरी चिंचवड शहर इतरांपेक्षा वेगळे आणि खुप सुंदर आहे. आपला स्मार्टसिटीमध्ये कसा प्रवेश होईल यासाठी सर्व पक्षाने एकत्रीत येवून काम केले पाहिजे, प्रयत्न केले पाहिजेत तरच आपण आहेत त्या जागेवरुन आणखी पुढे जाऊ. नक्कीच मला आशा वाटते की आपल्याला या योजनेअंतर्गत समावेश करुन घेतील. मा.महापौर साहेब, आमच्या पक्षाच्या वतीने मी सांगते की आम्हांला सुध्दा यामध्ये सामील करुन घ्यावे, आम्ही तुमच्या सोबत नक्कीच येवू, कुठल्याही वरिष्ठ मंत्र्यांना भेटण्यासाठी आम्हीही प्रयत्नशील आहोत. काहीतरी त्यात आपल्याला नक्कीच यश मिळेल अशी मी आशा बाळगते आणि मा.महापौरांनी या बद्दल विशेष सभा बोलावली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते, धन्यवाद.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, अधिकारी वर्ग, पत्रकार मित्र. आपला समावेश स्मार्टसिटीमध्ये स्वतंत्रपणे व्हावा यासाठी ही सभा आयोजीत केलेली आहे परंतु खरोखरच समावेश होणार का हा खरा प्रश्न आहे. आपण ही मिटींग बोलावली आहे तरी माझी सर्व सभासदांना, आयुक्तांना सर्वांना विनंती आहे की हा विषय तडीला न्यायचा आहे. नुसती मिटींग घेवून हा विषय आपल्याला थांबवायचा नाही, त्यासाठी सर्व पक्ष आमदार असतील, खासदार असतील, राष्ट्रवादीचे मोठे नेते असतील, सभागृहातील नेते असतील सर्वानी मिळून ताकद लावणे गरजेचे आहे. या विषयी पिंपरी चिंचवड मधील नागरीकांचा अपमान झालेला आहे. वाढलेले ताट परत काढुन घेतलेले आहे त्याचे कारण काय आहे हे आपल्याला माहित नाही त्या कारणांचा शोध लावला पाहिजे. निश्चितपणे शोध लावला पाहिजे. राजकारण असु दया, भ्रष्टाचार असू दया जेव्हा या विषयी चर्चा होते तेव्हा प्रथम अशी गोष्ट डोक्यात येते की पिंपरी चिंचवड आणि पुणे या दोघांचा अहवाल आपण एकत्रीत का पाठवलेला आहे. पिंपरी चिंचवड स्वतंत्र आहे पिंपरी चिंचवडची मोठी ओळख आहे. पुणे, पिंपरी चिंचवड एकत्र का पाठवले, सुरवात याठिकाणाहून झालेली आहे मा.महापौर साहेब, आजची सभा बोलावली मी मनापासून त्यांच आभार मानतो की नागरीकांच्या मनातील इच्छा, झालेला अपमान या विषयी बोलावलेली मिटींग आणि त्याच्यावर पुढे पाऊले उचलायची आहेत त्या विषयी हे होणं गरजेची गोष्ट होती. उत्पन्नाच्या बाबतीत आपण घरपट्टीवर अवलंबुन आहोत, एलबीटी बंद झाली. ताथवडे, रावेत हा जो ग्रामीण भाग आहे या ग्रामीण भागाचा चांगल्या पध्दतीने झपाटयाने विकास व्हावा म्हणून आपल्याला स्मार्टसिटीमध्ये समावेश करुन जो काही निधी मिळाला असता मग तो सुरवातीला १०० कोटी असो किंवा २०० कोटी असो तो आपल्याला खुप उपयोगी पडणार आहे आणि म्हणूनच आपल्याला खुप ताकद लावायची आहे याविषयी आमच्या पक्षाचे महत्वाचे पदाधिकारी अनिलजी शिरोळे यांचेशी चर्चा केलेली आहे. आम्ही चार नगरसेवकांनी निवेदन सुध्दा तयार केलेल आहे जे आम्ही मा.राज साहेबांना देणार आहेत जेणेकरुन मा.राज साहेब मा.मुख्यमंत्र्याशी बोलून प्रयत्न करुन याविषयी काही मदत होऊ शकते का याबाबत प्रयत्न करतील. सर्वानी मिळून ताकद लावायची आहे हा अपमान सहन करायचा पण नाही आणि त्याविषयी भांडायच पण नाही. विनाकारण यामध्ये राजकारण आणु नये अशी सर्व सदस्यांना विनंती आहे हा निधी कसा मिळेल याचा विचार करावा. खरंच निधी मिळवायचा आहे याच्यावर जोर दयावा, एवढ बोलून मा.महापौरांचे आभार मानतो, धन्यवाद.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आपल्या शहराचा स्मार्ट सिटीत प्रवेश न होणे ही खरोखरच अतिशय दूर्दैवी घटना आहे. अनेकांनी सांगितले आहे की, आपण चांगल्या प्रकारे मार्कस् मिळवले आहेत तरीसुद्धा आपला समावेश स्मार्ट सिटीमध्ये झालेला नाही. प्रशासनाने चांगले प्रयत्न केले, आपण सर्वांनी चांगले प्रयत्न केले तरीसुद्धा पुणे

व पिंपरी चिंचवड असे एकत्रित नाव आले होते त्यावेळीच कुठेतरी माशी शिंकली होती. मी पूर्वी एमपीएससीच्या परीक्षा देतो होतो. मी परीक्षेत पास व्हायचो पण पुढे इंटरव्ह्यूला निश्चित फेल व्हायचो. त्यावेळी वशीला नावाची गोष्ट बोलली जायची. मला याची आठवण आली. खरोखरच तसे झाले असेलतर आपण सर्व सन्माननीयांना भेटणे गरजेचे आहे. शहराच्या खासदारांना, आमदारांना कुठे निवेदन द्यायचे. मग ते दिल्ली असेल, मुंबई असेल आम्ही सर्वज तुमच्या बरोबर आहोत. सर्वपक्षीय खासदार यांच्याबरोबर आपल्या शहरातील उद्योजक नागरीक तुमच्याबरोबर आहेत. उदयोगनगरीद्वारे एक्साईज टॅक्स, इन्कमटॅक्स, सर्वीस टॅक असे अनेक प्रकारचे रेव्हेन्यू/उत्पन्न केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होते. असे असताना आपल्या शहराचा, नागरीकांचा काही हक्क नाही का. पूर्वी जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून पैसा मिळत होता. तसा इथून पुढेही निधी मिळाला पाहिजे. हे शहर गतिमान पद्धतीने वाढत चालले आहे. शहराचा विकास गतिमान पदधतीने चालला आहे. आमच्या बाजूला ३/४ वर्षांपूर्वी चांगला निधी मिळत होता. परंतू आता स्मार्ट सिटीत प्रवेश दिला नाहीतर हा निधी शहराकडे डायव्हर्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा निधी एसआरए प्रकल्प असेल, जलवाहिन्या असतील, ड्रेनेज सिस्टीम असेल यासाठी वापरला जात होता. तो निधी आल्यावर आमच्या ग्रामिण भागात खरोखरच चांगली कामे चालू होती. आता आम्हाला भिती वाटते की, आपल्या महापालिकेचा समावेश स्मार्ट सिटी योजनेत झाला नाही याचा निश्चित परिणाम विकास कामांवर होईल. म्हणून आपला प्रवेश स्मार्ट सिटीत निश्चित होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जर असे झाले नाहीतर आपल्या नागरीकांवर किती टॅक्स वाढवायचा याला सुद्धा मर्यादा आहे. म्हणून स्मार्ट सिटी योजनेत प्रवेश करण्यासाठी आज शिफारस करण्यासाठी हा विषय आलेला आहे. सर्वपक्षीयांनी यात निश्चित केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

**मा.वसंत (नाना) लोंढे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर १२ वाजल्यापासून आपण स्मार्ट सिटी या विषयावर चर्चा करतो आहोत. प्रत्येकाच्या मनात आहेच की आमचे शहराचा सहभाग स्मार्ट सिटी योजनेत झाला पाहिजे. नगरसेवकांच्या देखील हेच मनात आहे. मा.बाबासाहेब धुमाळ यांची इच्छा आहे ते त्यांनी मनापासून सांगितले आहे आपल्या महापालिकेचा सहभाग झाला पाहिजे. कोणाचाच विरोध नाही. वैशिष्ट्य हे आहे की, आम्ही पालकमंत्र्यांना भेटलो. त्यांचा सुद्धा विरोध नाही. मी खासदार मा.श्रीरंग आप्पा बारणे यांना भेटलो त्यांचाही विरोध नाही. ३ आमदारांचा, २ खासदार यांचा विरोध नाही. फक्त काही समज गैरसमज झालेले आहेत तेवढे आपण काढावेत. एकत्रित प्रस्ताव दिल्यामुळे कदाचित सुदैवाना दूर्दैवाने काही झाले असले. पण हातच्या काकणाला आरसा कशाला? शहरात प्रवेश केल्यानंतर पिंपरी चिंचवड शहर आल्याचे ताबडतोब ओळखले जाते पुण्याकडून या, मुंबईकडून या कुठुनही या पिंपरी चिंचवड ताबडतोब ओळखले जाते म्हणून म्हणतो,हातच्या कंकणाला

आरसा कशाला. मा.आयुक्त साहेब, तुमची फार इच्छा होती की, पिंपरी चिंचवड शहराचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये व्हावा. तुम्ही प्रत्येकाला आवर्जून फोन करत होता. पिंपरी चिंचवडचा समावेश झाला का. मला तुमच्या चेह-यावरचा हावभाव आठवतो आहे. तुमची किती तळमळ आहे. आमचे शहर स्मार्ट सिटीत सहभागी व्हावे म्हणून तुम्ही कुठे कमी पडला नाहीत. मला वाटते,राजकारण सुद्धा झाले असेल. शक्यता नाकारता येत नाही. काही समज गैरसमज झाले असतील ते दूर करावेत. आदरणीय पवार साहेब आहेत, मा.वैंकय्या नायडू आहेत, पालकमंत्री आहेत. मा.वैंकय्या नायडू यांनी ९ तारीख दिलेली आहे. ९ तारखेला पक्षनेते, विरोधी पक्षनेते सर्वांनी एकत्र जावे. आम्हीही तुमच्याबरोबर येऊ. खरे काय खोटे काय सगळे तिथे गेल्यावरच कळेल. चर्चा करणारी मंडळी आहेत. सगळी बोलकी आहेत. आमचे सभागृह नेते बोलतील, प्रत्येक पक्षाच्या गटनेत्याला बोलू द्या. उगाच वेळ वाया घालवण्यापेक्षा प्रत्येक पक्षाच्या नेत्याला बोलायला संधि द्या. ख-या अर्थाने आपल्याला निर्णय माहित आहेच. कुठेतरी रडल्याशिवाय निर्णय बदलणार नाही. सगळ्या नागरीकांची तळमळ आहे. वायसीएमचे कौतुक संपूर्ण देशात होते. इतक्या स्मार्ट असणा-या शहराला डावलले गेले आहे. राजकारण असो किंवा नसो प्रयत्न तर केले पाहिजेत. ९ तारखेला सर्वांना घेऊन मा.वैकय्या नायडूंबरोबर मिटिंग लावायचे ठरले आहे. त्याप्रमाणे खरोखर मिटींग लावा. आम्ही सगळे तुमच्या पाठिशी आहोत.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, स्मार्ट सिटी साठी आपल्या शहराला डावलले गेले. याची नगरसेविका म्हणून, अधिकारी म्हणून अक्षरशः लहान मुलांपासून सगळ्यांच्या मनात खंत आहे. प्रत्येकाला वाईट वाटले आहे. आपल्या शहराचा एवढा मोठा विकास झाला आहे. आणि आपल्या शहरात अनेक प्रकारचे प्रकल्प राबविले आहेत. मोठे मोठे उड्डाणपूल झाले आहेत. पिंपरी चिंचवड शहरात रस्त्यांचे जे नियोजन आहे तसे पुण्यात सुद्धा नाही. या परिसरात कुठेही जा पिंपरी चिंचवड शहरासारखे नियोजन कुठेच नाही आपल्या एरियात प्राधिकरण आहे. प्राधिकरणात सुद्धा रस्त्यांचे नियोजन खूप चांगल्या पद्धतीने झाले आहे. आपल्या शहराचे नाव डावलले गेले आहे. त्यावेळी प्रत्येकाने त्याच्या मनातून भावना व्यक्त केली आहे. या शहरात टिका-टिप्पणी कोणी करु नये. या शहराचा सर्वांनाच अभिमान आहे. शहरवासी, नागरीक, बंधूभगिनींना सगळ्यांना प्रत्येकाला वाटते आपले शहर स्मार्ट सिटीत गेले पाहिजे. आपला नंबर आला पाहिजे. अनेक जणांनी सांगितले. परिक्षा घेतल्या. आणि परिक्षेत नापास झालो, कमी मार्कस् मिळाले पण आयुक्त साहेबांनी खूप प्रयत्न केले. आयुक्त साहेब, तुम्ही प्रेझेंटेशन दाखवताना इतक्या तळमळीने एक-एक ओळ ४/४ वेळा वाचून दाखवत होते. आयुक्त साहेब तुमचा घसा कोरडा पडला होता. तुमच्या प्रयत्नांना यश आले नाही म्हणून प्रत्येकाला नागरीकांना सर्वांना पिंपरी चिचंवडचे नाव आले नाही याची खंत वाटली आहे. आपले शहर कसे स्मार्ट सिटीत गेले पाहिजे. त्यातून जो निधी मिळणार आहे. त्यातून ग्रामिण भागाचा खरोखर विकास झाला असता. आपली काही गावे शहरात

समाविष्ट झाली आहेत. काही होणार आहेत. या निधीचा उपयोग ग्रामिण भागात प्रकल्प राबविण्यासाठी होणार आहे. याठिकाणी बाहेरचे लोक येऊन पाहणी करुन गेले होते. त्यांनी या शहराचे खरोखरच कौतुक केले आहे. पिंपरी चिंचवड शहरात जे मोठे मोठे प्रकल्प राबविले आहेत. त्यासाठी शहराला धन्यवाद दिले होते, शाबासकी दिली होती. मा.अपर्णाताई डोके यांनी सांगितले, शहरात चांगल्या पद्धतीने नाव कमवलेली ही आशिया खंडात नावाजलेली महापालिका आहे. आपण कुठे कमी पडलो हे शोधले पाहिजे. आपण स्मार्ट आहोतच मग आपल्याला कमी का लेखले गेले याची खंत आहे. सर्व पक्षांच्या पदाधिका-यांनी,नगरसेवक,आमदार,खासदार यांनी प्रयत्न करुन आपली महापालिका स्मार्ट सिटी योजनेत गेलीच पाहिजे. सर्वांनी प्रयत्न करुन सर्व नगरसेवकांनी व अधिका-यांनी, १७ तारखेला गणरायाचे आगमन होणार आहे, आपण गणरायाच्या चरणी प्रार्थना करु. व सर्वांना विनंती करते की, आपल्या महापालिकेचा स्मार्ट सिटीत समावेश कसा होईल यासाठी गणराच्या चरणी प्रार्थना करु. माझे दोन शब्द संपवते.

**मा.शुभांगी लोंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, संपूर्ण शहरातील नागरीकांचा प्रतिनिधी म्हणून, शहराची नागरीक म्हणून माझी इच्छा आहे, रावेत मधील नागरीकांच्या वतीने सांगते, या शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश व्हावा म्हणून प्रयत्न करावा यासाठी आम्ही तुमच्याबरोबर आहोत.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज तुमचे अभिनंदन केले पाहिजे. आज तुम्ही अत्यंत महत्वाच्या विषयावर विशेष सभेचे आयोजन केले आहे. यात स्मार्ट सिटीमध्ये आपला समावेश होण्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार करण्यासाठी सभा बोलवली आहे. त्याबद्दल आपले मनापासून आभार. ज्या-ज्या वेळी ज्येष्ठ नगरसेवक उभे राहिले, त्यावेळी अनेकांनी सांगितले की, आपल्या बोलण्यात राजकारण नको. त्यांनी त्यांनी त्यांच्या पद्धतीने पुन्हा राजकारण आणलेच ही वस्तुस्थिती तुम्हाला, कोणालाही नाकारता येणार नाही. राजकारण आणायचे नाही हे म्हणणे जितके सोप्पे, तितकेच बोलण्यावर नियंत्रण ठेवणे सोप्पे असले पाहिजे होते. पण ज्या पद्धतीने सांगितले गेले ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. इथे श्रेय लाटायचा प्रश्न नाही, तुम्ही केले का मी केले, या पक्षाने केले का त्या पक्षाने केले हे सांगायची गरज कोणाला नाही. मला वाटते १३३ नगरसेवक सगळे सक्षम आहेत. आपल्या शहरात काय चालले आहे याची पाहणी करायला. महासभा बोलवली आहे तर यावेळी अशी चर्चा व्हायला नको होती. आपण आजच्या या स्मार्ट सिटी योजनेत सहभागी नाही आहोत. अत्यंत दुःखद गोष्ट आहे की, आपण स्मार्ट सिटीत नाही. खरेतर आपण स्मार्ट आहोत. आपण कामकाजाच्या वाटचालीत नेमके कुठे कमी पडलोत. मी पोमण साहेबांना विचारले, ब-याच जणांनी सांगितले आपल्याला ९२.५ टक्के गुण मिळाले आहेत. शासनाचे तसे पत्र असेल तर दाखवा. आम्हाला सुद्धा कळेल. त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, ताई तसे काही नाही. १० पैकी १० गुण या पद्धतीने आपणच आपल्याला गुण द्यायचे मला ही गोष्ट काही

रुचली नाही. आपण अभ्यास केला, आपण परिक्षा दिली. आणि आपणच पेपर तपासायचा. आणि म्हणायचे मला ९२.५ टक्के आहेत. मला आपल्या गुणांबद्दल शंका नाही. परंतू ९२.५ हा आकडा कोणत्या निकषांवर काढला आहे. माझ्या चष्म्यातूनची मी मला बघायचे. असे होत नाही. निश्चितपणे कुठेतरी शासनाकडून त्या पद्धतीने गुण देण्यात आले असावेत. परंतू तसे नाही. इथे आपणच आपले गुण ठरवले. आपल्याला पाण्यामध्ये गुण कमी का पडले, जेएनएनयूआरएममध्ये ५च गुण का पडले हे आपले आपणच ठरवले. यापेक्षा कदाचित आपण सगळे प्रयत्न करणार आहोत. सगळे नगरसेवक सगळे शहरवासिय आपल्या शहराचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये होण्यासाठी मनापासून प्रयत्न करणार आहेत. परंतू ते प्रयत्न करत असताना आपण कुठे कमी पडलोत. We are smart. समजा आपल्याला स्मार्ट सिटी योजनेत घेतले नाहीतर आपण काम करु शकतो हा विश्वास आपल्यात नाही का. मान्य आहे यातून आपल्याला विशिष्ट प्रकारची रक्कम खर्च करायला मिळणार होती. रखडलेल्या योजना पूर्ण करायला आपल्याला निधी मिळणार होता. त्या माध्यमातून कदाचित भर पडली असती. तरीसुद्धा आपण ही रक्कम स्वबळावर कशी निर्माण करु शकतो याचे स्त्रोत आपण शोधले तर शक्य नाही का. प्रत्येक वेळी समोरच्याने केले. सभागृहात बोलले गेले हे सगळ्यांना माहित आहे. तुम्हालाही माहीत आहे. पत्रकार बंधूंना माहित आहे. या शहरात भ्रष्टाचार होतो. भ्रष्टाचार सगळीकडे आहे. अनेकांनी सांगितले, इकडे कमी आहे. घाणीशी तुलना कशाला करायची. We are bright. आपण चांगल्या ठिकाणी जाण्यासाठी प्रयत्न करतोय. आपले विचार चांगले आहेत. आपण चांगल्या पद्धतीने तुलना करताना खालच्यांशी का करायची. वरच्यांशी करा. बाहेरच्या देशांतील सिटींशी तुलना करा. झोपडीत राहणा-यांशी तुलना केलीतर झोपडीपेक्षा चाळीत राहणे चांगले वाटते. बंगल्याशी तुलना केलीतर चाळीत राहण्यापेक्षा बंगल्यात राहणे चांगले वाटते. आपण काम करताना काय चूक झाली, कुठे कमी पडलोत. या पुढील काळात ५०० कोटी आपल्या हातात आहेत. आपण हे ५०० कोटी शहरासाठी आणू शकलोतर तर निश्चितपणे याचे श्रेय सगळ्यांनाच असणार आहे. पण हे ५०० कोटी शहरासाठी आले नाहीततर आपले नियोजन काय असले पाहिजे. आपल्याला बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला. आपण खरोखर लाएबल आहोत. तरीसुद्धा पुन्हा मागे वळून बघावेसे वाटते की, या शहरात अजूनही हगणदारी आहे. आजही महापालिकेच्या डावीकडे बघा, उजवीकडे बघा, ही अवस्था आपल्याला पाहायला मिळते. किमान बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाल्यानंतर तरी महापौर म्हणून आपली, आयुक्त म्हणून ही आपली जबाबदारी होती. आपण आपला परिसर स्वच्छ केला पाहिजे. आपल्याकडे क्वालिटीज् होत्या पण त्या शंभर टक्के सक्षम करण्यासाठी प्रयत्न का केला नाही. शहरातून अनेक मोठमोठे कारखाने शहराबाहेर गेले आहेत. पुढील काळात ते आपल्याकडे कसे राहतील हे पाहिले पाहिजे. आपल्या शहरातील एक कंपनी शहराबाहेर गेलीतर त्या जागा कोणाच्या ताब्यात येतील, तिथे कोणती इमारत बांधता येईल यासाठी लगेच स्वप्नांची चढाओढ चालू होते. पण माझ्या

शहरातली एक कंपनी शहराबाहेर गेली तर त्या कंपनीत काम करणा-या कर्मचा-यांचे काय हा विचार करणे आवश्यक आहे. उद्‌योगांचे शहर म्हणून आपल्या शहराची ओळख आहे. सिमेंटचे घरांचे भिंतींचे शहर असे न ठेवता इंडस्ट्रीयल अशी ओळख कशी राहील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आपले शहर मॉडर्न असले पाहिजे. कुठेतरी माझे, तुमचे, माझ्यापुरतं हे बंद केले पाहिजे. शहराचा विकास सर्वांगीण कसा होईल, शहरातील झोपड्या असो किंवा तारांकीत बिल्डींग असतील, सर्वांना समान न्याय कसा देता येईल, हवा प्रदूषण, नदीचे प्रदूषण यासाठी काम केले पाहिजे. नदी गटार दिसायला लागते. नदीचे दोन थेंब पाणी तरी आपण प्यायचे आहेत का. पर्यावरण अहवाल झाला. त्यात आयुक्त साहेबांचे मनोगतसुद्धा बदलले जाऊ नये. तेच पुन्हा छापले आहे. इतक्या ब्लाईंडली पर्यावरण अहवाल करतोय, तो रिझल्ट ओरिऐंटेड केला पाहिजे. तसे झालेले नाहीतरी आमच्या शहरातील आयुक्त असतील, प्रशासन असेल, शहरवासिय असतील, सगळे हे ५०० कोटी कसे उभारु शकू, हे ५०० कोटी कसे सक्षम वापरायचे यासाठी निश्चितपणे प्रयत्न करु असे याठिकाणी वाटते आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आपण जे आत्ता करतोय ते अगोदरच करायला पाहिजे होते. आम्हाला आयुक्त साहेबांनी दोन वेळा सादरीकरण दाखवले, ते आम्ही दोन वेळा पाहिले आहे. पीसीएमसीच्या प्रशासनाने सर्व सर्वे केला होता का असा प्रश्न आम्ही त्यांना विचारला. तेव्हा ते म्हणाले सर्वे केला नव्हता. स्मार्ट सिटी करताना वेगळा विषय हातात आहे. स्मार्ट सिटीचे सर्वेचे काम केंद्र सरकारने ज्या कंपनीला त्यांनी दिले होते, त्यांचे ऑफीस नगररोडला आहे. मूळ कंपनी गुजरातची आहे. या कंपनीला सर्वेचे काम देताना त्यांनी वेगवेगळ्या पाच विषयांचा सर्वे हा पूर्ण भारतातल्या कंपन्यांचा करायला सांगितला होता. त्यात त्यांनी टॅबचा वापर केला आहे. आणि ते टॅब पूर्ण नादुरुस्त आहेत अशी माहिती आमच्याकडे आली आहे. मला वाटते, आज आपण स्मार्ट सिटीत नाही आहोत. आपल्याला याचा काही उपयोग करुन घेता येतो का. जर त्यांनी केलेल्या सर्वेवर या स्मार्ट सिटी होत असतील तर या ९८ सिटीज कोणत्या पद्धतीने शोधल्या हा प्रश्न पिंपरी चिंचवडकरांकडून आम्ही करु शकतो. एवढेच बोलते व थांबते.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, स्मार्ट सिटीबद्दल सर्वांची स्मार्ट चर्चा झाली आहे. प्रत्येकाचे मत खूप छान आहे. सगळ्यांनी त्यांचे मत मांडले आहे. या योजनेत सहभाग झाला नाही याचे दुःख सर्वांनाच आहे. पक्षातील असो, विरोधी पक्षातील असो. पुण्याबरोबर पिंपरी चिंचवडचे नाव एकत्रित जोडले होते, त्यावेळी थोडा आंनंद झाला होता आणि दुःख सुद्धा झाले होते कारण तिथे काम करताना पीएमपीएमएलसारखी सुविधा आपल्याला मिळाली असती. यापेक्षा एकत्रितपणे नाही झाले ते चांगले झाले. स्मार्ट सिटीमध्ये सहभाग करताना जे राजकारण झाल्याचे ऐकतोय, वाचतोय. हे म्हणतोय, भ्रष्टाचारामुळे झाले आहे. हे म्हणतोय, मुद्दामच केले आहे. प्रत्येक जण म्हणतोय, खरे

राजकारण करु नका. खरोखरच गरज आहे. कळवळून सांगते आहे. हिच कळवळ ठेवली तर सहभागी न होताही आपण हे शहर स्मार्ट सिटी बनवू शकतो. पण आपण स्मार्ट सिटीमध्ये सहभागी झाले पाहिजे ते निधीसाठी. कारण सगळी सोंगे करता येतात पण पैशाचे सोंग करता येत नाही. त्यामुळे त्यासाठी तरी सगळ्यांनी एकीने प्रयत्न केले पाहिजेत. आत्ता सांगितले जाते, कोणाला बोलवले नाही, खासदार, आमदार यांना बोलवले नाही. घरातले कुठले कार्य असले की घरातला मानपान असतो त्यासारखे मला वाटते आहे. हे मी हराच्या वतीने बोलतेय. शहराच्या विकासासाठी चालले आहे. प्रत्येकाने आमदार असतील, खासदार असतील प्रत्येकाने स्वतःहून प्रयत्न केले पाहिजेत मला कोणत्या पक्षाबद्दल बोलायचे नाही. मला माझे मत मांडायचे आहे. परिक्षा दिलीत. परिक्षेत पास पण झालात. पेपर परत रिचेक करतोय. प्रयत्न करु ॲडमिशन मिळाले तर ठिक नाहीतर किंवा आपणच स्मार्ट सिटी बरोबर स्पर्धा करुन स्मार्ट सिटी पेक्षा चांगला विकास कसा करता येईल हे नगरसेवक एकत्रितपणे बोलत आहेत. पक्षीय वाद न करता व भ्रष्टाचार मुक्त केलेतर आपला समावेश स्मार्ट सिटीत होऊ शकतो. भ्रष्टाचार होऊन सुद्धा एवढी सुधारणा होते आहे १०० टक्के भ्रष्टाचार मुक्त झालोतर त्या निधीची सुद्धा आपल्याला आवश्यकता लागणार नाही. स्मार्ट सिटीतील स्मार्ट नागरीक होऊन जगापुढे, सरकारपुढे उदाहरण देऊ. स्मार्ट सिटीत जाण्यासाठी प्रयत्न तर करुच. आपल्याकडे पर्याय नाही. कारण आपल्यापुढे निधी हा मोठ्ठा प्रश्न उभा आहे. एलबीटी बंद झाल्यामुळे आपण निधी नसल्यामुळे काहीच करु शकत नाही. स्वप्न भरपूर पाहू शकतो काहीजण म्हणाले की, या मित्रांना जाऊन भेटले पाहिजे, या नेत्यांना जाऊन भेटले पाहिजे. जसे आपण दुष्काळाचे प्रयोजन करतोय तसे स्मार्ट सिटीचे प्रयोजन करावे असे मला वाटते आहे.. आपण करत असालतर प्रयत्न करु. करायचे म्हणून करायचे नाही. प्रत्येकाने प्रयत्न करु, मनापासून जाऊ, राजकारण बाजूला ठेवून, पिंपरी चिंचवड शहरासाठी सगळे एकत्र येऊन स्मार्ट सिटीत समावेश होण्यासाठी प्रयत्न करु एवढीच इच्छा आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आपण सभा बोलवलीत त्याबद्दल मी महापौरांचे मनापासून धन्यवाद मानतो. आणि सुलभाताईंचे सुद्धा आपण अतिशय चांगल्या पद्धतीने स्मार्ट सिटीमध्ये कसा सहभाग होईल याची संपूर्ण माहिती, महापालिकेत काय काय केले पाहिजे काय नाही, कामकाज कशा पद्धतीने चालते ते सगळे आपण दाखवले. इतक्या चांगल्या पद्धतीने सादरीकरण करुन देखील आपल्या महापालिकेचे स्मार्ट सिटीत नाव येईल अशी सर्वांना अपेक्षा होती. सर्वांनी सांगितले, मीही सांगतो, पुणे सिटी व पिंपरी चिंचवड महापालिका यांचा प्रस्ताव एकत्र केल्यामुळे राज्याला दहा महापालिकांची मान्यता होती. त्यात आपले पिंपरी चिंचवड व पुणे एकत्रित अहवाल गेल्यामुळे आपल्याला बाजूला टाकण्यात आहे. वास्तविक आपण मागे मा.योगेश बहल हे महापौर असताना आपल्याला देशात बेस्ट सिटी म्हणून अवॉर्ड मिळाला होता. आपल्या महापालिकेत आण्णासाहेब

मगर असल्यापासून आजपर्यंत चांगल्या पद्धतीने कामे झाली आहेत. एवढी मोठी कामे होत असताना टिका टिप्पणी ही होतच असते की कुठे भ्रष्टाचार झाला, कुठे काय झाले. जेएनएनयूआरएममार्फत शासनाने भला मोठा निधी दिला. आपली १.५ योजना काही कारणाने गुंडाळली गेली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला मान्यता नसल्यामुळे ती योजना थांबली गेली जेएनएयूआरएमच्या माध्यमातून शहरात अनेक चांगली कामे झाली आहेत. असे काहीतरी निकष लावून जर महापालिकेला योजनेतून बाजूला करत असतील तर ते चुकीचे आहे काही नेते मंडळी म्हणतात, महापालिकेत भ्रष्टाचार झाला आहे. भ्रष्टाचार झाला असेलतर शासनाने निश्चित याची चौकशी केली पाहिजे. सीबीआयकडून चौकशी करा. बेस्ट सिटी म्हणून देशात आपली महापालिका निवडली गेली आणि महाराष्ट्रातील दहा महापालिकांमध्ये आपले नाव नाही याची मला खंत वाटते. सेक्टर २२मध्ये झोपडपट्टीतील स्वच्छतेवर भर दिला. मा.आयुक्त साहेब, आपल्याला स्मार्ट सिटी योजनेत येण्यासाठी काही निकष पूर्ण करावे लागतील. सार्वजनिक शौचालये वापरतात त्याठिकाणी नागरीक वैयक्तिक शौचालये कशी वापरतील यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. १९९७ सालच्या पंचवार्षिकमध्ये मी सेक्टर २२ मध्ये रु.१,०६,००,०००/- खर्च करुन १५०० घरगुती संडास बांधले. तेथील नागरीकांच्या आरोग्यात चांगली सुधारणा झाली. नागरीकांकडून रु.५००/- घेतले व आपले रु.८,०००/- असे रु.८,५००/- पेक्षा जास्त संडास बांधून टेंडर काढून दिले. त्यामुळे प्रत्येक नागरीक स्वतःचा संडास वापरायला लागला. त्याठिकाणी डुकरे वगैरे असतात ते देखील नाहीसे झाले आहेत. जिथे घाण होती तिथे स्वच्छता झाली आहे. शहर स्मार्ट करण्यासाठी आपण प्रयत्न करतोय. आपण स्मार्ट आहोतच. आपले शहर स्मार्ट आहे. ज्यावेळी स्पर्धा सुरु असताना आपल्याला वाटते,आपला नंबर आला पाहिजे. आणि आपला नंबर आला नाही त्यामुळे खंत वाटतेय. महाराष्ट्र सरकारकडून १० महापालिकांची नावे कळवली आहेत. केंद्र सरकार म्हणते, अजून त्या महापालिकांचे आमच्याकडे काही आले नाही. त्या दोन महापालिकांत आपला नंबर असावा यासाठी आपण मागणी केली आहे. आपले २ खासदार व ३ आमदार यांना सोबत घेऊन आदरणीय अजितदादा पवार असतील, आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब असतील यांना सोबत घेऊन लवकरात लवकर वेळ निश्चित करावी व त्यांची भेट घेऊ. धन्यवाद.

**मा.कैलास कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आपल्या पिंपरी चिंचवड शहराला स्मार्ट सिटीमधून वगळण्यात आले त्याबद्दल अतिशय खंत वाटते पण किमान या उद्योगनगरीत, या कामगारनगरीत कामगारांचा व कष्टक-यांचा हा घोर अपमान भाजप सरकारने केला आहे असे इथे नमूद करतो. ज्या-ज्या वेळी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून आज किमान पिंपरी चिंचवड शहराची तिथे वर्णी लागली असतीतर किमान कष्टकऱ्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा पिंपरी चिंचवड शहरात मिळाल्या असत्या तसे न करता किमान काहीतरी भ्रष्टाचाराचे आरोप करुन त्याठिकाणी पिंपरी चिंचवड महापालिकेचे नाम त्यातून वगळण्यात

आले. किमान ज्या-ज्या वेळी त्या-त्या प्रकारची मागणी केलीत. जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून अनेक फंडींग आले. ज्या-ज्या वेळी फंडींग आले, त्यावेळी चांगल्या प्रकारची कामे झाली आहेत. उदा. वायसीएम असेल, अनेक छोटे-मोठे फ्लायओव्हर असतील, चांगल्या गार्डन्स असतील, महापालिकेच्या माध्यमातून शहरात चांगली कामे झाली आहेत. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सन्मा. खासदार मा.अशोक चव्हाण व शहराचे अध्यक्ष मा.सचिन साठे यांच्या माध्यमातून निवेदन दिले आहे. त्यांनी सांगितले, आम्ही देशाचे पंतप्रधान सन्मा.नरेंद्र मोदी यांना निवेदन देणार आहोत. त्यांनी सांगितले, त्यांनी परवाच पेपरमध्ये वाचले, माजी उपमुख्यमंत्री, माजी पालक मंत्री मा.अजितदादा पवार यांनी सांगितले की, ते मा.नरेंद्र मोदी यांना भेटायला जाणार आहेत. निश्चितपणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन देणार आहेत, चर्चा करणार आहेत. जो अपमान कामगार व कष्टक-यांचा केला आहे तो न करता पिंपरी चिंचवडचा यात समावेश करुन घ्यावा अशी मागणी आमच्या कॉंग्रेस पक्षाच्या वतीने करणार आहोत.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर माझ्यासारखा एक सदस्य पहिल्या वेळी सभागृहात आला. परंतू गेली २५ वर्षे या शहरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका काय आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची राज्यात नव्हेतर देशातील किंमत काय आहे हे माझ्यासारख्या कार्यकर्त्याने गेले २५ वर्षांत वर्तमानपत्रात अनुभवले आहे. आणि आता वाईट/कटू अनुभव पिंपरी चिंचवड शहरात अनुभवायला मिळतो आहे की, आपल्या शहराचा स्मार्टसिटीत समावेश नाही. चांगले काम केले म्हणून या राज्याने या देशाने या महापालिकेला पुरस्कार दिला. तरीसुद्धा स्मार्टसिटीत समावेश देत असताना राजकारण झाले. का त्यापलिकडे राजकारण झाले ते फक्त परमेश्वरालाच माहित असेल. आम्हाला राजकारण नको समाजकारण करायचे आहे. पिंपरी चिंचवड शहरातील २० लाख लोकसंख्येला ख-या अर्थाने आम्हाला न्याय द्यायचा आहे. आणि न्याय देत असताना राज्याने किंवा देशातील नेते मंडळींनी अन्याय केला असेल तर माझ्यासारखा त्या अन्यायाला स्विकारत नाही. कारण या शहराची ओळख जगाच्यापलिकडे गेलेली ओळख आहे. जे निकष लावले आहेत त्यानुसार १० नावांच्या आतमध्ये आपण असताना या शहराचे नाव कमी झाले हा सर्वसामान्य मजूरापासून उद्योजकापर्यंत सर्वांनाच ख-या अर्थाने पडलेला प्रश्न आहे. १९८६ साली महापालिका झाली त्यावेळी शहराची स्थिती काय होती. २०१५ मध्ये या शहराची स्थिती काय आहे या मधल्या काळाचा अभ्यास या राज्याने देशाने केला असतातर कोणाच्या बापाची हे नाव डावलायची हिंमत झाली नसती. कारण या शहरातील कामगारांना मजूरांना दिलेलं काम, दिलेली वागणूक, मा.महापौर साहेब, आपण टेन्शन घेऊ नका. कारण स्मार्ट सिटीतून नाव कमी होणे हा ख-या अर्थाने सभागृहात बसणा-या सर्व सन्माननीयांचा अपमान आहे. कारण आम्ही ज्यासाठी बसलो आहोत, तसे घडलेले नाही. असे असताना आयुक्त साहेब मी यासाठीच

बोलायला संधी घेतली आहे. आत्ता मा.कैलास कदम यांनी सांगितले, आपल्याबाबतीत काही अपप्रचार झाला असेल, काही विकासासंदर्भात चर्चा, आरोप झाले असतील. आपल्याकडे गेल्या २५ वर्षांत या महापालिकेत चांगला सुजलाम सुफलाम विकास झाला आहे. मला आठवते आहे, मा.वसंतदादा लोंढे हे राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष होते. त्याकाळात आम्ही छोटे कार्यकर्ते होते. सत्ता राष्ट्रवादी पक्षाची आहे म्हणून बोलायचे आहे. त्यांनी आपल्याला स्मार्ट सिटीतून वगळले. आपण कायद्याप्रमाणे काय पूर्तता करु शकतो हे प्रशासन आपण एकटे न करता आम्हीही आपल्याबरोबर आहोत. आपण सर्वजण मिळून मा.मुख्यमंत्री यांची एखादी तारीख घ्या. आपले शिष्टमंडळ तिथे जाऊ द्या. आपल्या शहराचा समावेश स्मार्टसिटीत होऊ द्या असे निवेदन त्यांना द्या. त्यांना आमच्या भावना सांगा. जोपर्यंत सन्मा.सदस्य सभागृहात बसलेले आहेत, जे प्रशासक आहेत त्यांच्यापर्यंत जनतेच्या आलेल्या सूचना जोपर्यंत जात नाहीत, तोपर्यंत आपल्या शहराचा समावेश स्मार्ट सिटी योजनेत होईल असे वाटत नाही. मी प्रशासनाला विनंती करतो की, आपण कायदेशीर बाबींतून काही मार्ग काढता येतो का ते पहावे. सन्मा.मुख्यमंत्री महोदयाची भेट घेऊ. त्याठिकाणी आपल्याला विनंती आहे की, मा.मुख्यमंत्री यांना सांगा. एवढ्या मोठ्या सुंदर शहरावर अन्याय होतो आहे. म्हणून आमच्या विनंतीचा मान ठेवा, सूचनांचा मान ठेवा. पिंपरी चिंचवड शहराचा समावेश स्मार्ट सिटीत करावा अशी सूचना करतो

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज खरेतर मी तुमचे मनापासून आभार व्यक्त करतो की, आपण स्मार्ट सिटी या विषयावर बैठक आयोजित केली आहे. बराच वेळ झाला, आपण स्मार्ट सिटीबाबतीत चर्चा करतोय. दोन कॉमन मते आहेत की, एक मत आहे की आपण मुळातच स्मार्ट आहोत. आणि दुसरे कॉमन मत असे आहे की, आपली स्मार्टसिटीतली निवड निश्चित झाली पाहिजे. आयुक्त साहेब आपण गेले २ वर्षांपासून काम करताय. मी मुद्दाम जाणिव करुन देतो की, आपण का स्मार्ट झालो आहोत याचा कदाचित सर्वांना विसर पडला असेल. आपल्याला अजून सुंदर व्हायचे आहे. आपल्याला स्मार्ट सिटीत प्रवेश करायचा आहे असेच सगळ्यांना वाटते आहे. आजरोजी आपण स्वतःला स्मार्ट म्हणत आहोत हे कोणामुळे, कशामुळे याचासुद्धा भूतकाळ आपण विसरला नाही पाहिजे खरेतर जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून गेल्या ५/६ वर्षांमध्ये २,००० कोटींची कामे झाली आहेत. ते मिळाले नसते तर काय झाले असते? आज छोट्या-छोट्या गावांचे मोठे शहर झाले आहे. पहिल्यांदा नगरपालिका झाली, नंतर महानगरपालिका झाली आहे. अतिशय कमी वेळात असा विकास करणारी देशातील ही एकमेव महापालिका आहे. ७२ टक्यांपासून आपली लेटेस्ट ग्रोथ आज १५५ टक्यांपर्यंत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात विकास झालेली महापालिका संपूर्ण भारतात नाही. जगाशी तुलना करु नका. परंतू हे कुणामुळे आहे. इथे चांगले शिक्षण मिळते, रहायची चांगली व्यवस्था मिळते, पिण्यासाठी चांगले पाणी मिळते. तुम्हाला किमान त्रास होईल असे आरोग्यदायक वातावरण आहे. तुम्हाला किमान त्रास होईल अशी प्रशासकीय यंत्रणा इथे

कार्यरत आहे. हे सगळे असल्यानंतर आपण ७/८ वर्षात शहराचा विकास झालेला पाहतोय. आपल्या शहराला जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून मिळालेले दोन/अडीच हजार कोटी असेच खर्च झाले आहेत का. जेएनएनयूआरएम यांनी सुद्धा क्रायटेरीया केला होता. त्यात पिंपरी चिंचवड शहराला पुणे शहराबरोबर एकत्रित धरले आहे. त्यानंतर आपला निधी कमी होईल असे त्यांना वाटले असेल. काँग्रेस व राष्ट्रवादीची सत्ता केंद्रात, राज्यात दोन्हीकडे होती. हे सगळे असताना आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांनी हा निधी यशस्वीपणे खेचून आणला. आपल्याला हजार कोटी रुपयांचा निधी वेगळा दिला व पुणे शहराला वेगळा निधी दिला. पुणे शहराने त्या निधीचे काय केले याच्या खोलात आम्हाला जायचे नाही. मात्र आपण, आपली प्रशासकीय यंत्रणा व सत्ताधारी पक्षाने या शहराचा कायापालट करुन दाखवलेला आहे हे वास्तव तुम्हाला आम्हाला झाकता येणार नाही. हे असताना सुद्धा आजची बैठक कशासाठी होते आहे ही मात्र मनापासून खंत आहे यात शंका नाही. मा.बाबासाहेब धुमाळ यांनी सांगितले तुम्ही आत्मचिंतन करा. मी स्वतःचे आत्मचिंतन केले. तर मला वाटले,आपण या शहरात राहतो आहोत याचा आम्हालाही काही वेळांपूर्वी अभिमान होता. आता अवमान वाटायला लागला आहे. परंतू आज मा.धुमाळ साहेबांच्या माध्यमातून मला एक आशेचा किरण किंवा आज राज्यशासनात किंवा केंद्र शासनात जी सत्ता आहे. आज यांच्या प्रयत्नांतून, यांच्या माध्यमातून आपण कुठेतरी दरवाजा ठोठावला तर काहीतरी हातात मिळावे अशी अपेक्षा आहे. वास्तव परिस्थिती पाहिली तर स्मार्ट सिटीमध्ये आपल्याला किती पैसे मिळणार आहेत. स्मार्ट सिटी योजनेत केंद्र शासनाचे १०० कोटी, राज्य शासनाचे ५० कोटी व आपले ५० कोटी असे २०० कोटी असा सहभाग असणार आहे. याला सुद्धा वर्षाला मर्यादा आहे. वर्षाला १०० कोटींपेक्षा जास्त मिळणार नाहीत. त्यापेक्षा आपल्याला एलबीटीतून ५०० कोटी प्रतिवर्षी मिळत होते. आज आपल्याला पॅकेज देण्याची भाषा दुसरीकडे केली जाते. बाकी सगळा देण्याचा भास केला जातो. व्यापा-यांच्या बाजूने कायदे झाले. हे सगळे होत असताना दुसरीकडे आपल्या जमा होणाऱ्या २०० कोटींनी प्रति वर्षाला आपल्या शहराचे नक्कीच कुठे काही अडणार आहे का. नक्कीच अडणार नाही. परंतू शहराच्या मुलभूत सुविधांमध्ये आणखी सुविधा करता येतात. त्याच्यासाठी त्यांनी क्रायटेरीया ठेवला आहे, ज्यासाठी हा निधी ठेवला आहे ती आवश्यक कामे आहेत. ती आपल्याला आणखी चांगल्या पद्धतीने करता येतील यात मात्र आपण थोडे कमी पडलो यात शंका नाही. मा.आशा शेंडगे ताईंनी सांगितले की, आपले गुणांक आपणच दिले. आपणच आपला पेपर तपासले. त्यांनी भरपूर गुण दिले. हे जरी खरे असले तरी किती गुण द्यायचे हे त्यांनी ठरवले. त्यात आपण बसतोय का हे आपल्याला समोर दिसतं होत की आपल्याला यात एवढे गुण मिळत आहेत. याची स्मार्ट दृष्टी आमच्याकडे आहे. त्यानुसार ९०/९२ गुण मिळाले. पण मा.अतुल शितोळे यांनी तो क्रायटेरीया वाचला. ३६ शहरांचा आहे. जुने कलकत्ता शहर पाहिले. इतर शहरांशी तुलना केली तर आपण त्या योग्यतेचे नाही का अशी भावना होते.

आपल्या शहराला मी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो, मा.योगेश बहल महापौर होते, त्यावेळी पंतप्रधान मा.मनमोहन सिंग यांच्या हस्ते बेस्ट सिटी पुरस्कार मिळाला होता तिथे आपण काय वादावाद केला होता का तर नाही. काम करुनच आपल्याला बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला आहे. गरीबांना घरे देण्यासाठी, आपली ड्रेनेज व्यवस्था चांगली आहे यासाठी पुरस्कार मिळाला आहे. आपल्याला वॉटर व सुवेजमध्ये बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला आहे. आपण काहीतरी करुन दाखवले आहे. जेव्हा स्मार्ट सिटी योजना डिक्लेअर झाली, ते झाल्यानंतर कोणी कोणाचे श्रेय घेण्यापेक्षा, भ्रष्टाचार हा त्यात क्रायटेरीया होता का. क्रायटेरीया काय असतो. काम किती केले यासाठीच पिंपरी चिंचवड महापालिकेला ९२ टक्के गुण मिळाले. ९२ टक्के गुण मिळून सुद्धा राजकीय आरोप, प्रत्यारोप करुन, राजकीय पोळी भाजून आपल्या शहराचे नाव या योजनेत यावे यासाठी धडपड करण्यापेक्षा का आले नाही आणि तुम्ही कसे चुकलात यावर चर्चा केली जाते आहे. आम्ही चुकलोतर तुम्ही वर आहात. तुम्ही बरोबर करा. आपल्या शहरावर त्यांचे उपकार होतील. पूर्वी आपल्या राज्यात भाजप-शिवसेना युतीचे सरकार होते. आत्ता फक्त भाजप, भाजप भाजप आमच्याही तोंडात एकच येते. कारण आम्हाला माहित आहे, शिवसेनेची खरेतर मनापासूनची तळमळ आहे. प्रत्येकाला वाटते, पण वर केंद्रात बसलेले, निर्णय घेणारे सगळे भाजपाचे लोक आहेत म्हणून शंका येते की, आपल्या शहराला मुद्दाम डावललेले आहे. गेल्या १० वर्षांचा विकास पाहिला तर आयुक्त साहेब तुम्ही सांगा, असे कोणते शहर आहे. आयुक्त साहेब तुम्हीसुद्धा शहरात कार्यक्रमाच्या निमित्ताने फिरत असता. आपल्या कॅटेगरीतले कोणते शहर आहे. वायसीएमसारखे एवढे मोठे हॉस्पिटल चांगल्या पद्धतीने सांभाळणारे कोणते शहर आहे. कुठले शहर आहे, इथे प्रशस्त रस्ते आहेत. दोनशे अडीचशे किलोमीटरचे अंतर शहरात एका मिनिटांत पूर्वेकडून पश्चिमेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे जाता येते. असे एकतरी शहर महाराष्ट्रात आहे का. आपण इथे १५ मिनिटांत कमीत कमी २० ते २५ कि.मी.चा प्रवास उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम करु शकतो. आपण मुळातच स्मार्ट झालेलो असलो, हजारो कोटीं खर्च केले असतील, त्यात काही प्रमाणांत यशस्वी झालो आहोत, काही प्रमाणांत काही नियम चुकले असतील, काही प्रमाणांत काही त्रुटी राहिल्या असतील. परंतू हे सगळे करत असताना जो करतो तो चुकतो, जो काही करत नाही तो बिनचूक बरोबर असतो. बिनचूक असणा-यांनी फक्त आरोपच करायचे असतात. त्यावेळी ते आरोप करणा-याच्या भूमिकते होते. आज आम्ही आहोत असे समजा. परंतू काम करुन दाखवल्यानंतर आपले शहर पुढील काळात कुठल्याही परिस्थितीत स्मार्ट सिटी योजनेत राहील याची दक्षता सुद्धा त्यांनी घेतली पाहीजे. मा.महापौर साहेब, मला तुम्हाला मुद्दाम आठवण करून द्यावीशी वाटते आहे की, काही दिवसांपासून आपण ज्या परिस्थितीतून जातो आहोत. एलबीटी कमी झालेली आहे. दरवर्षी ५०० कोटींचा तोटा होणार आहे. तो तोटा भरून काढण्यासाठी शासनाने आपल्याला जी कमिटमेंट केली आहे. आपला कुठेतरी हातभार लागेल. आपल्याला आणखी मदत होईल अशी अपेक्षा होती. सगळे

सिलेक्शन होत असताना सहा विभागांची सहा शहरे जरी गृहित धरली तरी नंतर उर्वरीत चार होती. माझ्या माहितीप्रमाणे त्या उरलेल्या ४ मध्ये आपण पहिले होतो. तेव्हातरी सिलेक्शन व्हायला पाहिजे होते. गुणांक काढले, मार्किंग सिस्टीम काढली. काही कारण नव्हते. आज आपण नापास झालो आहोत. परंतू नागरीकांची मानसिकता राहिली नाही. अजूनही भविष्यात अपेक्षित करतोय, कदाचित उशीरा मिळतील, मिळणार नाही असे नाही. आज आपल्याला स्वतःवर जो कॉन्फिडन्स आहे तो कदाचित पुढेसुद्धा राहणार आहे. आर्थिक नियोजन महत्वाचे राहील. शहरातील नागरीकांच्या भावनांचा विचार करुन केंद्र शासन व राज्य शासन दोघांनी आपल्यालाबरोबर घेऊन काम केले पाहिजे. आम्हाला पॅकेज नको, त्याची आम्हाला आवश्यकता नाही. आपल्याला स्मार्ट सिटी योजनेत सहभागी व्हायचे आहे. मा.आयुक्त साहेब,रक्कम तुटपुंजी असलीतरी आम्हाला कॉन्फिडन्स आहे की, तुमच्याकडून किंवा प्रशासकीय अधिका-यांकडून आमच्या ज्या एकंदरीत चर्चा होत असतात त्यातून आमची कामे होत असतात. आपला हेतू हा आहे की, भारतातील जी १०० शहरे आहेत. यातील ५/१० शहरांमध्ये आपले शहर कसे राहील या दृष्टीने आपण पहात होता. परंतू याला थोडीशी खिळ बसली आहे. आपण प्रयत्न मात्र सोडता कामा नये. अनेक प्रयत्न केले, अनेक यशस्वी झाले. आख्या भारतातले एक शहर सांगा. कुठल्या शहरात गरीबांना घरे दिली आहेत. आम्ही गरीबांना कोट्यावधींची घरे दिलीत. हजारोंची कमिटमेंट दिली. हजारो दिली, त्यातली काही राहीली. काही नियमबाह्य गोष्टी केल्यामुळे राहीली आहेत. पण नुसतं भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचार. भ्रष्टाचार हा क्रायटेरीया नसतो. ही साधी गोष्ट कळत नसेलतर काय म्हणायचे. काय झालंय, खूप वर्षांनी सत्ता हातात आल्यामुळे हे सगळे गांगरुन गेले आहेत. त्यामुळे काय बोलावं काय नाही याचा नियम कळत नाही. हे राजकीय भावनेने चालले असलेतरी त्याचे परिणाम या शहरावर लाँगटर्मसाठी होत आहेत हे यातून दिसून येते आहे. आज शासनाने आपल्याला ६६ कोटी मान्य केले. त्यानंतर मुद्रांकचे १ टक्के अतिरिक्त पैसे देतो असे सांगितले होते. मा.आयुक्त साहेब, मार्केटमध्ये खरोखर तशी परिस्थिती आहे का. मार्केटमध्ये जाऊन बघा. आत्ता योगेशभाई मला सहज सांगत होते, रजिस्ट्रेशन ऑफिसला गर्दी नसते. पूर्वी रजिस्ट्रेशन करायला दोन/दोन, तीन/तीन पाच/पाच दिवस नंबर लावायला लागत होते. आज काय परिस्थिती आहे. आम्ही तुम्हाला एवढे-एवढे पैसे देणार अशी शासनाने आपल्याला शाश्वती दिली आहे का? स्मार्ट सिटीचा मुद्दा कदाचित बाजूला ठेवा. पण इतर वेळी एलबीटी बंद करुन, लोकांना सगळे कर कमी करुन त्यांना जीएसटी लागू करा हा निर्णय घेतला. पण शासन आपल्याला काय देणार. आज महाराष्ट्रात बघा, प्रत्येक महापालिकेची अवस्था इतकी डबघाईला आली आहे. हे पाहून वाटते, आज स्मार्ट सिटीपेक्षा दुष्काळग्रस्तांना पैसे दिले असते तर बरे झाले असते आज काय परिस्थिती आहे. अखंड महाराष्ट्रात कुठेच पाऊस नाही. इतकी वाईट अवस्था आहे. पुणे शहरात एक दिवसाआड पाणी केले आहे. मा.आयुक्त साहेब, अजून दोन दिवसांनी तुम्ही सुद्धा हेच

डिक्लेअर कराल. आज दुष्काळग्रस्त भागातून आपल्या शहराकडे हा लोंढा येऊ पाहतो आहे. उद्याच्या काळात एवढी भीषण अवस्था होते आहे. त्यासाठी स्मार्ट सिटीत समावेश होणे गरजेचे होते. एकिकडे मुंबईपासून येताना आपण तळेगावपर्यंत जातो, चाकणपर्यंत जातो, शिक्रापूर पर्यंत जातो, शिवापूरपर्यंत जातो. तसाच फेरफटका मारुन आपण हिंजवडी पर्यंत येतो. हा सगळा बेल्ट औद्योगिक परिसर आहे. मर्सिडीज असेल, व्होक्सवेगन असेल, महिंद्रा असेल, हिंजवडीला इन्फोसिस, विप्रो, टीसीएस असेल, अशा वेगवेगळ्या ऑटोमोबाईल कंपन्या, आय.टी. कंपन्या तयार झाल्या आहेत. त्या एका दिवसांत तयार झाल्या आहेत का. गेल्या १५/२० वर्षांत तयार झाल्या आहेत. तुम्हाला आठवत असेल, आपल्या परिसरात मेगा सिटी डिक्लेअर झाली होती तेव्हा अनेक शेतक-यांवर चिंतेचे सावट आहे. पवार साहेब होते म्हणून या इंडस्ट्रीज राहिल्या. मेगा सिटी गेली आणि आय.टी. पार्क आले. आज हिंजवडीमध्ये १० लाख लोक काम करतात. ५ लाख वाहने दररोज ये-जा करतात. याचा लोड आपल्या शहरावर येत नाही का. याचे इन्फ्रास्ट्रक्टर केंद्र सरकारने पैसे दिल्यामुळे सुधारले आहे केंद्र सरकारने हजारो कोटी पैसे दिले. नाहीतर आपला एकतरी रस्ता धड होता का. दापोडीपासून निगडीपर्यंत आपल्याला जायला दोन तास लागत होते. आज चित्र बदलले आहे. केंद्र शासन व राज्य शासन जेव्हा एखाद्या चांगल्या महापालिकेच्या मागे उभे असते, त्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. बीआरटी रस्ते असू द्यात, बीआरटीसाठी हजारो कोटी दिले. आज हे रस्ते जागेवर पळत आहेत. आपली आजची परिस्थिती अशी आहे की, शहरातील रस्ते मोठे झाले आहेत. त्याप्रमाणात शंभर टक्के वाहतूक होत नाही. देहू-आळंदी रस्त्याला सांप्रदायिक स्वरुप दिले आहे. हे सगळे करत असताना आपल्याला एखाद्याने हेतूपुरस्सर डिवचणे व डावलणे हा मात्र आपल्या शहरवासियांचा अपमान आहे. आपल्याकडे नानाविध प्रकारचे लोक राहतात. आपल्या शहराला मिनी इंडिया म्हणून आज संबोधले जाते. या भारताचाच अपमान झाल्यासारखे झाले आहे. प्रत्येक माणसाच्या मनात तिडीक बसली आहे की, सरकारणे तिडीक बसेल एवढे करायला नको होते. हे तुम्ही हेकटपणे करताय, सूड बुद्धीने करताय. उद्याची इलेक्शन यांना बघू द्यायची नाही. उद्याची इलेक्शन आपल्या बाजूने राहील. इलेक्शनचे इलेक्शनच्या वेळी. तुम्ही ज्या कमिटमेंट दिल्या आहेत, त्याला तुम्ही बाईंडींग आहात. स्मार्ट सिटीसंदर्भात त्यांची कमिटमेंट नव्हती. तर हा आमचा हक्क होता. आमचा हक्क डावलला आहे. स्मार्ट सिटीत समावेश हा आमचा हक्क आहे. मा.महापौर साहेब, स्मार्ट सिटीत समावेश होण्यासाठी तुम्हाला जे-जे वाटले ते करा. शिवसेना व भाजपा या दोन्ही लोकांना आंदोलनाची सवय आहे. आता त्यांच्या पद्धतीने पुढे जाऊ. त्यांच्या मार्गदर्शनाने पुढे जाऊ. या शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होण्यासाठी यांच्या पदाधिका-यांचा सल्ला घ्या. यांच्या पालकमंत्र्यांना आपण भेटून आलो आहोत. आपल्या अधिका-यांना आपण भेटलो आहोत. आपण पवार साहेबांच्या कानावर ही गोष्ट घातली आहे. मा.पंतप्रधानांना भेटण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपल्या शहराला ख-या अर्थाने

स्मार्ट बनविण्यासाठी त्या पद्धतीने प्रयत्न करा. आपल्याला आता तसा जास्त वेळ नाही. केंद्राकडून येत्या आठ दिवसांत निर्णय होईल. मा.महापौर साहेब, येत्या आठ दिवसांत आपल्या बाजूने निर्णय होईल या पद्धतीने पुढाकार घ्या पुन्हा एकदा बैठकीचे आयोजन केले त्याबद्दल आपले आभार मानतो. जेएनएनयूआरएमप्रमाणेच स्मार्ट सिटीत आपला समावेश होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद!

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मी महापौर मॅडमचे व आयुक्त साहेबांचे प्रथमतः आभार मानते की त्यांनी स्मार्ट सिटीसाठी स्पेशल सभा बोलवली आहे. स्मार्ट सिटीत आपला समावेश झाला नाही, तो व्हायला पाहिजे होता या मताची मी पण आहे. आपला समावेश स्मार्ट सिटीत झाला नाही त्याची कारणे अनेक आहेत. आत्ता ज्या-ज्या पदाधिका-यांनी जे सांगितले, पण खरे कारण मा.आयुक्त साहेब तुम्हालाच माहित आहे की समावेश का झाला नाही. कमिश्नर म्हणून आम्ही तुमच्याकडेच बघणार ना. आम्ही काय सी.एम.ओ. कार्यालयात जाऊ शकणार नाही. या शहरात तीन खासदार, तीन आमदार असताना सुद्धा आपला समावेश स्मार्ट सिटीमध्ये होत नसलेतर ते शंभर टक्के दूर्दैवी आहे दूर्दैव आहे हे जर कबूल आहे, तर मग तुम्ही टिका करत असालतर मघाशी मा.बाबासाहेब धुमाळ जसे म्हणाले,आत्मचिंतन करा. मा.प्रशांत शितोळे म्हणाले, आत्मचिंतन करा. तासाभरात आत्मचिंतन होऊ शकते. प्रशांत दादा मला सांगा, तासाभरात आत्मचिंतन कसे काय होऊ शकते. स्मार्ट असल्यामुळे स्मार्ट आत्मचिंतन करा. मा.महापौर साहेब, आत्मचिंतन करा असे सांगायचे कारण हेच होते की, काही चूका झाल्या असतील तर मोठ्या मनाने मान्य करा. सगळे जण प्रयत्न करु. पण तसे न होता आपण काय करत बसलो, तू बडा की मै बडा. मध्येच भाई म्हणाले, आमचा काय जी.आर नाही. जाऊ दे, आमचे काही इलेक्शन नाहीत. आम्हाला पॅकेज नको. बिहार राज्याला जर पॅकेज दिले असेलतर देशाचा पंतप्रधान म्हणून ते त्यांचे अधिकार आहेत. घ्यायचे का नाही घ्यायचे हे आपण ठरवणार आहोत. कारण देणारे ते आहेत आणि घेणारे आपण आहोत. देणा-याने काय द्यायचे हा शंभर टक्के त्याचा अधिकार आहे. आत्ताच मा.आशाताई शेंडगे यांना विचारले, शैक्षणिक १० वी, १२वी नंतर पात्रतेच्या किती फे-या असतात. आपण त्या फे-यांमध्ये तुमच्या म्हणण्यानुसार तुम्ही जर यशस्वी ठरला होता तर मग आपल्याला नापासची गुणपत्रिका का मिळाली. आत्मचिंतन करायला नको का. कदाचित खरोखरच निधीची गरज आहे आणि निधी मिळाला नाही म्हणून दुःख होणे साहजिकच आहे. या शहराचा विकासच थांबणार आहे. म्हणून आम्ही म्हणतो की, तुम्ही आत्मचिंतन करा. मा.आयुक्त साहेब, तुमची पहीली फेरी, दुसरी फेरी, तिसरी फेरी संपते. आत्ता इंजिनिअरींगसाठी या वर्षी पाचवी, सहावी फेरी सुरु होती. कारण तिकडे जाणा-या लोकांचा कल कमी झाला आहे. आत्ता स्मार्ट सिटीसाठी तुम्ही सगळ्या फे-या पार केल्या आहेत. आता चवथी, पाचवी फेरीच नाही. त्यांना करायचे होते ते त्यांनी केलेले आहे.

त्याठिकाणी त्यांच्या मागे लागणे योग्य आहे का. आपण स्वाभिमानी आहोत. या शहराची वाटचाल वाड्यावस्त्यांपासून जसे कासारवाडी असेल, आकुर्डी असेल, आजही ते गावठाण म्हणून ओळखले जाते, वेगळ्या शहराकडे स्मार्टसिटीकडे पहिलेच वाटचाल झालेली आहे. म्हणून आपला स्वाभिमान कुठेतरी दुखावला जाणार नाही, या शहरातील नागरीकांचा स्वाभिमान दुखावला जाणार नाही याचे भान ठेवून त्याठिकाणी आपण मागणी करावी. मा.महापौर साहेब, आत्ता सगळ्यांनी सांगितले. यातील काही शहरांची लोकसंख्या १२,०००, ७,००० अशी आहे. त्यांना कसा काय प्रवेश मिळाला आहे. याठिकाणी महाराष्ट्राचे सहा महसूल विभाग आहेत. मुंबई विभाग, पुणे विभाग, मराठवाडा विभाग, उत्तर महाराष्ट्र, पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ या ६ विभागांतून जी शहरे निवडली त्यात उत्तर महाराष्ट्रातून नाशिक, विदर्भातून अमरावती, मराठवाड्यातून सोलापूर, पूर्व विदर्भातून नागपूर पश्चिम महाराष्ट्रातून पुणे व मराठवाड्यातून औरंगाबाद आले. याव्यतिरिक्त आणखी ४ शहरे घेतली. त्यात बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली या शहरांचा समावेश झाला आहे. हि महाराष्ट्रातली शहरे नाहीत का. आपण इतका थयथयाट करायचे कारण काय. त्यांची ग्रोथ होत असेलतर आपण वाईट वाटायचे कारण काय. आत्ताच प्रशांतदादा म्हणाले, संपूर्ण महाराष्ट्रात किती दुष्काळ आहे. त्याच विदर्भ, मराठवाड्यात, अकोला जिल्ह्यात तर हजारो शेतक-यांनी आत्महत्या केली आहे. हा गेल्या २५/३० वर्षांचा इतिहास आहे. अजूनही हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या शहरांना प्रतिनिधित्व मिळाले असेलतर, आपल्या शहराचा समावेश केला नाहीतर आपल्याला वाईट वाटायचे कारण काय. आपण देवापुढे हात जोडतो तेव्हा म्हणतो, देवा, यांचे भलं कर आणि यांच्याबरोबर माझेपण भलं कर. का आपण म्हणतो का, लोकांचे वाट्टोळे होऊ दे पण माझे भले होऊ दे. ही कसली भावना आहे. ही चांगली भावना नाही. ही राष्ट्रीयत्वाची भावना नाही. ही एकीची भावना नाही. जेएनएनयूआरएम योजनेमध्ये आपण २,००० कोटी मिळवले आहेत. याला क्रायटेरीया काय होता तर तुम्ही जेएनएनयूआरएम योजनेत जे नॉर्मस् दिले होते ते तुम्ही पूर्णपणे पाळले नाहीत. काही ठिकाणी पाळले गेले, काही ठिकाणी पाळले गेले नाहीत. मग ते कसे पाळले गेले नाहीत. तुम्हाला वाटत असेल की ते कोणाला कळाले नाही पाहिजे. इतरांनी बोललेच नाही पाहिजे. तसे होत नाही. आम्ही सुद्धा तुमचे ऐकून घेतले आहे. तर आम्हाला सुद्धा त्याठिकाणी बोलले पाहिजे. आपल्या शहरात जेएनएनयूआरएमचे जे सगळे प्रकल्प होते. या सगळ्या प्रकल्पांमध्ये, आपण झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये ज्या सदनिका बांधल्यात, सेक्टर २२ असेल तिथे स्टे आहे. तिथे काहीच घडले नाही असे म्हणायचे का. का कोर्टाने विनाकारण स्टे दिला. जेएनएनयूआरएम योजनेचे फंड होते त्यामुळे ते कुठेतरी ग्राह्य धरण्यात आले विठ्ठलनगरला काय घडले, मिलिंदनगरला काय घडले, या योजना का फसल्या. या योजना फसल्या असतील तर इथे काय झाले, कोणीतरी बोलले, मी बोलले. इतर शहरांमध्ये ज्यांची इथे नावे आहेत. ज्यांची नावे आहेत ते नवी मुंबई मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे.

नाशिक मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना, ठाणे मध्ये शिवसेना-भाजप, बृहन्मुंबईत शिवसेना-भाजप, अमरावतीत काँग्रेस, सोलापूरला काँग्रेस, नागपूरला भाजप, औरंगाबाद - शिवसेना-भाजप, पुणे - राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस आहे. राष्ट्रवादीवरच अन्याय करायचाच होता तर जिथे राष्ट्रवादीची सत्ता होती या शहरांना कशाला घेतले. यांनाही घ्यायला नको होते. आपण काय बोलतोय. काय आरोप करतोय. जेएनएनयूआरएम योजनेत आपल्या शहराचा समावेश पुण्याबरोबरच होता. यावेळी असेच केले होते. पुणे व पिंपरी चिंचवडचा प्रस्ताव एकत्रित गेला मग त्यांचे कुठे चुकले आहे. त्यांचे चुकले का आपले चुकले या वादात न पडता आपण यातून यापूर्वीच बाहेर गेलो आहोत. ज्यावेळी पालकमंत्री आपल्याकडे आले होते. स्मार्ट सिटीत आपला समावेश झाला नाही म्हणून कमिश्नर फक्त रडायचेच बाकी होते. इतके हळवे कमिश्नर मी यापूर्वी कधी पाहिले नाही. एखाद्याचे एखाद्या शहरावर प्रेम असले पाहिजे. पण अधिकारी म्हणून किती असावे. मला त्यांचा चेहरा दिसत होता. मी त्यांना विचारले, साहेब, तुम्ही रडणार आहात का. ते म्हणाले, नाही, मी नाराज आहे. मी चांगले प्रयत्न केलेत. चांगले प्रयत्न करुन सुद्धा एखाद्याला यश मिळत नाही. याचे दुःख वाटून घेण्यापेक्षा आपण यात चांगले काही करता येऊ शकते यात जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील इतर शहरांचा देखील आर्थिक शोष भरुन काढला पाहिजे नाही का. म्हणून सरकार जर प्रयत्न करत असेलतर आपण या प्रयत्नांना दाद दिली पाहिजे. मघाशी मा.गोरक्ष लोखंडे म्हणाले की, अकोला नगरपालिकेची महानगरपालिका करायची वेळ आली. मी २००६ ला अकोल्याला होते. तिथे मोठे-मोठे बोर्ड लावले. ही वाट दूर जाते,मरणांच्या गावा. पुढे महानगरपालिकेचे पोस्टर होते. मी विचारले, हा काय प्रकार आहे. तर ते म्हणाले, सत्ताधारी पक्षाच्या नावाने सगळ्या लोकांची खूप ओरड चालू होती. इतकं धुळीने भरलेलं शहरं, रस्ते नाहीत, पाण्याची व्यवस्था नाही. नदीला पूर आला की इतका येतो की निम्मे शहर वाहून जाते नाहीतर विदर्भात पाऊसच पडत नाही. याला शास्त्रीय कारण आहे. ऊन खूप पडतं. थंडी खूप पडते. ऊन खूप पडते म्हणून लोक गर्मीने मरतात थंडी खूप पडते म्हणून आखडून मरतात आणि पाऊस खूप आला की वाहून जातात ते तुमचे कुणीच लागत नाहीत का. उलट त्यांना दिलेतर तुम्हाला वाईट वाटायचे कारण काय. मी मा.शरद पवार साहेबांचे स्टेटमेंट एकदा वाचले होते. खेड्याकडे चला. ग्रामिण भागांना समर्थ होऊ द्यात, लोकसंख्या तिथेच थांबेल. म्हणजे शहराकडे लोंढे येणार नाहीत. त्यांचा चांगला विकास होत असेलतर, त्यांची ग्रोथ होत असेलतर आपल्याला त्रास होण्याचे कारण काय. आपण आपली तुलना पुण्या-मुंबईशी केली पाहिजे. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेसच्या सगळ्या नगरसेवकांनी एकत्र येऊन पुणे व पिंपरी चिंचवडचा प्रस्ताव एकत्र करण्यास विरोध केला होता. आम्हाला पिंपरी चिंचवड बरोबर नको त्यांचा निषेध इथे झाला पाहिजे होता. त्यांचा निषेध इथे का होऊ शकत नाही. केंद्रात व राज्यात सत्ताबदल झाला म्हणून नावे ठेवणार असालतर म्हणून मा.बाबासाहेब धुमाळ म्हणाले की, तुम्ही आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. याठिकाणी

जसा स्मार्ट सिटीत आपला समावेश झाला नाही म्हणून त्याचा त्रास होतो, तसा प्रत्येक पानावरचे वाचून पुढे जातो त्याचवेळी आपण पाठिमागे येतो. तुमची जलनिःसारण योजना असेल, झोपडपट्टी योजना असेल, त्यातील तुमचे सुद्धा पैसे गेले होते रु.१७२ कोटी परत करायचे होते. या योजनेला २०१७ पर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. परंतू ही मुदतवाढ मिळून तुम्हाला उपयोग आहे का. कारण सेक्टर २२ रेडझोनमध्ये असल्यामुळे तुम्हाला तिथे कामच करता येणार नाही. अडीच एफएसआय मिळण्यासाठी २००८ सालापासून आम्ही पाठपुरावा करत होतो. २००८ ला डी.सी.रुलमध्ये बदल करण्यासाठी आपण प्रयत्न केलेत. सेक्टर १७, १९ इथे जागा ताब्यात नाही तिथे कंपाऊंड घालायचा विषय तुम्ही स्थायी समितीमध्ये आणलात. आपली हिंमत बघा. प्राधिकरण पिंपरी-चिंचवडच्या अधिकाराखाली तो भाग येत असताना त्याठिकाणी तुम्ही प्रोजेक्ट राबविलात. मग आम्ही कोर्टात गेलोत. कारण तिथे गरीबांची घरे झालीत का. आज त्याचे नोटीफीकेशन आले की, प्राधिकरणाला सुद्धा अडीच एफएसआय आहे. मुळात तिथे रेट्रोस्पेक्टीव्ह इफेक्टने सुद्धा तुम्ही कोणत्याही बांधकामाला अडीच एफएसआय देऊ शकत नाही. तुमचे सरकार होते तेव्हा का करुन घेतले नाही. डी.सी. रुलमध्ये २००८ मध्ये बदल केला होता. मग का केले नाही. तिथे लक्ष नव्हते. ६५०० घरांचा प्रकल्प केला. घरे बांधायला घेतल्यापासून प्रकल्प पूर्ण होईपर्यंत सगळेच कायद्याच्या अडचणीत आहे. गरीबांना घरे मिळाली पाहिजेत ही तुमची भावना शंभर टक्के खरी होती. मी या मताशी सहमत आहे. काही नियम पण पाळले गेले पाहिजेत. आपल्याकडे आलेले पैसे आपले नव्हते. आपल्याला केंद्राकडून, राज्याकडून पैसे आले होते. आपण नियम पाळले नाहीत, हे सत्य आहे हे कबूल करा. २००८ मध्ये गरीबांसाठी केलेला नियम पाठिमागे लागून लागून करावा लागला. मागच्या केलेल्या सुनावण्या पुढे पाठवणार असालतर मी सुनावणीसाठी पुढे जाणार नाही. बीआरटीएसमधले आपले पाऊणे चार हजार कोटींचे उत्पन्न बुडत होते. म्हणून मी कोर्टात गेले. कोर्टाने सांगितले, महापालिकेच्या आर्थिक हिताचा प्रश्न असल्यामुळे सभागृहात जाता येणार नाही. म्हणून त्याठिकाणी आपण पुन्हा सुनावण्या घेतल्या. परवा मी कमिश्नर साहेबांकडे गेले, साहेब, पहिले पाठवा. त्यांनी मला सांगितले, नवीन नियम येतो आहे. आपल्याला अनेक ठिकाणी एफएसआय वाढवून मिळणार आहे. बीआरटीएसमध्ये आज आपले जे डि.सी. रूल्समधील रुल्स आहेत ते तुम्हाला डिलिट करता येणार नाहीत म्हणून हे नियम पाठवावेच लागतील. आणि तुम्ही ते नियम पाठवलेत. हे तुम्हाला आम्हाला का सांगावे लागते. याकडे लक्ष का नाही. आज संपूर्ण शहरात बीआरटीएस कॉरीडॉरमधील विकास थांबला आहे. मग विकास थांबला म्हणून आमच्या नावाने शंख करायचा. आम्ही सुनावणी घेऊन दीड-दोन वर्षे वाट पाहतोय. तुम्ही सरकारकडे पाठवत नाही. बीआरटीएसचे जे रस्ते आहेत त्यातून उत्पन्न आहे. मी सामना पेपरमध्ये बातमी वाचली होती. बातमी वाचून माझे डोळेच पांढरे झालेत. आपण १ कि.मी. साठी रु.३५ कोटी खर्च केले आहेत. मा.आयुक्त साहेब, हे सुद्धा

जेएनएनयूआरएमचेच पैसे होते. म्हणून तुम्हाला माझा सांगायचा प्रयत्न आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपला समावेश स्मार्ट सिटीत झाला नाही म्हणून, एक म्हण आहे, येऊ नको म्हटले तर कुठल्या डब्यात बसू. नाही सांगितले तरी तुम्ही विचारताय कुठल्या डब्यात बसू. तुम्ही जा, प्रयत्न करा, शंभर टक्के प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येकाने यश आले नाही म्हणून कोणावर खापर फोडू शकणार नाही. या देशात लोकसभेच्या निवडणूकीत जी लाट आली, त्यात भले-भले म्हणता-म्हणता वाहून गेले आहेत. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाले तेच मुळी भ्रष्टाचाराला विरोध केल्यामुळे. तुम्हाला भ्रष्टाचार म्हणजे खेळ वाटतो. तुमचा पैसा नाही म्हणून तो खेळ वाटतो. प्लंबरने दोनशे रुपये घेतले तरी तुम्हाला त्रास होतो. तुमचा पैसा नाही म्हणून तुम्हाला भ्रष्टाचार हा खेळ वाटतो भ्रष्टाचार हा काही नियम नव्हता. प्रशांतदादा, तुमचे शंभर टक्के बरोबर आहे. मग प्रवेश फेरीत आपला प्रवेश का झाला नाही, व्हायला पाहिजे होता. तुम्ही काय म्हणालात, मी काय म्हणाले यापेक्षा महत्वाचे आहे की, आपण आपल्या उत्पन्नाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. याठिकाणी आत्ता आम्ही माहिती घेतली की, उत्पन्न कसे वाढवावे. स्मार्ट सिटीत प्रवेश मिळवायला जर प्रयत्नांना यश आले नाही तर काय करणार. उत्पन्न तर वाढवावे लागेल. याठिकाणी उत्पन्न वाढविण्यासंदर्भात मी सांगणार आहे.

**मा.महापौर** - मा.सिमाताई, उत्पन्न वाढविण्यासंदर्भात वेगळी मिटींग घेणार आहोत. आपल्या शहराचा समावेश स्मार्ट सिटीत होण्यासाठी काय करता येईल यासाठी आपण विशेष सभा बोलविली आहे. त्याबद्दल बोला. मी प्रत्येकाला बोलण्यासाठी २०/२५ मिनिटे दिलेली आहेत. आपली २०/२५ मिनिटे संपत आली आहेत. मी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले आहे आणि प्रत्येकानेच हा रिस्पेक्ट दिला आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, तुमची घाई का असते. तुम्हाला कोणाला बोलू द्यायचे नसते.

**मा.महापौर** - बोलू द्यायचे असे नाही. सगळ्यांना बोलू देत असते. प्रत्येकाने रिस्पेक्ट ठेवलेला आहे. मी प्रत्येकाला बोलू दिले आहे. मा.सिमाताई मुद्दे घ्या.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, या शहराचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये झाला नाही म्हणून तुम्ही करत असलेल्या प्रयत्नांना आमचा शंभर टक्के पाठिंबा आहे. आम्ही म्हटले का तुमचा समावेश स्मार्ट सिटीत झाला नाही पाहिजे म्हणून. आम्ही या शहराचे कुणी लागत नाही का. आमचा सुद्धा जीव तुटतो. पण आम्ही राजकारण काढतो म्हणून, बोलतो म्हणून तुम्हाला राग यायला लागला आहे. तुम्ही आमच्यावर टिका केलीत तेव्हा आम्हाला राग येणार नाही का. मा.प्रशांत शितोळे म्हणाले, भ्रष्टाचार झाला हा क्रायटेरीयाच नव्हता. शंभर टक्के खरे आहे हा क्रायटेरीया नव्हता. पण तुम्ही जेएनएनयूआरएम योजनेत काय दिवे लावले हा तर क्रायटेरीया होता. आपले कुठेतरी चुकले हे सांगितले पाहिजे. तुमचे असे म्हणणे असेलतर तुमच्या दोषांवर

पांघरुण घालावे असे चालणार नाही. बंद पाईपलाईन योजनेबाबतीत मघाशी एकाने उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, इकडे राजकारणी एक बोलले व तिकडे एक बोलले. आम्ही बोललो, आम्ही राजकारण केले पण सत्तेत तुम्हीच होता. तुम्ही योजना करायची होती. तुम्ही २०० कोटींचे पाईप घेतले. तुम्ही योजना सडवलीत, आम्ही सडवली का. मा.महापौर साहेब, एक इंच जागा ताब्यात नसताना तिथे दोनशे कोटींचे काम करायला घेतो तेव्हा विरोध होणारच ना. मघाशी मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितले, सरकारने जमिन अधिग्रहण कायदा मागे घेतला. चार पाऊले मागे आले. शंभर टक्के नागरीकांचा विरोध असेलतर मागे यायलाच पाहिजे. कारण त्यांच्यामुळेच ते या खुर्चीवर बसले आहेत पण तुम्ही काय करता, तुम्ही अडून अडून गोळ्या मारताय. आम्ही डायरेक्टच मारतो.

**मा.महापौर** - मी पहिल्यांदाच सांगितले आहे, प्रत्येक सदस्याने २०/२५ मिनिटे बोलायचे आहे. आता अर्धा तास होत आला आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मी तुमचे काही ऐकून घेणार नाही. तुम्ही काय पण बोला मी बांधिल नाही. तुम्ही मला बोलायला सांगितले आहे. मी बोलते आहे. याठिकाणी उत्पन्न वाढीसंदर्भात बोलते आहे. याठिकाणी आपल्या शहरात असणारी होर्डींग्जची संख्या व पुणे शहरातील होर्डींग्जची संख्या हे जवळपास सारखेच आहेत. मी गेल्या ३ वर्षांची माहिती घेतली. अनधिकृत होर्डींग्जची संख्या पाहता पुणे शहराच्या तुलनेत पाहिलेतर आपले उत्पन्न रु.५,४५,००,०००/- इतके आहे. म्हणजे ५ ते ६ कोटींच्यावर आपले उत्पन्न जात नाही. पुणे महापालिकेचे उत्पन्न रु.१२७ कोटी आहे. त्यांचे सुद्धा उत्पन्न रु.९ कोटी इतके होते. त्यांनी नवीन ठराव केला. त्यांनी सगळे बोर्ड महापालिकेच्या ताब्यात घेतले.

**मा.महापौर** - महापालिकेचे स्त्रोत वाढवायचा विषय नाही. आपण यावर नंतर बोलू. पण आत्ता आपण स्मार्ट सिटीत कसे जाऊ याबाबत आपले म्हणणे मांडा.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, हा माझा विषय नाही. त्यासाठी तीन आमदार, २ खासदार आहेत. उत्पन्न वाढीबाबत सांगायचे नाही का. तुम्हाला तुमचा भ्रष्टाचार लपवायचा आहे म्हणून तुम्हाला ऐकून घ्यायचे नाही तुमची मानसिकता नाही.

**मा.महापौर** - मा.सिमाताई आपण काय बोलताय. इथे भ्रष्टाचाराचा विषय नाही. भ्रष्टाचार झालाय त्यांना कोर्टात न्या. मी शहराची महापौर आहे. तुम्ही आरोप करताय. आपण स्मार्ट सिटी योजनेत कसे येणार यासाठी ही सभा बोलवली आहे. इथे स्त्रोत वाढवण्याचा विषय नाही. तुम्ही खाली बसा. शहराच्या महापौरांवर आरोप व्यवस्थित करा.

**मा.सिमा सावळे**- मा.महापौर साहेब, तुमची ऐकायची तयारी नाही. तुम्ही ढोंग करताय. तुम्ही शहराच्या डोळ्यात धुळ फेकताय.

**मा.महापौर** - माझा आदेश आहे, ताई, तुम्ही खाली बसून घ्या.

**मा.सिमा सावळे**- मा.महापौर साहेब, मी खाली बसणार नाही.

**मा.महापौर** - तुम्ही महापौरांच्या विरोधात बोलताय. तुम्ही खाली बसावे.

**मा.सिमा सावळे**- मा.महापौर साहेब,तुम्हाला आम्हाला बोलू द्यायचे नाही मला याठिकाणी मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी सभेचे आयोजन करायचे आहे. त्यासाठी मी याठिकाणी मागणी करते आहे.

**मा.आशा शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.सिमाताई सावळे यांनी केलेल्या मागणीला मी अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, ही तुमची दंडेलशाही आहे. मागील वेळी तुम्ही सदस्यांचे निलंबन केले होते, आत्ता तुमची ही दंडेलशाही, हे तुमच्या पदाला अजिबात योग्य नाही. तुम्हाला फक्त लोकांना दाखवायचे आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसला व काँग्रेसला की आम्ही तुमच्याबरोबर आहोत. पण तुम्हाला ऐकायचेच नाही. याचमुळे तुम्हाला हे दिवस आले आहेत. माझे त्यावरील भाषण संपलेले नाही. तुमची वागणूक अजिबात चांगली नाही. तुम्ही नीट वागायला शिका.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,सर्वप्रथम पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या भावना लक्षात घेता या विशेष सभेचे आयोजन केले आहे त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करतो. वास्तविक पाहता, इतका चांगला विषय आहे, त्या विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब, वास्तविक पाहता या सभागृहामध्ये सर्वच पक्षाच्या लोकांनी याविषयाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टिकोणातून सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. वास्तविक पाहता, आरोप प्रत्यारोप होणे हे दूर्दैवी आहे. हे व्हायला नको होते. या सर्व गोष्टी होत असताना सामान्य नागरीकांच्या भावना, सामान्य नागरीकांना जे वाटते ते मी आपल्यासमोर प्रकट करु इच्छितो. यात क्रायटेरीया काय होता, निकष काय होते हा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे. याठिकाणी माझे वैयक्तिक मत व्यक्त करण्याआधी आपल्या देशाचे पंतप्रधान आदरणीय मोदी साहेब, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पुण्याचे पालकमंत्री मा.गिरीश बापटजी व केंद्रीय मंत्री मा.वैंकय्या नायडू व या विभागाशी संबंधित सर्व मान्यवरांना पिंपरी चिंचवड वासियांच्यावतीने, राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने, नम्र विनंती आहे की, पिंपरी चिंचवड शहराचा समावेश स्मार्ट सिटीत करुन घ्यावा. ख-या अर्थाने हि विनंती करण्यासाठी आजच्या या विशेष सभेचे याठिकाणी आयोजन केले आहे, इथे कोणावर आरोप-प्रत्यारोप करण्यासाठी केलेले नाही. If you ask as a common person also, if you ask really, he is asking simply what are the criteria. If you compare our city with other cities which are selected, decision taken by the Govt. is ridiculous. आणि म्हणून अशा पद्धतीने हे सगळे निकष चांगले असते तरी तिथे कुठेतरी आपण कमी पडलो, आपण अपात्र ठरलो हे मात्र आपण थांबवू शकलो नाही. म्हणून याठिकाणी मा.सिमाताईंनी, त्यांच्या शेजारी बसलेल्या सहका-यांनी याठिकाणी उल्लेख केला, मा.प्रशांत शितोळे यांनी उल्लेख केला. इतर कोणा शहराचे नाव वगळावे आमचे हे म्हणणे नाही. आमचे

म्हणणे आहे की, इतर शहरांच्या तुलनेत आपण पिंपरी चिंचवड महापालिकेची तुलना केलीतर आपल्याकडे पुण्यातून येणारा सुज्ञ नागरीक असेल, आय.टी पार्कमध्ये काम करणारा नागरीक असेल, सुशिक्षित नागरीक असेल, या सर्वांचे म्हणणे हेच आहे, सर्वसामान्यांच्या मनात हिच खंत आहे की, सर्वांना याचे आश्चर्य वाटते की, पिंपरी चिंचवड यातून का वगळले ही सर्वसामान्यांची खंत आहे. ही खंत मा.पंतप्रधानांपर्यंत, संबंधित विभागांपर्यंत, त्या विभागातील सर्व मंत्र्यांपर्यंत, राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांपर्यंत आपल्या भावना जाव्यात. आपल्याला या योजनेपासून का वंचित केले आहे ही शहरवासियांची भावना तिथपर्यंत पोहोचावी. If we are deserve it, then why we are defer. That is what the people say ridiculous decisions. चांगला निर्णय व्हावा या अनुषंगाने माझी आपल्याला विनंती आहे की, मा.नरेंद्र मोदी यांनी संबंध देशाला, राज्याला अच्छे दिनचे जे स्वप्न दिले आहे. आमची त्यांना गुजारीश आहे की, शहरवासियांचे स्वप्न हे अच्छेच व्हावे. ते मुंगेरीलालचे स्वप्न होऊ नये, हिच विनंती आहे. या शहराचा समावेश स्मार्ट सिटीत व्हावा हि विनंती करण्यासाठी आम्ही ही सभा बोलवली आहे. मा.सिमा ताई आपण बोलत असताना मी बोललो नाही. तुम्ही बडबड करु नका. तुम्ही असं खपवून घेतले असतं का. तुम्ही सिनिअर नगरसेविका आहात. तुम्ही सभाशाखेचे नियम पाळले पाहिजेत. तुमचा बॅलन्स जाऊ देऊ नका. इंग्लिश येत नसेलतर शिकून घ्या, ही काळाची गरज आहे. तुम्ही लोकांना भाषण देता, की अमुक शिका. माझी आपल्याला विनंती आहे की, सर्व पक्षांच्या वतीने याठिकाणी पॉझिटिव्ह चर्चा झाली आहे. आमच्या सर्वांची विनंती हिच आहे की, पिंपरी चिंचवड शहरवासियांच्या वतीने मागणी आहे की आपला समावेश स्मार्ट सिटीमध्ये व्हावा. त्यासाठी जे काही प्रयत्न करायचे असतील, जे निवेदन द्यायचे असेलतर ते द्यावे. पत्रकार मित्रांनी यात भरपूर सहकार्य केले आहे. आपण पिंपरी चिंचवड शहराचा समावेश या योजनेत कसा होईल या दृष्टिकोणातून प्रयत्न करावेत. अपयशाने खचून जाण्यापेक्षा, निराश होण्यापेक्षा प्रयत्नांती परमेश्वर असे जे म्हटले जाते ते प्रामाणिक प्रयत्न आपल्याला करायचे आहेत. धन्यवाद.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी प्रथमतः याठिकाणी आभार व्यक्त करेन की, आपण स्मार्ट सिटी या विषयावर विशेष सभेचे आयोजन केले आहे. कोणाच्या मनात काय आहे. या चर्चेतून काही चांगले निष्पन्न होणार असेलतर यासाठी स्थायी समितीमध्ये ठराव केला आहे. ही सभा घेतली आहे. खरेतर आपल्याला स्मार्ट सिटी योजनेतून वगळले या गोष्टीला बारा दिवस झाले आहेत. त्यानंतर स्मार्ट सिटीत समावेश व्हावा म्हणून अशी चर्चा करत असालतर जेव्हा महासभेमध्ये हा विषय आला होता, त्यावेळी यावर चर्चा अपेक्षित असताना चर्चा झाली नाही. त्याचवेळी चर्चा झाली असती, त्यावेळी सन्मा. ज्येष्ठ नगरसेवकांनी दिलेल्या सूचना आपण पाळल्या असत्यातर निश्चितपणे आपला समावेश स्मार्ट सिटीत झाला असता असे मला वाटते. ऑटो क्लस्टर इथे आयुक्त साहेबांनी चांगले

सादरीकरण केले होते. आम्हाला समजून सांगायचा प्रयत्न केला. परंतू इथे कुठेतरी बोलताना मला प्रत्येकाच्या भाषणात ओव्हर कॉन्फिडन्स दिसला. आम्ही स्मार्ट आहोतच. आम्ही शहर स्मार्ट केलेच आहे. आम्ही बेस्ट आहोतच. मग असे वाटते, कोणाचाही मनुष्यधर्म आहे की, तुम्ही आहातच मग ठिक आहे. तुम्हाला गरज नाही अशा प्रकारची चर्चा याठिकाणी झाली. यात कोणा एकाचा दोष नाही. शहराला जेव्हा स्मार्ट योजनेतून वगळले. त्यावेळी सुदैवाने म्हणा किंवा दूर्दैवाने म्हणा दोघेही खासदार आयुक्तांबरोबर मिटींगला उपस्थित होते. आयुक्तांनी सुद्धा व दोन्ही खासदारांनी सुद्धा वरिष्ठांना फोन लावले. त्यावेळी कोणीही फोनवर उपलब्ध झाले नाही. मा.महापौर साहेब, मी तुम्हाला जाणिवपूर्वक सांगेन की, स्मार्ट सिटीची जी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली आहे. त्यात गुणपत्रिका कोणालाच कळाली नाही. आपल्याला ९२.५ टक्के मिळाले असे मा.आशा शेंडगे म्हणाल्या. आयुक्त साहेबांना देखील हे माहित आहे की, हे गुण आपण आपल्या पद्धतीने दिले होते. परंतू कोणत्या मार्काला किती गुण आहेत हे ठरल्यानंतर गुण कॅलक्युलेट करणे जास्त अवघड नसते. परंतू गुणपत्रिका बघत असताना स्पर्धा असताना जसे पॉईंट पॉईंटच्या निकालामुळे आपले ॲडमिशन जाते. तसे या स्पर्धेत ॲडमिशन मिळाले होते, त्यांची सुद्धा गुणपत्रिका आपल्याला बघायला मिळाली पाहिजे असे स्पर्धकाचे म्हणणे असणे यात काही वावगे नाही. त्यासाठी आपण बाकी शहरांच्या जे आपल्यापेक्षा खाली आहेत असे आपल्याला वाटते. या शहरांच्या सुद्धा गुणपत्रिका बघायला पाहिजेत. याची सिलेक्शन सिस्टीम काय होती याबाबतीतही प्रश्नचिन्ह आहे. जर तुम्ही सांगितले की माझे यात असे आहे की, जे मेन सहा डिव्हीजन आहेत. त्याबद्दल आत्ता सगळ्यांनी चर्चा केली. ती स्मार्टसिटीची परीक्षा होण्याआधी कॅबिनेटचा असा निर्णय झाला होता की, ६ डिव्हिजनल महापालिकांचा समावेश स्मार्ट सिटीत करायला पाहिजे किंवा करायला हवा किंवा केला आहे. मग उरलेल्या चार महापालिका आहेत, त्यांच्यात आपण कधीही उजवेच ठरत होतो. परंतू हे का झाले नाही. उत्तरपत्रिका मागण्याचा तुमचा हक्क आहे. आम्हाला वाईट या गोष्टीचे वाटते आहे की, आपण का नापास झालो हेही आम्हाला कळाले नाही. जेव्हा परीक्षा देतो तेव्हा हे अपेक्षित असते. शहरातले सगळे नागरीक कुतूहलाने, आश्चर्याने वाट पहात आहेत की, आपण का नापास झालो. हे कारण कळाले नाही म्हणून ही सगळी अवास्तव चर्चा होते आहे. साहजिकच आहे, ज्याला जे वाटतेय, ज्याला त्याचा एम दिसतोय. हे झाले असेल ते झाले असेल असे वाटतेय तो ते बोलणारच. हे सगळे तुम्ही बदलले पाहिजे. तुम्ही खरी कारणे सांगितली पाहिजेत, काय झाले आहे. मा.आयुक्त साहेब, आपण याठिकाणी पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास कामांवर बोललो. आपण ब-याच प्रमाणात विकास केला आहे. मग आपण आउट का झालो आहोत. खरेतर विकास करत असताना सर्वसामान्यांचे पैसे यात असतात, जेएनएनयूआरएमचा निधी दिला, त्यातही आपले सेल्स टॅक्स असेल, इन्कम टॅक्स असेल, सेवाकराचे पैसे त्यात समाविष्ट असतात. त्यामुळे त्या पैशांवर नागरीकांचा हक्क असतो. मग पैसे कुठून आले,कुठे रुजले याचा

आपण विचार केला पाहिजे. नाहीतरी आपण ते पैसे लोकांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवलेले आहेत. उरला श्रेयवादाचा प्रश्न, ज्याला जे वाटते ते तो बोलला आहे. प्रत्येकाने सांगितले, राजकारण करायचे नाही, राजकारण करायचे नाही. मा.अजित गव्हाणे यांनी गोड भाषेत सांगितले, राजकारण करु नका. पण ते राजकारणाला धरुनच बोलले. राजकारणाशिवाय काही बोलले नाहीत. दुसरे मा.आर.एस.कुमार यांनी जे सांगितले त्यात शंभर टक्के तथ्य आहे. त्यांचा अनुभव आहे. ते पाच टर्म निवडून आले आहेत. ते महापौर होऊन गेले आहेत. त्यांनी काय सांगितले, तुम्ही पालक मंत्री म्हणून त्यांना किंवा दुसरे मंत्री म्हणून सन्मान दिला नाही सन्मान दिला नाहीतर साहजिकच आहे, तुमच्या  या मागणीकडे त्यांना बघावेसे वाटत नाही. पोर रडल्याशिवाय आई बाळाला दूध पाजत नाही. तुम्ही काही मागणीच केली नाही. तुम्हाला ओव्हरकॉन्फीडन्स झाला. आपण सगळे झाकून झाकून गेलो. प्रेझेंटेशन केले. सत्ता बदलली आहे. सगळे अपेक्षित होते. दोन्ही बाजूंनी बोलले गेले होते की, सिलेक्शन झाले नाहीतर राजकारणच होईल. सगळ्या बाजूंनी ऊहापोह झाला होता. याठिकाणी मी हे सांगू इच्छिते की, स्मार्ट सिटी स्पर्धा परीक्षेत आपला सहभाग झाला त्यावेळी सुरुवातीला पुणे महापालिका व पिंपरी चिंचवड महापालिका असे आपण जॉईंटली होतो आपण पास झालो नसतो तर आपण जॉईंट सुद्धा झालो नसतो. आपण पास झालो म्हणून आपण जॉईंट झालो. आपल्याला असे जॉईंटली वर पाठवले. आत्ता मा.अजित गव्हाणे म्हणाले होते की, मा.अजितदादा म्हणाले खासदार कमी पडले. हे काय बोलणे आहे. खासदारांना अपयश आले काय, खासदार कमी पडले काय म्हणजे हे बोलणे काय आहे. परंतू मला हे सांगावेसे वाटते, दि.३ ऑगस्ट २०१५ ला मा.श्रीरंग बारणे असतील, मा.शिवाजीराव आढळराव पाटील असतील या दोन खासदारांनी मा.वैंकय्या नायडू यांना पत्र दिले होते. त्यावेळी आपण फक्त जॉईंट सिटी म्हणून वर गेलो होतो. (मा.वैंकय्या नायडू यांना दिलेले पत्र वाचून दाखवले.) त्यानंतर दि.११ ऑगस्ट रोजी मा.केंद्रीय मंत्री श्री.वैंकय्या नायडू यांना परत पत्र पाठवले होते. (पत्राचे वाचन केले.) त्यांनी अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना दि.२८ तारखेला पत्र दिले गेले आहे ते स्मार्ट सिटी योजनेतून पिंपरी चिंचवड शहराचे नाव वगळण्याबाबत. त्यात म्हटले आहे, मा.महोदय, केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेसाठी शहरांची नावे जाहिर केलीत. परंतू पिंपरी चिंचवड शहराचे नाव त्या यादीतून वगळले. केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजने अंतर्गत महाराष्ट्रातील दहा शहरांची निवड करण्यात आली. यात पिंपरी चिंचवड शहराला ९२ टक्के गुण मिळून सुद्धा निवड झाली नाही पिंपरी चिंचवड हे १८ लाख लोकसंख्या असणारे शहर असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने केंद्र सरकारच्या विविध योजना शहरामध्ये राबविल्या जात आहेत. जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत विविध प्रकल्प राबवल्यामुळे विकास कामे केल्यामुळे शहराला पुरस्कार मिळाला आहे. पिंपरी चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने वाढलेले हे शहर असून रस्ते, पूल, उड्डाणपूल, झोपडपट्टी पुनर्वसन

या कामात अव्वल असून स्वच्छतेसाठी केंद्र सरकारचा स्मार्ट सिटी पुरस्कार मिळवलेले शहर आहे. असे सगळे असूनही पिंपरी चिंचवड शहराचे नाव स्मार्ट सिटीतून वगळले आहे तरी याचा गांभिर्याने विचार करुन स्मार्ट सिटी योजनेत पिंपरी चिंचवड शहराचा समावेश करावा अशा प्रकारचे प्रयत्न मा.खासदार यांनी केले आहेत. याउपर ते काही करु शकत असतील असे मला वाटत नाही. यात राजकारण झाले नसावे अशी आमची सगळ्यांची नम्र कल्पना आहे. मा.मुख्यमंत्री स्वतः खूप हुशार व सेन्सिटीव्ह आहेत आजूबाजुच्यांनी काही केले असेलतर सांगता येणार नाही. राजकारण झाले नसेल परंतू पक्षप्रमुख मा.उद्धव ठाकरे यांनी सांगितले आहेच की, आम्ही सरकारमध्ये असलोतरी सरकार जमा नाही आहोत. ज्या-ज्या प्रश्नावर नागरीकांवर अन्याय होईल तेव्हा एक नागरीक म्हणून, एक शहरवासिय म्हणून येणा-या पुढील काळात तुमच्या सगळ्यांच्याबरोबर असणार आहोत. परंतू आम्हालाही तुमच्याकडून राजकारण अपेक्षित नाही. मला कळाले आहे, तुम्ही उद्या दिल्लीला चालला आहात. मा.महापौर, मा.आयुक्त, मा.सभागृहनेत्या, मा.योगेशजी बहल, मा.उपमहापौर प्रभाकरजी वाघेरे, मा.संजोग वाघेरे पाटील, मा.विनोदजी नढे यांची विमानाची तिकीटे काढली आहेत. मा.महापौर साहेब, तुम्ही सांगा, तुम्ही ठरवले आहे की, राजकारण करायचे नाही. तुम्ही आमचे मा.पालकमंत्री आपल्या सगळ्यांचे पालकमंत्री यांना भेटायला गेला होता. स्वाभिमान समिती या समितीच्या माध्यमातून गेले होते. तुमच्याबरोबर आमचे मारुती भापकर होते,मा.अनंत को-हाळे सगळे होते. मा.पालक मंत्री यांनी सगळ्यांना सांगितले होते की, आपण मा.वैंकय्या नायडू यांना भेटू. मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटू. तुम्हाला कसली घाई झाली होती. तुम्ही एकटेच चाललात. ही श्रेयवादाची लढाई आहे. कोणताही वाद न करता, कोणतेही राजकारण न करता आपल्याला ही सिटी स्मार्ट सिटीच्या स्पर्धेमध्ये आली पाहीजे यासाठी आपण प्रयत्न करु. दोन राज्ये जम्मू आणि काश्मीर व उत्तर प्रदेशातील रायबरेली हे दोन स्टेट आपल्यासारखेच जॉईंट झाले. त्यांना सारखेच गुण मिळाले आहेत. त्यामुळे ते थांबले आहेत आणि काश्मिरला तर ते वगळू शकत नाहीत कारण ते सेन्सिटीव्ह स्टेट आहे. मग आपण या शंभरमध्ये आले नाही व १०१ वे शहर झालोतरी अमेरीका तुम्हाला प्रश्न विचारणार नाही. मुळात आम्हाला स्मार्ट सिटीत जायचे आहे. हे कसे झाले आहे की, प्रशासकीय भाषा असते की, तुम्हाला वेतनश्रेणी मिळते आहे. पण पदनाम पाहिजे आहे. त्या पदाचा पगार मिळतोय पण पदनाम पाहिजे यासाठी आपले कितीतरी अधिकारी कोर्टात गेले होते. फक्त पदनामासाठी. आणि हे पदनाम म्हणजेच स्मार्ट सिटी हे पिंपरी चिंचवड शहराला पाहिजे असे आमचे सगळ्यांचे म्हणणे आहे आपण सांगितले की, वर्षाला रु.२०० कोटी मिळणार. कोण म्हणते, आम्हाला काही कमी नाही, काही गरज नाही, हे नको ते नको. आणि तरीपण पैसे पाहीजेत. पैसे कुणाला नको असतात. ज्यांच्याकडे असतात त्यांना अजून पाहीजे असतात ही वस्तुस्थिती आहे डायरेक्ट एका कामासाठी नाहीतर तळागाळातल्या लोकांच्या सेवेसाठी हे पैसे होते. तुम्हाला पैश्यांपेक्षा याचे महत्व असले पाहिजे

की, आपण या परीक्षा पास झालो असतो तर देशाची एक पुढची परीक्षा आहे, त्यात २० शहरे निवडली जाणार आहेत. आपण खूप मोठी संधी गमावतोय. मा.आयुक्त साहेब तुमचा पगार आहे तेवढा पालिकेतील दहा अधिका-यांचा पगार आहे ही महापालिकेतली वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे आपण एवढ्या प्रकारचे लक्झरीयस लाईफ जगतोय. का तर पैसे आहेत. या सभागृहाने तसे ठराव करुन पैसे पाठवले आहेत. आपले उद्यान अधिक्षक असतील, आपले एम.ओ.एच. असतील यांची वेतनश्रेणी आयुक्त साहेबांबरोबर आहे. यांच्याकडे हायफाय गाड्या आहेत. हे खर्च कमी केलेतरी आपले दोनशे कोटी वाचतील. मग पैशांची काळजी करायचे काही कारण नाही. मा.महापौर साहेब, याठिकाणी मला एवढेच सांगायचे आहे की, या स्मार्ट सिटी स्पर्धेमध्ये आपण सगळ्यांनी एकत्र येऊन २/३ मागण्या आहेत. त्यात भ्रष्टाचार या विषयावर मी बोलणार नाही. कारण मा.सिमाताई मघाशी बोलल्या आहेत. मघाशी सांगितले, स्थायी समितीत बीजेपी नव्हती का, मनसे नव्हती का. स्थायी समितीत सगळेच असतात. तिथे मिनिटस् लिहीले जात नाहीत याची मागणी खूप वर्षांपासून करतोय. आम्ही बोललो तरी त्याचा काही उपयोग होत नाही. नाही बोललो तरी त्याचा काही उपयोग होत नाही. ते म्हणतात तुमचे पाकिट नाही. तू बोल नाहीतर नको बोलू. असे सांगून थेट विषय रेटले जातात. कितीही बोंबललो, कितीही गप्प बसलोतरी व्हायचे ते विषय त्याठिकाणी मंजूर होत असतात त्यामुळे एकट्या कमिटीला दोष देऊन उपयोग नाही. प्रशासनाकडून हे विषय होतात, टेंडर निघतात, चार/पाच टेबलला फाईल जाते, फाईल फिरून येते. त्यामुळे भ्रष्टाचार सिद्ध करणे हे देखील तेवढेच गरजेचे आहे. याच्या घोषणा होण्यापेक्षा मी मा.महापौर यांना आवाहन करेन की, सगळ्या कामांची श्वेतपत्रिका जाहीर करा. श्वेतपत्रिका जाहीर केल्यानंतर कळेल की, आपले कुठे चुकले आहे, काय चुकले आहे आणि त्याचे काय होणार. मा.महापौर साहेब, माझी अजून एक विनंती आहे की, ज्याप्रमाणे या शहराचे लोकनेते आदरणीय पवार साहेब यांना जाऊन भेटणार आहात. त्याचप्रमाणे आपम सर्वपक्षीय पदाधिकारी, सर्व पक्षप्रमुखांनाही भेटणे तेवढेच गरजेचे आहे. शिवसेना पक्षप्रमुख मा.श्री.उद्धव ठाकरे, आरपीआय पक्षप्रमुख मा.रामदासजी आठवले, त्याचप्रमाणे मनसेचे पक्षप्रमुख मा.राजसाहेब ठाकरे, काँग्रेसचे पक्षप्रमुख मा.श्री.अशोकजी चव्हाण या सगळ्यांना जर भेटलो तर आपल्याला वगळायची काय कुणाची बिशाद आहे. आपण एक होऊन गेलोतर आपल्याला कोणी थांबवू शकणार नाही. परंतू इथे श्रेयवाद करायचा नाही असे ठरवा. माझी उपसूचना आहे की, सगळे नगरसेवक, ३ आमदार, ३ खासदार यांच्या समवेत सर्वांनी ताबडतोब, लवकरात लवकर मा.मुख्यमंत्री यांना भेटण्यासाठी, या सर्वांनी भेटण्यासाठी तयारी करावी. तशा अपॉईंटमेंटस् घ्याव्यात सर्व पक्षांचे शहर अध्यक्ष, सर्व गटनेते व सन्माननीय मा.आर.एस.कुमार यांच्यासारखे सर्व पक्षांतील सिनिअर नगरसेवक यांना बरोबर घेऊन जावे अशी सूचना मांडते.

**मा.अश्विनी चिंचवडे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, दुपारी १२ वाजल्यापासून स्मार्ट सिटी या विषयावर खास सभा बोलवली आहे. प्रत्येकाच्या मनात जे जे विचार आहेत, ते ते प्रत्येकाने बोलून दाखवले आहेत म्हणण्याचे तात्पर्य हेच आहे की, कमिश्नर साहेबांनी व आमच्या अधिका-यांनी खूप मेहनत घेतली, प्रेझेंटेशन केले. मला खात्रीपूर्वक नक्की माहिती आहे. तीन आमदार, तीन खासदार यांच्याशी कमिश्नर साहेब बोलले हे खात्रीपूर्वक सांगते. म्हणजे आम्ही कुठेही ओव्हरकॉन्फिडन्समध्ये नव्हतो. आणि कोणत्याही गोष्टीसाठी आम्ही मान-अपमान, कोणता पक्ष, कोणाशी बोलावे, कोणाशी बोलू नये, या विषयापेक्षा स्मार्ट सिटीत कसे जाऊ यासाठी कमिश्नर साहेबांना ज्या-ज्या वेळी वाटले, आपण यांना लोकांबरोबर घेऊन जायचे आहे, त्या त्या वेळी त्यासाठी आम्ही प्रयत्न केलेले आहेत. आणि म्हणून त्या दृष्टिकोणातून ही परीक्षा दिली. त्यातले सगळे सांगितले. त्याआधी सगळे ऑटोक्लस्टरला बसले. आपल्याला समजून सांगितले. तिथे सगळ्यांची मिटींग घेतली. काहींना वाटते प्रश्नउत्तर आपलेच आहे. प्रत्येकाला वाटते मी बोलतो ते बरोबर बोलतो. समोरचा बोलतो ते अगदी चुकीचे बोलतो. मला २००६-०७ चे दिवस आठवताहेत. जेएनएनयूआरएम प्रोजेक्टमध्ये त्यावेळी पिंपरी चिंचवडला डावलतात का काय अशीच परिस्थिती होती त्यावेळी आम्ही आदरणीय पवार साहेबांना विनंती केली होती. की, ही परिस्थिती येऊ शकते व म्हणून केंद्र सरकारचा निधी मिळणार नाही. मग पवार साहेबांनी मिटींग लावली. त्यानंतर पुण्याबरोबर पिंपरी चिंचवडचा समावेश झाला त्यानंतर आपल्याला एवढे मोठे बजेट मिळाले व पिंपरी चिंचवड शहराचा कायापालट झाला. काही सदस्यांच्या बोलण्यात आले की, पैसा कुणाला नको आहे. बरोबर आहे. शेवटी जे काम करतो, तेव्हा एखाद्या व्यक्तीच्या किंवा पदाधिका-याच्या घरी आलेला पैसा जात नाही. प्रत्येक कामासाठी वेगवेगळा लिहून दिलेला पैसा आहे तो त्या कामासाठी विभागला जातो. आणि त्याप्रमाणे ती योजना केली जाते. त्या दृष्टिकोणातून पिंपरी चिंचवडमध्ये रस्ते असतील, पूल असतील, गरीबांसाठी घरे असतील, झोपडपट्टीवासियांसाठी घरे असतील, गार्डनस् असतील कोणत्याही गोष्टीत, कोणत्याही पक्षाच्या सदस्याचा सभागृहात ठराव असलातरी आपण त्याला कधीही विरोध करत नाही. हे मी शंभर टक्के खात्रीपूर्वक सांगते. किंवा बजेटमध्ये कोणत्याही सदस्याचे बजेट कट करत नाही त्या दृष्टिकोणातून पिंपरी चिंचवडमधील सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्यासाठी आम्हाला कुठेही अशी भूमिका ठेवायची नाही. जसे आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितले. त्यांनी त्यांच्या नेत्यांची पत्रे वाचून दाखवली. त्यांनी त्यांचे प्रयत्न केले आहेत याचे आम्हाला वाईट वाटले नाही मी आयुक्त साहेबांना सांगितलेच होते, प्रत्येकाला सांगितले पाहिजे. विश्वासात घेतले पाहिजे. आणि त्याप्रमाणे पिंपरी चिंचवडची निवड झाली असल्यामुळे मामहापौरांनी त्यांच्या घरी त्यांच्या सासूबाईंचे निधन झाले असल्यामुळे वेळ जाऊ नये म्हणून आम्ही गेलो व मामुख्यमंत्री यांना पत्र दिले. मा.मुख्यमंत्री यांनी स्वतः सांगितले होते की, तुम्ही पहिल्या पाचमध्ये आहात. तर

तुमचे नाव वगळायचा प्रश्नच येत नाही. आता हा कोणाचा ओव्हर कॉन्फीडन्स म्हणायचा. इथे ओव्हर कॉन्फीडन्सचा प्रश्न येतो कुठे. त्या दृष्टिकोणातून आम्हालाही असे वाटले की, पिंपरी चिंचवड. आज डोळे झाकून सांगितले पूर्वैकडून या, पश्चिमेकडून या, उत्तरेकडून या, दक्षिणेकडून या कुठूनही या. लगेच समजते की पिंपरी चिंचवड आले आहे नागरीकांकडून असे ऐकायला येते. नागरीकांची पसंती आहे म्हणून पिंपरी चिंचवडमधील लोकसंख्येचा रेट वाढला आहे. आपण स्मार्ट सिटी योजनेत नक्कीच त्या यादीत असायला पाहिजे होतो. त्यांना काही वाटले असेल किंवा काही वाटत असले की कशामुळे आपल्याला सहभागी करुन घेतले नाही. दहावीत असलेला मुलगा मेरीट मध्ये आलेला असतो पण त्याला मार्कस् खूप कमी पडले किंवा नापास झाल्याचे सर्टीफिकेट त्याला हातात मिळते. मग त्याचे आई-वडील त्याची गुणपत्रिका रिचेकींगसाठी टाकतात. आपण तसे प्रयत्न करणार आहोत. मला वाटते, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संस्कृती अशी आहे की, पहिल्यांदा आम्ही पालकमंत्र्यांना भेटलो. मुख्यमंत्र्यांना भेटलो, दादांना भेटलो, पवार साहेबांना भेटलो. सगळ्यांकडून आम्ही आमच्या पद्धतीने प्रयत्न केले आहेत. आम्ही कुठल्याही रस्त्यावर बसून आंदोलन केले नाही, कुठेही जाळपोळ केली नाही, कुठेही बंदच्या घोषणा केल्या नाहीत. कुठेही सरकारचा निषेध केला नाही. मी स्वतः पत्रकार परिषद घेतल्यानंतर दोन्ही सरकारचे आभार मानले. आमचा सहभाग झाल्यामुळे मी स्वतः केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे आभार मानले. प्रत्येकाने प्रयत्न हे केलेच पाहिजे. मग आम्ही पवार साहेबांकडून प्रयत्न केलेतर तुम्ही उद्धवजींकडून केले. मघाशी मनसेने पाठिंबा दिला. आम्हाला चांगलेच वाटले. मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितले. मी मा.उद्धव ठाकरे यांचे आभार मानते. त्यांनी त्यांचे कारण सांगितले आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना सूचना दिली होती की, ज्यावेळी अशी परिस्थिती येईल, त्यावेळी आपण सर्व शहराच्या बरोबर असले पाहिजे. मी उद्धवजींचे पुन्हा आभार मानते. शेवटी एखाद्या आईचा मुलगा खोडकर असतो. त्या मुलाने जरी खोडी केली असेल, त्याचे चुकले असेल तरी ती आपल्या मुलाची चूक पोटात घेऊन त्याला मोठे करण्यासाठी प्रयत्न करत असते. परवा पत्रकार परिषदेतसुद्धा मा.अजितदादांनी सांगितले, जर आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप असतील, ज्या-ज्या कोणत्याही चौकश्या करायच्या असतील त्याला आम्ही सामोरे जायला तयार आहोत. ज्याला कुठे जायचे आहे, तिथे जाऊ देत. पण ज्याला कुणाला शहराची आत्मियताच वाटत नाही. एकतर सदस्य म्हणाले, आमच्या पाया पडायला यावं. एवढे सिनिअर असलेले सदस्य म्हणाले की, आता तुम्ही आमच्या पाया पडायला या. यातून जे जे कोणी बोललो त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात या शहराबद्दल काय आहे हे प्रश्नचिन्ह निर्माण होते. माझी भगिनी म्हणाली की कमिश्नर साहेबांना खूप वाईट वाटले. आता ते रडतात की काय. बरोबर आहे साहेब तुम्हाला हे वाटणारच होते. कारण तुम्ही या शहराचे बाप आहात. म्हणून तुम्हाला हे वाटणे गरजेचेच होते. तुम्हाला ही कळकळ असलीच पाहीजे. तुम्ही रडला असतात तरीसुद्धा बिघडले नसते. कारण तुम्ही तुमच्या पोरांसाठी, शहरासाठी

रडणार आहात. आम्हालासुद्धा या गोष्टीचे वाईट वाटते. हे सुद्धा माहिती आहे की, पडून पडून काय फरक पडणार आहे. तरीसुद्धा आज शहरातील नागरीकांसाठी स्मार्ट सिटी योजनेत जाण्यासाठी प्रयत्न करायचा आहे. प्रत्येक मनुष्य म्हणतो, असे असे होईल. आपला सहभाग स्मार्ट सिटी योजनेत का नाही, हा एकच प्रश्न लहानांतील लहानांना, ज्येष्ठ नागरीकांना देखील आहे. त्यांनी जिल्हानिहाय घेतले असेल पण शेवटी आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे. जेव्हा पिंपरी चिंचवड व पुणे शहर एकत्र प्रस्ताव गेला होता तेव्हादेखील आम्ही सांगितले होते आमचे काही कंबाईन प्रोजेक्ट असतील तर आपण आमच्या नागरीकांना काय देणार आहात या दृष्टीकोणातून आम्हाला काही गोष्टी द्यायच्या नसतील किंवा खर्च करायचा नसेल तर आम्ही करु शकणार नाही. यात बीआरटी असेल, मेट्रो असेल या दृष्टिकोणातून आम्हाला कोणतेही प्रोजेक्ट राबवायचे असतील तर आम्हाला ते राबवता येतील का नाही हे आमच्या समोर प्रश्नचिन्ह आहे. आपण बरोबर काम करायचे असेलतर दोघांनी मिळून मा.पालक मंत्री यांना विनंती करते की, तुम्ही सुद्धा प्रयत्न करावेत. मा.पालक मंत्र्यांनीच आपल्याला ९ तारीख सांगितली होती. त्यांना या सगळ्या गोष्टी माहित आहेत. त्यांनी या सगळ्या गोष्टींत पुढाकार घेतला. त्यांनाही आश्चर्य वाटले की, पिंपरी चिंचवडचा समावेश स्मार्ट सिटी योजनेत कसा नाही. सभा ही शेवटी गणसंख्येवर असते. आपल्या शहरात कुठल्या कुठल्या पक्षाची किती संख्या आहे हे तुम्ही नगरसचिव उल्हास जगताप यांना विचारा. सुलभाताई, तुम्ही बोलत असताना मी बोललेले नाही.

**मा.सुलभाताई उबाळे** - मा.महापौर साहेब, यांचे बोलून झाले की मला या विषयावर बोलायचे आहे. मला या विषयाचा खुलासा हवा आहे.

**मा.महापौर** - आत्ता या विषयाचा खुलासा देता येणार नाही. तुम्ही उद्या परवा कधीही भेटू शकता. सुलभाताई तुम्ही खाली बसा.

**मा.सुलभाताई उबाळे** - मा.महापौर साहेब, हा मा.महापौरांचा अधिकार आहे. इथे मुख्यमंत्री बसले नाहीत.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, सदस्यांना एवढे वाईट वाटायचे कारण काय आहे. तुम्ही दोघी एवढे बोलत होता तेव्हा मी एकही शब्द बोललेली नाही. मग तुम्ही का बोलावे. कुठेतरी संस्कृति पाळा. इतर लोक बोलत असतात तेव्हा आम्ही अजिबात बोलत नाही. मग इतरांनीही अजिबात मध्ये बोलू नये. एवढे त्यांना वाईट का वाटते. महापालिकेची स्त्रोत वाढवायचे त्याबद्दल इथे बोलायचे नाही. अजून दीड वर्ष आहे. त्यानंतर बघू. आज आपला सहभाग स्मार्ट सिटीत कसा व्हावा यासाठी बोलतोय, त्यासाठी सांगतेय.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- शहरांचा सुनियोजित आणि गतीने विकास करुन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्याच्या प्रयोजनाने महत्वाकांक्षी “स्मार्ट सिटी” योजना राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. सदर योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य

शासनाच्या वतीने शहरांनी स्पर्धेत भाग करावा असे आव्हान केले होते. स्मार्ट सिटी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अत्यंत कमी कालावधी असतानाही सार्वजनिक वाहतूक, घनकचरा व्यवस्थापन, नदी सुधार, सांडपाणी शुध्दीकरण, पाणीपुरवठा, प्रभाग स्वच्छता, शहरांचे सुशोभिकरण, पर्यावरण, आरोग्य इ. बाबत नागरीकांच्या सुचना मागवून विकासाचा दुरदृष्टीकोन ठेवत पिंपरी चिंचवड शहराने प्रस्ताव सादर केलेला आहे

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरनिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत नोव्हेंबर २०११ चे कालावधीत देशातील ६४ शहरांतून एकमेव “बेस्ट सिटी” पुरस्कार मा.पंतप्रधान यांचे हस्ते महापालिकेस प्राप्त झालेला आहे. या व्यतिरिक्त महापालिकेस “Best City for Water & Sewerage Sector व “Best City for Pro Poor Reforms” चा पुरस्कार देखील महापालिकेस प्राप्त झालेले आहेत. महापालिकेमार्फत नागरीकांना देण्यात येणा-या ऑनलाईन सेवांसाठी २०११-१२ या वर्षाचे केंद्र शासनाचे “नॅशनल ई-गव्हर्नन्स गोल्ड †वार्ड” महापालिकेस प्राप्त झालेले आहे. ई-गव्हर्नन्स अंतर्गत “सारथी” प्रकल्पास राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियाना अंतर्गत २०१३ या वर्षासाठी राज्य शासनाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देणेत आलेले आहे. स्मार्ट सिटी म्हणून दहा शहरांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शक तत्वे असताना आणि स्मार्ट सिटी योजनेसाठी संयुक्त शहरांचा प्रस्ताव पाठविण्याची तरतूद नसताना पुणे व पिंपरी चिंचवड या स्वतंत्र ओळख असलेल्या दोन्ही शहरांचा स्मार्ट सिटीत संयुक्त प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनास पाठविलेला आहे. गुणवत्तेचा निकष पहाता ९२.५% गुणे मिळविल्याने राज्य शासन स्तरावर होणा-या स्पर्धेत पात्र होऊनही केंद्र शासनाच्या अंतिम ९८ शहरांच्या यादीतून पिंपरी चिंचवड शहरास वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे शहरातील नागरीक, विविध सामाजिक संस्था यांनी तीव्र संताप व्यक्त केलेला आहे. शहरातील लोकसंख्येची वाढ व स्मार्ट सिटीचे सर्व निकष पुर्ण करण्याची क्षमता असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी अंतर्गत स्वतंत्रपणे समावेश करण्यास राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे तातडीने शिफारस करण्यास मान्यता देणेत यावी.

मी सभागृहाच्या वतीने ही उपसूचना करु इच्छिते आणि या सूचना मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा.केंद्रीय मंत्री वैंकय्या नायडू, मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी, मा.पालक मंत्री गिरीश बापट यांच्याकडे या सूचना पाहोचवाव्यात की, आम्ही सगळ्या गोष्टींत असताना एवढी चांगली कामे पिंपरी चिंचवड शहरात केली आहेत केलेल्या कामांची पावती म्हणून आम्हाला स्मार्ट सिटी योजनेत घ्यावे. पिंपरी-चिंचवड, पुणे दोन्ही लगतची शहरे असताना, दोन्ही शहरांसाठी ट्रान्सपोर्ट सुविधा एक असताना उद्या जर आम्ही मेट्रो करु शकलो नाहीतर पुण्यावर अन्याय होऊ नये किंवा आमच्याकडे पैसेच आले नाहीत तर आम्ही करु की नाही अशी भिती यावेळी वाटते आहे. हे सगळे तुम्ही त्यांच्या कानावर घालावे, लेखी स्वरुपात कानावर घालावे अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करते आहे मी प्रयत्न करते आहे. प्रयत्नांती परमेश्वर यावर मी

विश्वास ठेवते. इलेक्ट्रॉनिक मिडीया यांनी माझी मुलाखत घेतली होती. त्यांनी मला विचारले होते की, पिंपरी चिंचवडचा समावेश स्मार्ट सिटीत होईल का? त्यावेळी सुद्धा मी हेच म्हणाले होते, माझा शंभर टक्के विश्वास आहे. परंतू जे काही झाले त्याचा विचार करुन आता उपयोग नाही. स्मार्ट सिटीमध्ये पिंपरी चिंचवडचा नक्कीच समावेश होईल. इथून पुढे आपल्याला जे प्रयत्न करायचे आहेत, ते सगळ्यांनी मिळून प्रत्येकाने प्रयत्न करावा, सगळ्यांनी सगळ्यांच्या नेत्यांकडे जाऊन प्रयत्न करावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती करते. मी पुनःश्च या ठरावाला अनुमोदन द्यायला सांगते. हा विषय मंजूर करुन घ्यावा अशी विनंती करते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.मंगलाताई कदम यांनी जी उपसूचना मांडली त्याला अनुमोदन देतो.

मा.अपर्णा डोके - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ७४८ विषय क्रमांक - १

दिनांक- ७/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.रमा ओव्हाळ, मा.अनिता तापकीर, मा.विमल काळे, मा.विनायक गायकवाड, मा.हिरानंद आसवानी, मा.कैलासभाऊ थोपटे, मा.संपत पवार, मा.बाळासाहेब तरस, मा.शांताराम भालेकर, मा.धनंजय आल्हाट, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२३३० दि.१.०९.२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा केंद्र शासनाच्या "स्मार्ट सिटी" योजनेकरिता पुणे महानगरपालिकेसमवेत समावेश करणेत आला आहे. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा एकत्रित समावेश करून राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस केली असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका निकष पूर्ण करीत असूनही "स्मार्ट सिटी" योजनेत समावेश झालेला नाही. तरी केंद्र शासनाच्या "स्मार्ट सिटी" योजनेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्वतंत्रपणे समावेश करण्याकरिता राज्य शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच शहरांचा सुनियोजित आणि गतीने विकास करुन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्याच्या प्रयोजनाने महत्वाकांक्षी "स्मार्ट सिटी" योजना राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. सदर योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने शहरांनी स्पर्धेत भाग करावा असे आव्हान केले होते. स्मार्ट सिटी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी

अत्यंत कमी कालावधी असतानाही सार्वजनिक वाहतूक, घनकचरा व्यवस्थापन, नदी सुधार, सांडपाणी शुध्दीकरण, पाणीपुरवठा, प्रभाग स्वच्छता, शहरांचे सुशोभिकरण, पर्यावरण, आरोग्य इ. बाबत नागरीकांच्या सुचना मागवून विकासाचा दुरदृष्टीकोन ठेवत पिंपरी चिंचवड शहराने प्रस्ताव सादर केलेला आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरनिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत नोव्हेंबर २०११ चे कालावधीत देशातील ६४ शहरांतून एकमेव “बेस्ट सिटी” पुरस्कार मा.पंतप्रधान यांचे हस्ते महापालिकेस प्राप्त झालेला आहे. या व्यतिरिक्त महापालिकेस “Best City for Water & Sewerage Sector व “Best City for Pro Poor Reforms” चा पुरस्कार देखील महापालिकेस प्राप्त झालेले आहेत. महापालिकेमार्फत नागरीकांना देण्यात येणा-या ऑनलाईन सेवांसाठी २०११-१२ या वर्षाचे केंद्र शासनाचे “नॅशनल ई-गव्हर्नन्स गोल्ड †वार्ड” महापालिकेस प्राप्त झालेले आहे. ई-गव्हर्नन्स अंतर्गत “सारथी” प्रकल्पास राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियाना अंतर्गत २०१३ या वर्षासाठी राज्य शासनाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देणेत आलेले आहे.

स्मार्ट सिटी म्हणून दहा शहरांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शक तत्वे असताना आणि स्मार्ट सिटी योजनेसाठी संयुक्त शहरांचा प्रस्ताव पाठविण्याची तरतूद नसताना पुणे व पिंपरी चिंचवड या स्वतंत्र ओळख असलेल्या दोन्ही शहरांचा स्मार्ट सिटीत संयुक्त प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनास पाठविलेला आहे. गुणवत्तेचा निकष पहाता ९२.५% गुणे मिळविल्याने राज्य शासन स्तरावर होणा-या स्पर्धेत पात्र होऊनही केंद्र शासनाच्या अंतिम ९८ शहरांच्या यादीतून पिंपरी चिंचवड शहरास वगळण्यात आलेले आहे त्यामुळे शहरातील नागरीक, विविध सामाजिक संस्था यांनी तीव्र संताप व्यक्त केलेला आहे. शहरातील लोकसंख्येची वाढ व स्मार्ट सिटीचे सर्व निकष पुर्ण करण्याची क्षमता असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी अंतर्गत स्वतंत्रपणे समावेश करण्यास राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे तातडीने शिफारस करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर**- हा विषय मंजूर करुन सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/३४६/१५
दिनांक - ७/११/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.